Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६०म
३I

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म् ❀

पुस्तक-संख्या .... ६०म/३ I

पंजिका-संख्या २०३६३

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[illegible] प्रमाणीकरण १९८४-१९८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CHECKED

धर्मशिक्षणमाला-पुस्तक ३ रें.

हिंदुधर्म-तत्त्वसंग्रह

६०म
३ T

लेखक
विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी
20३६२
9.3.2009

मुद्रक व प्रकाशक
शंकर रामचंद्र दाते,
लोकसंग्रह छापखाना, ६२४ सदाशिव, पुणें.

आवृत्ती ४ थी] [प्रती २०००

किंमत २ आणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुधर्म-तत्त्वसंग्रह

धर्म म्हणजे काय ?

प्रश्न:—धर्म म्हणजे काय ?

उत्तर:—साक्षात् ऐहिक उत्कर्ष साधून पारमार्थिक उत्कर्ष म्हणजे मोक्ष प्राप्त करून देणारा तो धर्म होय (" साक्षादभ्युदयनिःश्रेयस-साधनः धर्मः ")

धर्म श्रेष्ठ कोणता ?

प्रश्न:—जगांत सर्वांत श्रेष्ठ आणि प्राचीन धर्म कोणता ?

उत्तर:—वैदिक धर्म होय. त्यासच हिंदुधर्म असें म्हणतात.

प्रश्न:—हिंदुधर्म सर्वांत श्रेष्ठ कशावरून ?

उत्तर:—हिंदु* धर्मच सर्वांत जुना असून अनेक धर्मांचे आघात झाले तरीहि त्याची परंपरा सतत टिकली आहे. तसेंच तो सर्वसंग्राहक म्हणजे अनंत कालांतील अनुभवानें ग्राह्य ठरलेल्या सर्व तत्त्वांचा व आचारांचा संग्रह करणारा असल्यामुळें सर्वश्रेष्ठ व सनातन म्हणजे कायम टिकणारा आहे.

हिंदुधर्माची व्याख्या

प्रश्न:—हिंदु कोणाला म्हणतात ?

उत्तर:—वेद किंवा वेदमूलक ग्रंथ यांपैकीं कोणतांही ग्रंथ जो प्रमाण मानतो त्याला ' हिंदु ' असें म्हणतात.

---

*बुद्धधर्म (खि. पू. ७००) यहुदी (खि. पू. ४००) महमदी (इ.६००.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदूंचा धर्मग्रंथ

प्रश्नः——हिंदूंचा धर्मग्रंथ कोणता ?

उत्तरः——हिंदूंचा धर्मग्रंथ वेद होय.

प्रश्नः——वेद कशाला म्हणतात ?

उत्तरः——ईश्वरप्रणीत ग्रंथांना ' वेद ' असें म्हणतात.

प्रश्नः——वेद किती आहेत ?

उत्तरः—मूळ वेद एकच; परंतु सोयीच्या दृष्टीनें व ऐतिहासिक परंपरेस अनुसरून सुरक्षिततेकरितां वेदाचे चार भाग केलेले आहेत. त्यांना ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असें म्हणतात.

लो. टिळक यांची हिंदू धर्माची व्याख्या

प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।
उपास्यानामनियम एतद्धर्मस्य लक्षणम् ॥
धर्ममेनं समालम्ब्य विधिभिः संस्कृतस्तु यः ।
श्रुतिस्मृतिपुराणोक्तैः क्रमप्राप्तैरथापि वा ॥
स्वे स्वे कर्मण्यभिरतः श्रद्धाभक्तिसमन्वितः ।
शास्त्रोक्ताचारशीलश्च स वै हिन्दुः सनातनः ॥

(१) वेदप्रामाण्य (२) साधनांचें अनेकत्व (मोक्षप्राप्तीचे ज्ञान, कर्म, भक्ति इत्यादि मार्ग मानणें) (३) उपास्यांबद्दल अनियमितपणा हें हिंदु धर्माचें लक्षण आहे. या धर्मास अनुसरून श्रुति-स्मृति—पुराणोक्त किंवा परंपराप्राप्त अशा विधीनें संस्कार पावलेला, श्रद्धाळु, स्वकर्मतत्पर आणि शास्त्रांत सांगितलेले आचार पाळणारा त्यास हिंदु असें म्हणतात.

---

१ शेवटीं कोष्टक जोडलें आहे तें पहावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न:—वेदांत कोणकोणत्या ग्रंथांचा समावेश होतो ?

उत्तर:—संहिता, ब्राह्मण, आरण्यक आणि उपनिषदें.

प्रश्न:— संहिता म्हणजे काय ?

उत्तर:—मंत्रात्मक भागास 'संहिता' म्हणतात. मंत्र म्हणजे स्तुतिरूप असणारे छन्दोबद्ध भाग होत. याला फक्त यजुर्वेदाच्या कांहीं संहिता अपवाद आहेत. यजुर्वेदांत संहिता ब्राह्मणमिश्रित आहेत.

प्रश्न:—ब्राह्मण म्हणजे काय ?

उत्तर:—विधि म्हणजे अमुक करा, अमुक करूं नका असें सांगणाऱ्या ग्रंथास 'ब्राह्मण' असें म्हणतात.

प्रश्न:—आरण्यक म्हणजे काय ?

उत्तर:—आरण्यक आणि उपनिषदें हीं एकाच स्वरूपाचीं आहेत. दोन्हींमध्यें तत्त्वज्ञानावर भर आहे. आरण्यकांत कर्ममार्गाचें जरा जास्त प्रतिपादन दिसून येतें.

प्रश्न:—संहिता, ब्राह्मण, आरण्यकें व उपनिषदें चारच आहेत कां जास्त आहेत ?

उत्तर:—जास्त आहेत. प्रत्येक वेदाच्या कांहीं तरी कारणानें बऱ्याच शाखा होत्या; आणि त्यामुळें संहिता, ब्राह्मण, आरण्यकें व उपनिषदें यांचे बरेच ग्रंथ असावेत असें जुन्या ग्रंथांवरून दिसतें. त्याप्रमाणें बरेच ग्रंथ सध्यां उपलब्धहि आहेत.

प्रश्न:—ऋग्वेद म्हणजे काय ?

उत्तर:—ऋच् म्हणजे छन्दांत असणारे मन्त्र, त्यांचा संग्रह केलेला जो वेद तो ऋग्वेद होय. ऋग्वेदाच्या शाकल शाखेच्या संहितेचीं दहा मंडळें असून ऋचा सुमारें पंधरा हजार आहेत. यांमध्यें अग्नि, इंद्र, वरुण, सोम, अश्विनी, मरुत् वगैरे देवतांच्या स्तुतिपर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक वृत्तांतील ऋचा आहेत. ऋचांनीं युक्त असणारा हा वेद म्हणून यास ऋग्वेद असें म्हणतात. या ऋचा कोणी, केव्हां व कोठें म्हणाव्यात, यज्ञ करतांना कोणत्या ऋचांचा कोठें उपयोग करावा हें ब्राह्मणग्रंथांत सांगितलें आहे. आरण्यकें व उपनिषदें यांत परमेश्वरविषयक आध्यात्मिक तत्त्वज्ञान सांगितलें आहे. संहिता व ब्राह्मणें यांस कर्मकांड आणि आरण्यकें व उपनिषदें यास ज्ञानकाण्ड असेंही म्हणतात.

प्रश्नः—यजुर्वेद म्हणजे काय ?

उत्तरः—यज्ञविषयक वेदाला यजुर्वेद असें म्हणतात. यज्ञाच्या दृष्टीनें यजुर्वेद हाच महत्त्वाचा वेद आहे. यज्ञांतील ऋत्विजांत अध्वर्यु हा मुख्य असतो. म्हणजे त्याच्या हातून यज्ञांतील सर्व महत्त्वाचीं कामें घडत असतात. तीं सर्व यजुर्वेदांत सांगितलीं आहेत. म्हणूनच त्यास अध्वर्युशाखा असेंहि म्हणण्यांत येतें.

यज्ञांतील वेगवेगळ्या कामाचे सामान्यतः चार भाग पाडण्यांत येतात. त्यांत वेगवेगळ्या देवतांचीं स्तोत्रें म्हणण्याचें काम ऋग्वेदाचें, गाण्याचें काम सामवेदाचें, यज्ञांतील सर्व कामें करण्याचें काम यजुर्वेदाचें आणि सर्वांच्या कामावर लक्ष ठेवून बाह्य आपत्तींपासून, रोगराईपासून सर्वांच्या संरक्षणाचें काम अथर्ववेदाचें अशी चारहि वेदांची व्यवस्था आहे.

प्रश्न—सामवेद म्हणजे काय ?

उत्तर—ऋग्वेदांतील मंत्रच कांहीं विशिष्ट गाण्यासारख्या पद्धतीनें म्हटलें कीं त्याला सामवेद असें म्हणतात. यापेक्षां सामवेदांत विशेष फरक नाहीं. एखाद्या दुसऱ्या मंत्राशिवाय सामवेदांत ऋग्वेदापेक्षां वेगळें कांहीं नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्नः—अथर्ववेद म्हणजे काय ?

उत्तरः—अथर्ववेदांत मंत्रतंत्र, जादुटोणा आहे. अनेक प्रकारच्या रोगांवर व वशीकरणावर या वेदांत मंत्र आहेत. सुप्रसिद्ध व्रात्यस्तोम सूक्त याच वेदांत आहे. त्यामध्यें धर्मभ्रष्टांचा पुनः स्वधर्मांत स्वीकार फार सत्कारपूर्वक केलेला आढळतो. हा वेद अनेक छंदांत आहे. या वेदांत तत्त्वज्ञानपर अशींहि सूक्तें बरींच असून बराचसा भाग अद्यापि निश्चित अर्थ न लागलेला असा आहे. सायणाचार्यांचें भाष्यहि या समग्र वेदावर उपलब्ध नाहीं.

प्रश्नः—वेदमूलक ग्रंथ कोणते ?

उत्तरः—स्मृति आणि पुराणें. स्मृतींतच सूत्रग्रंथांचा अंतर्भाव होतो.

प्रश्नः—स्मृति म्हणजे काय ?

उत्तरः—धर्मशास्त्राला स्मृति म्हणतात. त्यामध्यें धर्मप्रतिपादक सूत्रें, स्मृति व पुराण ग्रंथांतील धर्मविषयक वचनें यांचा समावेश होतो.या ग्रंथांत सामाजिक वर्णधर्म व आश्रमधर्म हे सांगितले आहेत.

प्रश्नः—सूत्र म्हणजे काय ?

उत्तरः—सूत्र म्हणजे थोडक्यांत मान्य आचार्यांनीं लिहिलेले धर्मपर ग्रंथ होत.

प्रश्नः—धर्माशीं संबंध असलेलीं सूत्रें कोणतीं ?

उत्तरः—श्रौतसूत्रें, गृह्यसूत्रें आणि धर्मसूत्रें होत.

प्रश्नः—श्रौतसूत्रें म्हणजे काय ?

उत्तरः—श्रुति म्हणजे वेद. वेदांत प्रतिपादिलेलीं यज्ञादि कर्में कशीं करावींत हें ज्यांत सांगितलें आहे त्यांस श्रौतसूत्रें असें म्हणतात.

प्रश्नः—गृह्यसूत्रें म्हणजे काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तर:——गृहस्थाश्रमी माणसाला करावीं लागणारीं कर्में व विशेषत: संस्कार ज्यांत कसे करावेत हें सांगितलें आहे त्यांस गृह्यसूत्रें असें म्हणतात. हीं बहुतेक शाखांचीं निरनिराळीं आहेत.

प्रश्न:——धर्मसूत्रें म्हणजे काय ?

उत्तर:——सामाजिक धर्म, वर्णधर्म व आश्रमधर्म ज्यांत सांगितले आहेत त्यांस धर्मसूत्रें असें म्हणतात. सर्व सूत्रांचा स्मृतींत अन्तर्भाव होतो.

प्रश्न:——पुराण म्हणजे काय ?

उत्तर:——वेद आणि स्मृति यांमध्यें सांगितलेल्या तत्त्वांच इतिहासांतील कथांच्या साहाय्यानें प्रतिपादन करणाऱ्या ग्रंथास पुराणें असें म्हणतात.

प्रश्न:——स्मृति आणि पुराणें यांना स्वतंत्र प्रामाण्य आहे काय ?

उत्तर:——नाहीं. वेदमूलक म्हणून प्रामाण्य आहे. वेदविरुद्ध गोष्ट स्मृति किंवा पुराणांत आढळल्यास ती धर्मविरुद्ध म्हणजे अकल्याणकारी म्हणून त्याज्य समजण्यास हरकत नाहीं.

प्रश्न:——प्रामाण्य म्हणजे काय ?

उत्तर:——मान्यता असणें. मान्यता असली म्हणजे एकूण एक गोष्ट अमलांत आणलीच पाहिजे असें होत नाहीं.

संस्कृति

प्रश्न:——संस्कृति म्हणजे काय ?

उत्तर:——आम्हा आर्यांची प्राचीन विद्या, शील, विचार व तदनुरोधी आचार पाळणें यास 'संस्कृति' असें म्हणतात.

प्रश्न:——या संस्कृतीचें स्वरूप काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तर:—ज्ञान, यज्ञ, दान, तप आणि शौच हें होय. हें पुन्हा कायिक वाचिक व मानसिक अशा तीन प्रकारचें आहे.

प्रश्न:—ज्ञान म्हणजे काय ?

उत्तर:—ज्ञान तीन प्रकारचें आहे. एक आध्यात्मिक दुसरें आधिदैविक व तिसरें आधिभौतिक. सर्व जगत् हें एका परमात्मतत्त्वापासून निर्माण झालें असून सर्व जगाचा लय त्या एका परमात्मतत्त्वाचे ठिकाणीं होणार आहे, यासंबंधींचें ज्ञान आध्यात्मिक; मनुष्यापेक्षां जास्त सामर्थ्यवान् आणि परमेश्वरापेक्षां खालच्या प्रतीच्या अशा ज्या कांहीं सामर्थ्यवान् शक्ति आहेत, त्यांना देव किंवा देवता असें म्हणतात; आणि तद्विषयक ज्ञानाला आधिदैविक ज्ञान असें म्हणतात. देवता व ईश्वर यांशिवाय सृष्टींतील सर्व पदार्थांचें जें विशेष प्रकारचें ज्ञान त्यास आधिभौतिक ज्ञान असें म्हणतात.

प्रश्न:—यज्ञ म्हणजे काय ?

उत्तर:—देवतेचें ज्ञानपूर्वक पूजन करणें.पूजन म्हणजे सर्व प्रकारचे संस्कार होत. अग्नि प्रदीप्त करून निरनिराळया देवतांत उद्देशून हविर्द्रव्याची आहुति विधिपूर्वक अग्नींत समर्पण करणें ही यज्ञाची प्राचीन पद्धति आहे.

प्रश्न:—दान म्हणजे काय ?

उत्तर:—धर्मशील, सदाचारी व पूज्य व्यक्तींना, तसेंच अखिल समाजाचा उद्धार व कल्याण ज्या योगानें होत असेल, असल्या धर्मकार्याला वा राष्ट्रकार्याला निरपेक्ष बुद्धीनें, मनःपूर्वक व नम्रतेनें जें जें दिलें जातें, त्यास दान असें म्हणतात.

प्रश्न:—तप म्हणजे काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तर––आपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें आपापलें कर्तव्य योग्य रीतीनें पार पाडणें यास तप असें म्हणतात ('तप: स्वधर्मवर्तित्वम्').

प्रश्न––शौच म्हणजे काय ?

उत्तर— शौच म्हणजे शुद्धता, वंश, आचार व विचार या सर्वांचा शुद्धतेंत अंतर्भाव होतो ("शौच: संकरवर्जनम्").

संस्कार

प्रश्न––संस्कार म्हणजे काय ?

उत्तर––शरीर आणि मन हीं उत्तम गुणांनीं व सुविचारांनीं युक्त होण्यासाठीं केल्या जाणाऱ्या शास्त्रोक्त कर्मास ' संस्कार ' असें म्हणतात.

प्रश्न––संस्कार किती आहेत ?

उत्तर:––शास्त्रांत सांगितलेले एकंदर संस्कार अठ्ठेचाळीस आहेत. तथापि त्यांत सोळा विशेष मानले जातात.

प्रश्न—ते सोळा संस्कार कोणते ?

उत्तर:—१ गर्भाधान, २ पुंसवन, ३ सीमंतोन्नयन, ४ जातकर्म, ५ नामकर्म, ६ अन्नप्राशन, ७ चूडाकर्म (चौल), ८ उपनयन, ९ मेधाजनन, १० महानाम्नी ११ महाव्रत, १२ उपनिषद, १३ गोदान, १४ समावर्तन, १५ विवाह व १६ अन्त्येष्टि.

आचार

प्रश्न:—आचार म्हणजे काय ?

उत्तर:––आचार म्हणजे वर्तणूक. विशेषत: धर्मविषयक वर्तणुकीला आचार हा शब्द लाविला जातो. हिंदुधर्माचे आचार वर्णाश्रमधर्मपरत्वें भिन्न भिन्न आहेत.

प्रश्न:—हिंदुधर्माचे मुख्य आचार कोणते ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तर:—भजन, पूजन आणि मनन ह्यांपैकीं कांहींहि केलें असतां हिंदुधर्माचे आचार पाळले असें होतें. पंचमहायज्ञांचाहि ह्यामध्येंच समावेश होतो.

प्रश्न:—हिंदुधर्माची सर्वसामान्य खूण कोणती ?

उत्तर:—शेंडी, तिलक व कर्णच्छेद म्हणजे कान टोचणें. यज्ञोपवीत म्हणजे जानवें विशेषत: त्रैवार्षिक धारण करतात.

प्रश्न:—धर्मविधि कोणाकडून करावेत ?

उत्तर:—ज्याचे त्यानें स्वत:चे धर्मविधि स्वत: करावेत. तथापि स्वत: करतां येत नसतील तर धर्मशील ब्राह्मणद्वारां करावेत. कोणाच्याहि द्वारां केले, तरी ते विधि यथासांग होतात किंवा नाहीं याचें ज्ञान कर्त्यास आवश्यक आहे.

चातुर्वर्ण्य

प्रश्न:—वर्ण म्हणजे काय ?

उत्तर:—समाजव्यवस्थेकरितां समाजांत निर्माण केलेल्या विभागास 'वर्ण' असें म्हणतात.

प्रश्न:—वर्ण किती आहेत ?

उत्तर:—चार आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य व शूद्र, या चार वर्णांनीं घटित अशा समाजास चातुर्वर्ण्यघटितसमाज असें म्हणतात.

प्रश्न:—हे वर्ण कोणच्या तत्त्वावर विभागले आहेत ?

उत्तर:—समाजव्यवस्था आणि श्रमविभाग या तत्त्वांवर या वर्णांची उभारणी केलेली आहे.

प्रश्न:—ब्राह्मणांवर या व्यवस्थेनें कोणतें कार्य सोंपविलें आहे ?

उत्तर:—ब्राह्मणांवर बुद्धीचें काम सोंपविलें आहे. समाजाचा सर्व प्रकारें उत्कर्ष होण्यास ज्या ज्या ज्ञानाची आवश्यकता लागेल त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या प्रकारच्या ज्ञानाचा पुरवठा व सांठा करणें व नवीन नवीन क्षेत्रांत सतत अभ्यास करून नवीन नवीन तत्त्वांचा व ज्ञानाचा शोध करणें व त्यांचा समाजाला उपयोग करून देणें हें ब्राह्मणांचें मुख्य काम होय.

प्रश्नः —ब्राह्मणवर्गाचें महत्त्व काय ?

उत्तरः—हिंदुधर्माचें ध्येय प्रत्येक व्यक्तीची पूर्ण उन्नति करून त्याला मोक्षप्राप्ति करून देणें हें असल्यामुळें तें ध्येय साधण्याकरितां उच्च धर्माचरण कोणतें तें सांगितलें आहे; व तें उच्च धर्माचरण ब्राह्मणवर्गानें अत्यंत कडक रीतीनें पाळावें अशी त्याजवर हिंदुधर्मानें जबाबदारी टाकिलेली आहे यांतच ब्राह्मणवर्गाचें महत्त्व आहे.

प्रश्न—या व्यवस्थेनें क्षत्रियांवर कोणतें कार्य सोपविलें आहे ?

उत्तर—सर्व प्रकारच्या शत्रूंपासून राष्ट्राचें संरक्षण करणें आणि सर्व वर्गांना स्वकार्यतत्पर ठेवणें हें क्षत्रियांचें कर्तव्य आहे.

प्रश्न—वैश्यांचें कर्तव्य काय ?

उत्तर—सर्व प्रकारचा व्यापार करून धनोत्पादन व धन-संपादन करणें आणि त्या धनाचा उपयोग समाजाच्या कल्याणाकडे करणें हें वैश्यांचें कर्तव्य काय ?

प्रश्न—शूद्रांचें कर्तव्य काय ?

उत्तर—ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या प्रत्येक कार्यास मदत करणें हें होय ?

प्रश्न—यापैकीं कोणीहि स्वकर्मापासून च्युत झाल्यास आणि आपापली जबाबदारी सोडल्यास काय होतें ?

उत्तर—त्यांना मोक्ष मिळत नाहीं; समाज दुबळा होतो, आणि याची सर्व जबाबदारी ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यावर येते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न--कोणताहि वर्ण आपल्या कर्तव्यापासून च्युत झाल्यास काय करावें ?

उत्तर--इतर सर्व वर्णांनीं त्याचें काम करण्यास त्याला भाग पाडावें, नाहीं तर समाजांत त्याला निंद्य करून सोडावें.

प्रश्न--चातुर्वर्ण्य हें गुणावर अवलंबून आहे कां जन्मावर अवलंबून आहे ?

उत्तर--एक काळ असा होता कीं, त्यावेळीं चातुर्वर्ण्यामध्यें हल्लीं इतका कडक भेद निर्माण झाला नव्हता, असें बऱ्याच उदाहरणांवरून दिसतें. तथापि जन्मावरूनच चातुर्वर्ण्य पुढें धर्मशास्त्रज्ञांनीं ठरविलें; आणि सध्यांहि त्याप्रमाणेंच मानण्यांत येतें. नवीन शास्त्रज्ञांनीं त्यामध्यें इतकीच जास्त व्यवस्था केली कीं पूर्वीं ब्राह्मणादि त्रैवर्णिकांशिवाय इतरांना मोक्षाचा अधिकार नव्हता, तो सर्वांना मान्य करण्यांत आला. हा चातुर्वर्ण्यांतील पूर्वींच्या दृष्टीनें सध्यां विशेष आहे.

प्रश्न--जाति म्हणजे काय ?

उत्तर—भिन्न वंश, भिन्न चालीरीती, भिन्न आचार विचार, भिन्न संस्कार, भिन्न धंदे, भिन्न प्रदेश इत्यादि कारणांमुळें उत्पन्न झालेल्या समाजांतील गटांस जाती असें म्हणतात. जातीचें मुख्य लक्षण जन्मावरून पडते ती जात असें आहे.

प्रश्न--जातींची उपयुक्तता काय आहे ?

उत्तर—एक काळ असा होता कीं, निरनिराळ्या जाति ह्या विद्या, कला, संस्कृति, इत्यादिकांच्या रक्षणकर्त्या होत्या. तथापि अलीकडे यन्त्रशास्त्राची प्रगति फारच झपाट्यानें झाल्याकारणानें हें कार्य यन्त्रादिकांच्या साह्यानें आतां अधिक चांगल्या तऱ्हेनें होऊं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागलें आहे. व त्यामुळें जातींच्या उपयुक्ततेचें हें एक मुख्य कारण नाहींसें झालें आहे. तथापि आनुवंशिक संस्कारांच्या रक्षणकर्त्या या नात्यानें जातींची उपयुक्तता आहेच.

प्रश्न--अस्पृश्य म्हणजे काय ?

उत्तर--सामाजिक किंवा धार्मिक निन्द्य आचरण केल्यामुळें समाजानें बहिष्कृत केलेल्या माणसास अस्पृश्य असें म्हणतात.

प्रश्न--अस्पृश्यता कां उत्पन्न झाली ?

उत्तर--धर्माचरणांत शक्य तितकी अधिक पवित्रता रहावी येवढ्याकरितां.

प्रश्न--धर्माचरणाशिवाय इतरत्र अस्पृश्यता मानावी काय ?

उत्तर—नाहीं. लौकिक व्यवहारांत अस्पृश्यता मानण्याचें कारणच नाहीं.

प्रश्न—क्षत्रिय आणि वैश्य सध्यां आहेत का नाहींत ?

उत्तर—आहेत. कोणताही वर्ण नष्ट होणें केव्हांहि शक्य नाहीं. मात्र परिस्थितिभेदानें त्यांच्या गुणांमध्यें न्यूनाधिक्य होतें इतकेंच.

आश्रमव्यवस्था

प्रश्न – आश्रम म्हणजे काय ?

उत्तर—विद्यार्जन, प्रपंच, समाजकारण व मोक्षसाधन यांकरितां धर्मग्रंथांनीं घालून दिलेल्या कालमर्यादेस आश्रम असें म्हणतात.

प्रश्न—आश्रम किती आहेत ?

उत्तर—चार आहेत, ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम.

प्रश्न—ब्रह्मचर्याश्रम म्हणजे काय ?

उत्तर--ब्रह्म म्हणजे ज्ञान आणि 'चर्य' म्हणजे नियमबद्ध वर्तन.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्यार्जनाच्या कालास ब्रह्मचर्य असें म्हणतात. हा काल उपनयन झाल्यापासून विवाहापर्यंत असतो. विद्या संपादन होईपर्यंत विद्यार्थ्यानें शक्य तों गुरुसन्निध रहावयाचें असतें.

प्रश्न—ब्रह्मचर्याश्रमाचे नियम कोणते आहेत ?

उत्तर—ब्रह्मचाऱ्यानें कसें वागावें यासंबंधानें स्मृति व धर्मसूत्रें यांतून विवेचन केलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे उपनयन-संस्कार झाल्यावर प्रत्येक ब्रह्मचाऱ्यानें गुरुसन्निध राहून त्याच्या आज्ञे-नुसार वागावें. सूर्योदयापूर्वीं तास दीडतास उठून शौचमुखमार्जनादि विधि उरकून, स्वच्छ स्नान करून संध्या करावी व पूज्य व्यक्तींस वंदन करून अभ्यासास बसावें. अभ्यासाचे आरंभीं व शेवटीं प्राणा-याम करावा. प्राणायामानें मन स्थिर व शांत होऊन बुद्धि तरतरीत होते. ब्रह्मचाऱ्यांनीं दिवसां निजूं नये. उपभोग भोगूं नयेत, असत्य भाषण करूं नये, कठोर शब्द बोलूं नये, कोणतेहि उत्तेजक व विकारी पदार्थ भक्षण करूं नयेत.

प्रश्न—गृहस्थाश्रम म्हणजे काय ?

उत्तर—विद्यार्जन संपवून विवाह करून प्रपंच करणें व धर्म, अर्थ व काम साधणें म्हणजे धर्मविहित आचरण ठेवून धनसंपादन व प्रजोत्पादन करणें. ब्राह्मणानें बुद्धिबलानें, क्षत्रियानें पराक्रमानें, वैश्यानें व्यापारानें व शूद्रानें सेवा करून द्रव्यार्जन करावें. आपल्या आचारविचारांत शुद्धता राखावी. रोज पंचमहायज्ञ करावेत. पंच-महायज्ञ म्हणजे ब्रह्मयज्ञ (वेदाध्ययन), देवयज्ञ (देवतापूजन), पितृयज्ञ (पितृतर्पण व पितरांना अन्न देणें), भूतयज्ञ (इतर जीवांना बलि देणें), व अतिथियज्ञ (अतिथिसंस्कार) हे पांच यज्ञ करणें हें प्रत्येक गृहस्थाश्रमी माणसाचें कर्तव्य आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न—वानप्रस्थाश्रम म्हणजे काय ?

उत्तर—गृहस्थाश्रम सोडून लोकसेवा करीत धर्माचरणपूर्वक वैराग्यवृत्तीनें राहण्याचा अभ्यास करणें.

प्रश्न—संन्यास म्हणजे काय ?

उत्तर—कामक्रोधादि सर्व विकारांचा संयम करून पूर्ण वैराग्य वृत्तीनें राहून मोक्षप्राप्तीचा यत्न करणें.

तत्त्वज्ञान

प्रश्न—हिंदुधर्माचीं मुख्य तत्त्वें कोणतीं ?

उत्तर—पुनर्जन्म आणि कर्मानुरूप फलप्राप्ति हीं होत.

प्रश्न—पुनर्जन्म म्हणजे काय ?

उत्तर—मोक्ष प्राप्त होईतोंपर्यंत जन्म आणि मरण ह्यांच्या फेऱ्यांत असणें ह्यास 'पुनर्जन्म' म्हणतात.

प्रश्न—कर्मानुरूप फलप्राप्ति म्हणजे काय ?

उत्तर—ज्याप्रमाणें कर्म केलें असेल, त्याप्रमाणें ह्या जन्मीं किंवा पुढील जन्मीं फलप्राप्ति होणें यास कर्मानुरूप फलप्राप्ति असें म्हणतात.

प्रश्न—मोक्ष म्हणजे काय ?

उत्तर—प्रत्येक जीवाचें ध्येय ईश्वर होणें हें आहे. जीव हा अल्पज्ञ आणि संकुचित असा आहे. तो जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडला असल्यामुळें त्याला अनंत दुःखें, अनंत यातना सहन कराव्या लागतात. तें दुःख नाहींसें व्हावें, जन्ममरणाच्या कटकटींतून सुटावें म्हणून जेथें सुखदुःखाचा लवलेशहि नाहीं, जेथें जन्ममरणाची भीति नाहीं, अशा ज्ञानमय, सत्यस्वरूप व अखंड परमेश्वराशीं एकरूप होण्याची तो खटपट करीत असतो. अशा प्रकारें जीवानें शिव म्हणजे परमेश्वर बनणें यास मोक्ष असें म्हणतात. या ईश्वर होण्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खटपटीला सुलभ रीतीनें यश प्राप्त करून देणें हेंच हिंदुधर्माचें ध्येय आहे. या तत्त्वाची कल्पना सुद्धां इतर धर्मांना नाहीं.

प्रश्न—इतर धर्मांनीं मोक्ष मिळणें शक्य आहे कीं नाहीं ?

उत्तर—नाहीं. ते धर्म मोक्षप्राप्तीला उपयोगी असणाऱ्या कांहीं गुणांचा उत्कर्ष करतात इतकेंच. मोक्ष प्राप्त होण्यास हिंदुधर्मच स्वीकारला पाहिजे, किंवा या जन्मीं सदाचरणानें आत्मशुद्धि करून दुसऱ्या जन्मांत हिंदु होण्याची इच्छा केली पाहिजे.

पतितपरावर्तन

प्रश्न—परधर्मांत गेलेला हिंदु पुनः हिंदु होऊं शकतो कीं नाहीं?

उत्तर—होऊं शकतो. याबद्दल देवलस्मृतींत चांगला विचार केलेला आहे आणि वेदग्रंथांपासून अर्वाचीन कालापर्यंतहि या गोष्टीस पुष्कळ आधार आहेत.

प्रश्न—परधर्मीय माणसास हिंदु होतां येतें कीं नाहीं ?

उत्तर—कोणत्याहि धर्मांतील माणसास हिंदु होण्यास हरकत नाहीं; म्हणूनच पूर्वीं अनार्य,शक व अनेक इतर जाती हिंदूंत समाविष्ट होऊं शकल्या.

प्रश्न—पुराणमतवादी हिंदु अशा लोकांना जवळ करतील काय ?

उत्तर—नाहीं. अशा विचारसरणीचे लोक कोणत्याही धर्मांत असतातच. त्यांत त्यांचा उद्देश इतकाच असतो कीं, धर्मांत कडवे धार्मिक लोक असावेत, अर्धवट नसावेत.

प्रश्न—परधर्मीय लोक हिंदु झाल्यास हिंदु लोक त्यांचा कोणत्या जातींत स्वीकार करतील ?

उत्तर—स्वतःच परधर्मांत गेलेला मनुष्य पश्चात्तापपूर्वक पुन्हां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुधर्मांत येत असेल तर त्याचा त्याच्या पूर्वजातींत स्वीकार केला जातो. परंतु क्षेत्रबीजशुद्धि राहिली नसलेल्यांस किंवा हिंदुकुलामध्यें उत्पन्न न झालेल्या परधर्मीयांस वेगळी जात म्हणून हिंदूंत समाविष्ट केलें जातें. अशा अनेक जाती पूर्वी हिंदूंत समाविष्ट केल्या गेल्या आहेत.

ईश्वर निराकार आणि एक आहे.

प्रश्न—ईश्वर एक आहे कीं अनेक आहेत ?

उत्तर—ईश्वर एकच आहे. अनेक नाहींत.

प्रश्न— मग विष्णु, शिव, कृष्ण, विठ्ठल, गणपति, मारुति, देवी वगैरे देव अनेक दिसतात हें कसें ?

उत्तर—वस्तुतः ईश्वर निराकार आणि एक आहे. तथापि भक्तांच्या भावनांनुसार त्या विश्वव्यापी परमेश्वराचीं हीं वेगवेगळीं स्वरूपें आहेत. मनुष्याप्राणी आपआपल्या भावना व ज्ञान यांना अनुसरून परमेश्वराची उपासना करीत असतो. त्याची ज्याच्या ठिकाणीं उत्कट श्रद्धा बसते त्याची तो उपासना करूं लागतो. व्यापक स्वरूपांत असणारा किंवा मूर्तींत पाहिला जाणारा ईश्वर मुळांत एकच आहे. अधिकारानुसार भक्ताची पहाण्याची दृष्टि वेगळी असते इतकेंच.

प्रश्न—ईश्वर कोठें असतो ?

उत्तर—स्थिर आणि चर सृष्टींत म्हणजे चहूंकडे ईश्वर भरून राहिलेला आहे.

मूर्तिपूजा.

प्रश्न—मूर्तिपूजा म्हणजे काय ?

उत्तर—मूर्ति म्हणजे आकार. साकार देवतेची उपासना करणें यास ‘ मूर्तिपूजा ’ असें म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न—मूर्तिपूजा हिंदूंना आवश्यक आहे काय ?

उत्तर—नाहीं. मूर्तिपूजा ही एक पायरी आहे. निर्गुण व निराकार परमेश्वराचें ध्यान करणें हेंच हिंदुधर्माचें उच्च आणि मुख्य तत्व आहे.

प्रश्न—हिंदुधर्मालाच मूर्तिपूजेची जरूरी कां वाटते ?

उत्तर—हिंदुधर्मातच मूर्तिपूजा आहे हें म्हणणें सत्य नाहीं. जगांतील सर्व धर्मांत मूर्तिपूजा आहे. मुसलमानांचा पीर, ख्रिस्त्यांचा क्रॉस ही सर्व मूर्तिपूजाच नाहीं काय ? उलट हिंदुधर्मांत अधिकाराप्रमाणें वाटल्यास मूर्तिपूजा करावी, वाटल्यास न करावी, ही सवडच अज्ञापासून प्रज्ञापर्यंत सर्व लोकांचा समावेश करण्यास व धर्माकडे सर्वांची प्रवृत्ति वळविण्यास जास्त सोयीची आहे; आणि ती मूर्तिपूजाहि निराकार परमेश्वराच्या ध्यानाला साधक म्हणून पुढें ठेवलेली असते. म्हणजे ध्येय म्हणून निराकार परमेश्वरच हिंदुधर्मानें सर्वांच्या पुढें ठेवलेला असतो.

प्रश्न—हिंदूंनीं कोणत्या देवाची उपासना केली पाहिजे ?

उत्तर—अमक्याच देवतेची उपासना केली पाहिजे असा हिंदुधर्माचा हट्ट नाहीं. मात्र आस्तिक्यबुद्धि असली पाहिजे.

धर्म आणि व्यवहार

प्रश्न—धर्म आणि व्यवहार यांचा संबंध आहे काय ?

उत्तर— धर्माशीं संबंध नाहीं असा एकही व्यवहार असूं शकत नाहीं. प्रत्येक ठिकाणीं धर्म आहे.

पाप व पुण्य

प्रश्न—पुण्य आणि पाप कशाला म्हणतात ?

उत्तर—जीवाच्या उत्कर्षाला पोषक असणाऱ्या व्यवहारास पुण्य असें म्हणतात आणि जीवाच्या अधोगतीला कारण होणाऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यवहारास पाप असें म्हणतात. हीच पापपुण्याची कल्पना प्राचीन काळापासून चालत आली आहे.

प्रश्न—मग अमकें कृत्य केलें तर असें पुण्य लागतें व त्याचें फल असें असें अमक्या लोकांत मिळतें वगैरे सांगण्यांत येतें याचा अर्थ काय ?

उत्तर—वेगवेगळ्या बुद्धींच्या लोकांना समजावून सांगण्याच्या पद्धति वेगवेगळ्या असतात; त्याप्रमाणें तें सांगितलेलें असतें इतकेंच. उदाहरणार्थ, खीर न खाल्ली तर आई मरेल, गोड फार खाल्यानें पोटांत जंत होतील, मागला भात न घेतल्यास सासऱ्यास दारिद्र्य येईल इत्यादि.

प्रश्न—परंतु पापपुण्याची स्वर्गनरकादि फलें पुराणांसारख्या मान्य ग्रंथांत लिहिलेलीं असतात याचा अर्थ काय ?

उत्तर—तीं पुराणें कोणाकरितां लिहिलेलीं आहेत हें प्रथम लक्षांत घेतलें पाहिजे म्हणजे त्यांतील तत्त्व लक्षांत येईल, ज्यांना अतिशयोक्ति केल्याशिवाय कोणतीही गोष्ट समजत नाहीं, ज्यांचें लक्ष मोठी व्यावहारिक आमिषें डोळ्यांपुढें ठेविल्याशिवाय धर्माकडे वळणें शक्य नाहीं, अशांकरितां पुराणें लिहिलीं गेलीं आहेत, अर्थात् त्या दृष्टीनें त्यांत फलें व वर्णनें बऱ्याच ठिकाणीं केलेलीं असतात. म्हणून तीं शब्दशः घेण्याचें कारण नाहीं.

स्मृतिग्रंथ

उपलब्ध स्मृतिग्रंथांची अकरादि वर्णक्रमानें यादी:—

१ अंगिरा २ अत्रि ३ आत्रेय ४ आपस्तंब ५ उशना ६ ऋष्यशृंग ७ कणाद ८ कपिंजल ९ कात्यायन १० काश्यप ११ कार्ष्णाजिनि १२ कुतुमी १३ क्रतु १४ गार्ग्य १५ गोभिल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१६ गौतम १७ च्यवन १८ छागलेय १९ जमदग्नि २० जातुकर्ण्य २१ जाबालि २२ दक्ष २३ देवल २४ नाचिकेत २५ नारद २६ पराशर २७ पारस्कर २८ पितामह २९ पुलस्त्य ३० पुलह ३१ पैठिनसि ३२ प्रचेतस् ३३ प्रजापति ३४ बभ्र ३५ बृहस्पति ३६ बैजवाप ३७ बौधायन ३८ भरद्वाज ३९ भृगु ४० मनु ४१ मरीचि ४२ यम ४३ याज्ञवल्क्य ४४ लौगाक्षि ४५ लोमश ४६ वत्स ४७ वसिष्ठ ४८ वसु ४९ विश्वामित्र ५० विष्णु ५१ व्याघ्र ५२ व्यास ५३ शंखलिखित ५४ शातातप ५५ शौनक ५६ संवर्त ५७ सत्यव्रत ५८ सनतकुमार ५९ सुमंतु ६० सोम ६१ स्कंद ६२ हारित.

याशिवाय अनेक स्मृतींची वचनें प्रमाण म्हणून बऱ्याच ठिकाणीं उल्लेखिलेलीं दिसतात. तथापि हल्लींच्या छापलेल्या स्मृतींपैकीं पुष्कळ स्मृति मान्य निबंधकारांनीं उध्दृत केलेल्या वचनांशीं पडताळून पाहता बदललेल्या आहेत असें दिसतें.

पुराणें

पुराणें अठरा आहेत. त्यांची अकारादि वर्णक्रमानें:—

१ अग्नि २ कूर्म ३ गरुड ४ नारद ५ पद्म ६ ब्रह्म ७ ब्रह्मवैवर्त ८ ब्रह्मांड ९ भविष्य १० भागवत ११ मत्स्य १२ मार्कंडेय १३ लिंग १४ वराह १५ वामन १६ विष्णु १७ शिव १८ स्कंद.

हीं पुराणें व्यासांनीं रचिलीं असून निरनिराळ्या मुनींनीं त्यावर संस्कार केले आहेत. त्याचप्रमाणें महाभारत व रामायण हा इतिहास-हि निर्माण झाला आहे. या भारतासह एकंदर पुराणांची श्लोक संख्या पांच लक्ष आहे (मत्स्यपुराण ५३—७२). हल्लींच्या पुराणांत अनेक प्रक्षिप्त भाग आढळून येतात. पण प्रत्येक पुराणांत कोणकोणतें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विषय आहेत, याची एक विस्तृत सूची नारदपुराणांत दिलेली आहे, त्यावरून बरेच प्राक्षिप्त भाग उघड होतील. हल्लीं वेंकटेश्वर प्रेस-मध्यें सर्व पुराणें छापलीं आहेत, पण वरील सूचीवरून पाहतां पुष्कळ भाग अप्रसिद्ध आहेत असें दिसतें. उदाहरणार्थ—अग्निपुराणांतील ईशानकल्पवृत्तांत, भविष्यांतील शैव व सौरपर्व, कूर्मांतील सौरीव वैष्णवी संहिता, नवीन संशोधाकरितां स्मृति व पुराण हें वाङ्मय तद्यापि अवशिष्ट आहे.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैदिक धर्मग्रंथ

वेद	मूळ शाखा	उपलब्ध शाखा	ब्राह्मण	आरण्यक	उपनिषद्	श्रौतसूत्र	गृह्यसूत्र	धर्मसूत्र
ऋग्वेद	२१	(१) शाकल (या शाखेची संहिता अगदीं शुद्ध स्वरूपांत उपलब्ध आहे.) (२) बाष्कल (या शाखेची संहिता उपलब्ध नाहीं. त्यांतील कांहीं मंत्र उपलब्ध आहेत. या शिवाय बऱ्याच इतर संहिता थोड्या कमी अधिक सूक्तांनीं तयार होतात.	(१) ऐतरेय ब्राह्मण (२) कौषितकी ब्राह्मण (म्हणजे सांख्यायन किंवा खांडायन)	(१) ऐतरेय आरण्यक (२) सांख्यायन आरण्यक	(१) ऐतरेय (ऐतरेय आरण्यकांतील २–३–६ भाग (२) कौषितकी (सांख्यायन आरण्यकांतील ३ते६ भाग) (३) बाष्कल (हे बाष्कल शाखेचें उपनिषद् आहे.)	(१) आश्वलायन (२) सांख्यायन (म्हणजे कौषितकी)	(१) आश्वलायन (२) सांख्यायन म्हणजे कौषितकी	(१) वसिष्ठ
कृष्णयजुर्वेद	८५	(१) तैत्तिरीय (२) मैत्रायणी (३) कठ (४) कापिष्ठल (५) श्वेताश्वतर	(१) तैत्तिरीय संहितांर्गत ब्राह्मण (२) तैत्तिरीय ब्राह्मण	(१) तैत्तिरीय आरण्यक	(१) तैत्तिरीय (तैत्तिरीय आरण्यक भाग ६ ते ९ (२) महानारायण (भाग १–७) (३) मैत्रायणी (४) काठक (५) श्वेताश्वतर	(१) आपस्तंब (२) बौधायन (३) हिरण्यकेशी (सत्यापाढ) (४) भारद्वाज (५) वैखानस (६) वाधूल (७) मानव (मैत्रायणि शाखेचें) (८) वाराह	(१) मानव (२) आपस्तंब (३) बौधायनि (४) हिरण्यकेशी	(१) आपस्तंब (२) बौधायन (३) हिरण्यकेशी
शुक्ल-यजुर्वेद	१६	(१) काण्व (२) माध्यंदिन (वाजसनेय)	(१) शतपथ ब्राह्मण (हा शाखा भेदाप्रमाणें भिन्न आहे. काण्वशाखेचा १७ काण्डाचा व माध्यंदिन शाखेचा १४ काडांचा आहे.)	(३) बृहदारण्य काण्व शाखेच्या ब्राह्मणांतील १७वें माध्यंदिन शाखेच्या ब्राह्मणांतील १४ वे कांण्ड	(१) ईशावास्य (संहितेतील ४० वा अध्याय. (२) बृहदारण्यक (बृहदारण्यकांतील ३–८ भाग कण्वशाखेचे व ४ ते ९ भाग माध्यंदिन शाखेचे)	(१) कात्यायन (म्हणजे पारस्कर	(१) कात्यायन (म्हणजे पारस्कर)	
सामवेद	१०००	(१) कौथुम (२) राणायनीय (या दोन शाखांच्या संहिता शुद्ध स्वरूपांत संपूर्ण उपलब्ध आहेत.	(१) पंचविंश (प्रौढ किंवा तांड्य ब्राह्मण (२) षड्विंश (३) साम विधान (४) आर्षेय (५) मंत्र (६) दैवताध्याय (७) वंश (८) संहितोपनिषद् ब्राह्मण (९) जैमिनीय ब्राह्मण (१०) जैमियोपनिषद् ब्राह्मण.		(१) छंदोग्य (२) केन (जैमिनेयोनिषद ब्राह्मणांतील ४।१८।२१ हे भाग)	(१) खादिर (२) लाट्यायन (३) द्राह्यायण	(१) खादिर (२) गोभिल (३) गौतम (४) जैमिनि	(१) गौतम
अथर्ववेद		(१) पिप्पलाद (२) शौनक	(१) गोपथ ब्राह्मण		(१) प्रश्न (२) मांडुक्य (३) मुंडक (व अलिकडची पुष्कळ मिळून १५)	(१) वैतान	(१) कौशिक जैमिनिगृह्यसूत्र	

टीप—धर्मसूत्रांवरून स्मृत्या झाल्या. वेद म्हणण्याची पद्धति सांगण्याकरितां शिक्षाग्रंथ निर्माण झाले. वेदांचें व्याकरण समजावून देणारा ग्रंथ प्रातिशाख्य होय. शिक्षाप्रमाणेंच प्रातिशाख्य प्रत्येक वेदाचे वेगवेगळे आहेत.

[हें पत्रक विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनीं हिंदुधर्मतत्त्वसंग्रह या पुस्तकाकरितां तयार केलें]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धार्मिक व संग्राह्य पुस्तकें

सर्व सार्थ व सटीक

१ संध्या....		ऽ२
२ ब्रह्मयज्ञ....		ऽ२
३ वैश्वदेव....		ऽ२
४ पूजा....	...	ऽ३
५ श्राद्धप्रयोग....	....	ऽ१०
६ शुद्धिसंस्कार....	....	ऽ६
७ चौलसंस्कार....	....	ऽ२
८ यज्ञोपवीत संस्कार	....	ऽ२
९ उपनयनसंस्कार	....	ऽ४
१० समावर्तनसंस्कार	....	ऽ२
११ विवाहसंस्कार....	....	ऽ१२
१२ गणेशाथर्वशीर्ष....	....	ऽ२
१३ हिंदुधर्मतत्त्वसंग्रह	....	ऽ२
१४ धर्मशिक्षण....	....	ऽ२
१५ सूर्योपनिषद्....	....	ऽ१
१६ ऋग्वेदाचें सपूर्ण मराठी भाषांतर....		१२रु.
१७ ब्राह्मणेतर वादाचें स्वरूप व ब्राह्मण जातींची सद्यःस्थिति....		ऽ८
१८ वाङ्मयविवेचन	....	ऽ८
१९ श्रद्धानंद चरित्र	....	ऽ१२
२१ खग्रास प्रभाकर (सा. कादंबरी)....		१ रु
२२ हिंदुस्थानचा सोपपत्तिक इतिहास (मुंबई विद्याखात्यानें मंजूर केलेला)...		२रु
२३ हिंदुस्थानची सोपपत्तिक शासनपद्धति		ऽ६

प्रकाशक—शंकर रामचंद्र दाते, पुणें
अनाथ विद्यार्थी गृहाचा "लोकसंग्रह छापखाना"
पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुधर्म विचारमाला १

ॐ

एकं सद् विप्राः बहुधा वदन्ति ।

सर्वश्रेष्ठ हिंदुधर्म

मी हिंदु कां रहावें व कां व्हावें ?

या प्रश्नाचें समर्पक उत्तर देणारा

व

पुणें, हिंदुमहासभेनें पारितोषिक दिलेला निबंध

लेखक

दामोदर नरहर शिखरे, एम्. ए.

सहसंपादक केसरी

प्रकाशक

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव,

५८ शनवार पेठ, पुणें शहर.

किंमत १२ आणे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति ।

सर्वश्रेष्ठ हिंदुधर्म

" मी हिंदु कां रहावें व कां व्हावें ? " या विषयावर जाहीर बाक्षिस लावून मागविलेल्या निबंधांपैकीं पुणें हिंदुमहासभेनें पसंत करून पारितोषिक दिलेला निबंध.

लेखकः—दामोदर नरहर शिखरे, एम्. ए.
सहसंपादक केसरी, पुणें.

२०३६२
9.3.2001

प्रकाशकः—सिद्धेश्वरशास्त्री चित्राव,
अध्यक्ष हिंदुमहासभा, पुणें.

किंमत १२ आणे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकाशकः--सिद्धेश्वरशास्त्री चित्राव,

अध्यक्ष हिंदुमहासभा, पुणें.

मुद्रकः--श्रीपाद रघुनाथ राजगुरु,

राजगुरु आणि कंपनीज् प्रेस, ५१२ शनवार, पुणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यदत्र सौष्ठवं किंचित्तद्‌गुरोरेव मे नहि।

गुरुवर्य

रा. रा. नरहर लक्ष्मण आठवले

यांस

प्रजानां विनयाधानाद्रक्षणाद् भरणादपि
उपकृत असलेल्याचें कृतज्ञपणानें
समर्पण.

दा. न. शिखरे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिं
राहणें
अगर
स्वरूप
परंतु य
नाहीं.
आहेत
पलीकडे
एके का
दर्शक अ
सांप्रतच्य
अहिंदु
स्वतःच्य
ख्रिस्ती
वावरणें
दर्जा वा
सारांश
झाली अ
ज्यां
केवळ न
गेल्यावर
धर्मांतर
त्कारानें
मुभा अ
असें स्व
मक्षीं पा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकाशकाचे दोन शब्द.

हिंदुधर्माचा अन्य धर्मांशीं संघर्ष चालू असलेल्या काळांत हिंदूंनीं हिंदूच राहणें अगर अहिंदूंनीं हिंदू होणें या योगानें कांहीं महत्त्वाच्या स्थितीचा अगर स्थित्यंतराचा बोध होतो कीं काय ? व असल्यास त्याचें बौद्धिक स्वरूप काय ? हें स्पष्टपणें कळणें ही फार महत्त्वाची गोष्ट मानावयास पाहिजे. परंतु या गोष्टीकडे अद्याप हिंदु समाजाचें जावें तितकें लक्ष्य गेलेलें दिसत नाहीं. हिंदूंना--निदान हिंदूपैकीं ज्यांना परधर्मांचे पाश आजवर खेचीत आहेत त्यांना–आपण हिंदू आहोंत म्हणजे फार तर " हिंदू आहोंत " या पलीकडे स्वतःच्या हिंदुत्वाबद्दल विशेष माहिती नसून, अहिंदु होणें म्हणजे एके काळीं बाटून स्वसमाजापासून च्युत होणें असा त्याचा कांहींसा अधःपात-दर्शक अर्थ असला तरी, हळूहळू बाटलेला समाज झपाट्यानें वाढत चाललेल्या सांप्रतच्या काळांत केवळ एका समाजांतून दुसऱ्या समाजांत जाणें एवढाच अहिंदु होण्याला अर्थ उरला आहे. आणि, उलट शक्य तर, व्यक्तिविशेषीं स्वतःच्या अस्पृश्यत्वादि सामाजिक हीनतेंतून मुक्त होणें, मुसलमान अगर ख्रिस्ती होऊन जातिनिर्बंधाच्या कचाटींतून सुटून एकजातित्वाच्या मैदानांत वावरणें व थोड्या बहुत अंशानें स्वतःचा सामाजिक व विशेषतः राजकीय दर्जा वाढविणें असाच त्याचा कांहींसा उन्नतिदर्शक असा सांप्रतचा अर्थ आहे. सारांश 'धर्मो नित्यः सुखदुःखे त्वनित्ये' या वाक्याची जाणीव पूर्णपणें नाहींशी झाली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

ज्यांना थोडेंबहुत कळण्याइतकें ज्ञान आहे त्यांचीच जेथें ही तऱ्हा, तेथें केवळ नात्यागोत्यांतील कांहीं लोक कोणच्याना कोणच्या कारणानें परधर्मांत गेल्यावर " आपण त्यांना कां न मिळावें ?" अशा साध्या विचारसरणीनें धर्मांतर केलें त्यांच्या धर्मांतराबद्दल काय विचारावें ? शिवाय कपटानें अगर बला-त्कारानें ज्यांचें धर्मांतर झालें असेल त्यांना देखील परत हिंदु धर्मांत येण्याची मुभा आजवर नसल्यानें त्यांचें झालेलें धर्मांतर म्हणजे कधीं कमी न होणारें असें स्वजनापासून पडलेलें अन्तर यापेक्षां त्यांना काय माहीत आहे ? दुसऱ्या पक्षीं पाहतां गेल्या दोन पांच वर्षांत जीं मूलहिंदूंचीं हिंदु धर्मांत परावर्तनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाली, तीं जरी उपरिनिर्दिष्ट अज्ञानमय अगर स्वार्थपूर्ण भूमिकेपेक्षां कांहींशा उच्च मनोभूमिकेवरून, म्हणजे आपण जे हिंदु असावयास पाहिजे व ज्यापासून आपण अज्ञानानें, कपटानें अगर जुलमानें च्युत झालों होतों त्या स्वतःच्या पूर्वापारच्या क्षेत्रांत पुन्हा परत येणें या भूमिकेवरून--झाली असली तरी, ज्याला वास्तविक रीत्या धर्मांतर (Conversion) म्हणावयास पाहिजे अशा कोणत्याहि बौद्धिक अगर आध्यात्मिक अन्तराची स्पष्ट-अस्पष्ट देखील जाणीव या आजवर झालेल्या धर्मांतरांत अगर धर्मपरिवर्तनांत दिसून येत नाहीं. विशिष्ट दोन अगर जास्त धर्मांतील धर्मतत्त्वांचा तौलनिक अभ्यास करून बौद्धिक समाधानासाठींच व आध्यात्मिक कल्याणासाठीं बुद्धिपुरःसर ही धर्मांतून उच्च धर्मांत गेल्याचें दृश्य कौतुकपूर्ण दृष्टीनें पाहण्याइतकें दुर्मिळ आहे व आमच्या मतें तर हें दृश्य इतर धर्मांतून हिंदु धर्मांत येणाऱ्या कांहीं थोड्या व्यक्तींखेरीज इतरत्र पहावयास मिळणें जवळजवळ अशक्यच आहे. अद्याप निरनिराळ्या जागतिक धर्मतत्त्वांचा इतका सूक्ष्म तौलनिक विचार करणें जरूर आहे असें कोणास फारसें वाटत असावेसें दिसून येत नाहीं. येवढेंच नव्हे तर धार्मिक बाबतींत डोक्याला शीण देण्याचा काळ संपत आला आहे कीं काय अशीहि जबरदस्त शंका दिवसानुदिवस वाटूं लागली आहे. पण यांत आश्चर्य कसलें ? जेथें धर्माला केवळ हटवादयुक्त मतपंथापेक्षां अर्थच नसेल तेथें त्याच्या पोकळ बडेजावाला कळूं लागल्यावर कोण विचारणार ? व मग धर्माची व राष्ट्राची आणि सरतेशेवटीं धर्माची व व्यक्तिचीहि फारकत होण्याची पाळी आली तर तें क्रमप्राप्तच नव्हे काय ? धार्मिक कल्पनांचें खूळ समाजांतून घालवून देण्याकरतां बद्धपरिकर झालेले पुरुष थोर व कर्ते गणले जाण्याचें कारणहि या धर्मतत्त्वांच्या टिकाऊपणांतच शोधावयास नको काय ?

'जसा यक्ष तसा बळी' अशी एक जुनी म्हण आहे. तिचेंच प्रत्यंतर वरील परिस्थितींत दिसून येतें. सेवेच्या, प्रेमाच्या, शांततेच्या व विश्वबंधुत्वाच्या गोड नांवाखालीं जगावर यथेच्छ धुडगूस घालावयास मिळण्याची संधी पाहण्याचा ख्रिस्ती व इस्लामी धर्माचें कार्य सांप्रतच्या शांततोन्मुख जगांत शेवटास आलेसें झाल्यामुळें राष्ट्राची व धर्माची फारकत करण्याच्या गोष्टी धर्मांतील संस्कृतिप्रिय कर्ते पुरुष आतां बोलूं लागले आहेत, व वास्तविक पाहतां असें करण्यांत त्यांची जिवंत कर्तव्य निष्ठाच दिसून येते. हिंदुधर्माची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थिति या दृष्टीनें अत्यंत भिन्न आहे. हिंदुधर्म काळाच्या पावलावर पाऊल ठेवून चालत आला आहे व म्हणूनच त्याला सनातन असें सार्थ नांव देण्यांत आलें असून या त्याच्या सनातनत्वांत त्याचें चिरंतनत्व चिरस्थायित्व अन्तर्भूत आहे; आणि याच त्याच्या प्रगमनशीलत्वामुळें तो हिंदू समाजाला काळाच्या अन्तापर्यंत उद्धरून नेण्यास समर्थ आहे.

वैदिक काळच्या आर्यऋषींच्या मनोरचनें संबंधानें लिहितांना पाश्चात्य तत्त्ववेत्यांनीं व अभ्यासकांनीं हें कबूल केलें आहे कीं, तपशीलांना चिकटून न राहतां तत्त्वान्वेषण करण्यास लागणारी प्रगल्भ बुद्धिमत्ता आर्यऋषींच्या अंगीं खास होती. आणि त्याच बुद्धिमत्तेच्या जोरावर विश्वाच्या मूलतत्त्वाचें ग्रहण करणें त्यांना केव्हांच शक्य झालें असून पाश्चात्य पंडितांचा तेथवर पल्ला नुकताच कोठें पोहोंचत आहे. हिंदु धर्माची इमारत इतक्या खोल पायावर उभारली असल्यामुळें तिला जगांतील लहान सहान धडाधडीनें खिळखिळें होण्याचें वास्तविक कारण नाहीं. याच कारणामुळें हिंदुधर्म हा केवळ मतपंथ नसून तो मानवी संस्कृतीच्या उच्चतम स्थितीचा आदर्श आहे, आणि त्याच्याच एकाद दुसऱ्या अंगावर वेड्यावाकड्या उभारलेल्या इतर धर्मांच्या लहान सहान इमारती कालांतरानें कोसळून पडल्यानंतर त्यांच्या आश्रयाखालीं असलेल्या अन्य धर्मीयांना हिंदु धर्माच्या सर्वसंग्राहक मंदिरांत निर्भय असें स्थान मिळणें शक्य आहे. **जगांतून इतर सर्व धर्मांचें समूळ उच्चाटण झालें तरी त्यामुळें जगाची कसलीहि हानी होण्याचा संभव नाहीं. कारण हिंदुधर्म त्या सर्वांची नड भागविण्यास पूर्ण समर्थ आहे.**

भारतीय युद्धापर्यंतचा काळ हिंदु धर्माच्या पूर्ण भरभराटीचा होता हें सांगावयास नको. त्यानंतर बौद्ध धर्माच्या प्राबल्याला सुरवात होऊन त्यांतील तामसी निर्वाणाची राख हिंदु धर्माच्या तात्त्विकपणावर चढत जाऊन हिंदु धर्माचें तेज कमी होत गेलें. हा निष्क्रियतेचा काळ संपतो न संपतो तोंच सुमारें १० व्या शतकापासून हिंदुधर्मावर रजोगुणी व धाडशी अशा महमदीयांचे हल्ले सुरू झाले व १० व्या शतकापासून ते १७ व्या शतकापर्यंत म्हणजे पुरीं ७०० वर्षे हिंदुधर्माला इस्लामी धर्माशीं झगडत रहावें लागलें. श्री शिवाजी महाराजांच्या नंतर सुमारें १५० वर्षेपर्यंतचा काळ हिंदुधर्माच्या विश्रान्तीचा व पुनरुज्जीवनाचा काळ होय. पण त्यानंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लवकरच इंग्रजासारख्या धूर्त व व्यापारी ख्रिश्चनाशीं हिंदुधर्माचा संघर्ष झाला. याच सुमारास इकडे हिंदुस्थानांत ख्रिश्चन धर्माकडून हिंदुधर्माची लांडगेतोड होत असतां तिकडे ख्रिश्चनधर्माच्या स्वदेशांत म्हणजे युरोपात मात्र ख्रिस्ती धर्माची तेथील शास्त्रज्ञाकडून व चिकित्सकाकडून तंगडीमोड सुरू झाली व लवकरच इकडे हिंदुस्थानांतही हिंदुधर्मानें ख्रिस्ती मिशनऱ्यांचा कावा ओळखून त्यांना तोंड देण्याची मोहीम सुरु केली. ख्रिस्ती धर्माकडून होणाऱ्या आक्रमणाला अशा रीतीनें आळा बसणें फारसें कठीण झालें नाहीं. परंतु कांहीं ख्रिस्ताळलेल्या हिंदुधर्माच्या अन्तःशत्रूंनीं ख्रिस्तिधर्माला या देशांत कांहीं थोडें आयुष्यदान केलें त्याचप्रमाणें पाश्चात्य देशांत माजलेल्या धर्मशैथिल्याचा येथील सुशिक्षितवर्गांच्या मनावर परिणाम होऊन त्यामुळेंहि हिंदुधर्माची अवहेलना झाली. व त्यावरही अशा बिकट प्रसंगीं मुसलमानांच्या निरुपम ऐहिक स्वार्थाकडून इंग्रजी राजसत्तेच्या पक्षपाती तटाआडून हिंदुधर्मावर सांप्रत जे आघात होत आहेत त्यामुळें हिंदुधर्माची अत्यंत हानी होत आहे. मात्र अशा प्रसंगीं सुदैव एवढेंच कीं ज्याप्रमाणें शुक्लपक्ष सुरू होण्यास अमावास्या उलटून पार पडावी लागते त्याप्रमाणें हिंदुधर्मानें आपल्या जिवावरचे परमावधीचें संकट सोसून मागें टाकलें असून तो आतां जागा होत चालला आहे; आणि राजसत्ता प्रतिकूल असली तरी निश्चयानें जगण्याकरतां जरूर ती धडपड हिंदूधर्म आतां करीत आहे यांत शंका नाहीं.

अशा परिस्थितींत हिंदूंना आपल्या हिंदुत्वाचा खरा अर्थ कळावा आणि अहिंदूमध्येंहि स्वधर्मापेक्षां हिंदुधर्मांत काय विशेष आहे याची स्पष्ट जाणीव उत्पन्न करावी या दृष्टीनें पाहूं जातां असें दिसून आलें कीं, मराठी धार्मिक वाङ्मयांत हें कार्य करण्यास समर्थ असें चांगलेसें पुस्तक अस्तित्वांत नाहीं. विशेषतः हिंदू, ख्रिस्ती आणि मुस्लीम या तिन्ही धर्मांचा तौलनिक अभ्यास निःपक्षपात बुद्धीनें करून त्या तिन्ही धर्मांची परस्परसापेक्ष स्थिती दर्शविणारा आणि विवेचक बुद्धीच्या व सर्वसामान्य बुद्धीच्या वाचकासहि सारख्याच प्रमाणांत उपयुक्त होईल असा ग्रंथ मराठी धार्मिक वाङ्मयांत नाहींच नाहीं. ही अडचण लक्ष्यांत घेऊन ती दूर करण्याच्या दृष्टीनें पुणें येथील हिंदुमहासभेनें केसरीपत्राच्याद्वारें १०० रुपांचें जाहीर बक्षीस लावून "मी हिंदू कां रहावें व कां व्हावें?" या विष-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यावर निबंध मागविले होते. पण थोडी खेदाची गोष्ट कीं फक्त चारच निबंध आमचेकडे आले. यावरून धर्मांचा तौलनिक अभ्यास महाराष्ट्रांत कोणीं केलाच नाहीं असें म्हणावें कीं काय तें कळत नाहीं! असो. आमचेकडे आलेल्या निबंधापैकीं श्री. दा. न. शिखरे एम्. ए. यांचा निबंध, त्याची भाषाशैली, अधिकृत माहिती, विचारप्रगल्भता व निःपक्षपात विवरण, इत्यादि दृष्टींनीं परीक्षकांस पसंत वाटला तोच आज आम्ही मराठी वाचकांच्या हातीं पुस्तक रूपानें देत आहों.

हिंदुधर्माच्या उच्च स्वरूपाचें आविष्करण ग्रंथकर्त्यानें ग्रंथांत जितकें समर्पक केलें आहे तितकें अन्यत्र उपलब्ध नाहीं व हें स्वरूपाविष्कारण करतांना तें भावनेच्या मुस शीत क्षेत्रांतून न करतां युक्तिवादाच्या शांतताप्रधान क्षेत्रांतून करण्यांत ग्रंथकर्त्याची समतोल बुद्धि दृष्टीस पडते. ग्रंथकर्त्यानें हिंदुधर्माची जी तौलनिक वस्तुस्थिति ग्रंथांत प्रतिपादन केली आहे तिकडे वाचकांच लक्ष्य वेधेल अशी आमची पूर्ण समजूत आहे. विशेषतः हिंदु धर्माच्या वैशिष्ट्याची जी यादी ग्रंथकर्त्यानें दिली आहे ती फारच महत्त्वाची असल्यामुळें तिकडे चिकित्सक बुद्धीनें पाहण्याची आम्ही आमच्या वाचकास शिफारस करतों. इतर विवरणाबद्दल सामान्य दृष्ट्या असें म्हणतां येईल कीं, ग्रंथकर्त्यानें स्पष्ट केल्याप्रमाणें हिंदुधर्म हट्टवादरहित, पूर्ण प्रागतिक स्वरूपाचा असून, विशेषतः जीव जगत् व जगदीश्वर यांचे परस्पर संबंध निश्चित करण्यांत म्हणजे तात्त्विक विचारविकासांत तो अन्यधर्मास अजिंक्य आहे.

ही ज्याप्रमाणें हिंदुधर्माची विचार दृष्ट्या स्थिती आहे त्याचप्रमाणें आचार दृष्ट्या भिन्नभिन्न अधिकारांच्या सर्व लोकांना ऐहिक व पारलौकिक सौख्याचा मार्ग दाखविण्याची व अशा रीतीनें जगांत परद्वेषरहित सर्वसंग्राहक वृत्ती वाढवून विश्वधर्माचें स्थान पटकावण्याची एकट्या हिंदुधर्माचीच पातता आहे हें लेखकानें आपल्या ग्रंथांत फार स्पष्टपणें सिद्ध करून दाखविलें आहे, व त्याचें अत्यंत सूक्ष्म बुद्धीनें मनन करण्याबद्दल आम्ही आमच्या वाचकास आग्रहाची विनंती करतों.

सरते शेवटीं हें मात्र स्पष्ट करणें जरूर आहे कीं हिंदुधर्म कितीहि श्रेष्ठ असला तरी सांप्रत तो भस्माच्छादित अग्नीप्रमाणें तेजहीन व विकृत भासत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. अर्थात् हा कालाचा महिमा होय. शिवाय कोणतीहि मनुष्यकृति चिरपरिपूर्ण असणें शक्य नाहीं.

या दृष्टीनें हिंदुधर्मावरची राखोडी झाडून टाकून त्याचें योग्य प्रकारें दीपन करून त्यास आपल्या प्रकाशांत अखिल जगास चालविण्यास समर्थ करणें हें कार्य याचवेळीं होणें जरूर आहे, व या प्रयत्नास जर प्रस्तुत ग्रंथाचे लेखक अगर अन्य कोणी हिंदुधर्माभ्यासी लागतील तर त्या योगानें हिंदु समाजावर फार मोठे उपकार होणार आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रंथकर्त्यांची प्रस्तावना

हिंदुधर्मावरील प्रस्तुताच्या पुस्तकाप्रमाणें सांप्रत हिंदुधर्मांहि संक्रमणांतून बाहेर पडत आहे. यावनी राजसत्तेपासून, किंबहुना बौद्ध कालापासून, सुरू झालेलें दक्षिणायन संपून गेलें आहे आणि उत्कर्षाचें उत्तरायण उदय पावत आहे. दैत्यांची रात्र सुरू झाली असून देवांचा दिवस उगवला आहे. उत्साहाचीं किरणें फांकलीं आहेत, धर्मप्रेमानें आकाश रंजित झालें आहे. सहकार्याचे प्रभातवारे मंदशीतल वाहूं लागले आहेत, गळून पडलेली शुद्धीकरणाचीं पानें पुनः फुटूं लागलीं आहेत. आणि वृक्षावृक्षावरून ऐक्याचें मंजु मधुर गीत निनादत आहे. दिशा उजळल्या आहेत, प्रसन्नता पसरत आहे आणि दिनमणि वर वर येत चालला आहे. काळोख हटला आहे, घूत्कार थांबला आहे आणि विरोधकांनीं स्वतांला उलटें टांगून घेतलें आहे. खडबडणारे अंतःशत्रु बिळांत शिरले आहेत, उघड हल्ला करणारे गुहांत दडले आहेत आणि निशाचरांचीं मस्तकें फांसावर लटकत आहेत. आत्मप्रत्यय जागृत झाला आहे, स्वसंरक्षणाची सिद्धता पूर्ण आहे, व परप्रतिकाराचें शस्त्रागार सज्ज होत आहे. मुचकुंद जागा झाला आहे आणि काल्यवनाकडे नजर टाकीत आहे. हिंदुधर्माचा वामनावतार संपुष्टांत आला असून वैदिक कालांतील मूळचें विराट स्वरूप हिंदुधर्म पुनः धारण करीत आहे आणि सर्व जगाला दिशा दाखवीत आहे. भारतवर्षच काय, पण अखिल जगत् हिंदुधर्माचे चरणीं लागत आहे व अभ्युदयनिःश्रेयस साधत आहे.

हिंदुधर्माचें हें सर्वश्रेष्ठ महत्त्व अनादि कालापासून त्याला कसें व कशामुळें प्राप्त होत गेलें हें जसें पुढील ग्रंथांत दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे, त्याप्रमाणें अन्य धर्मांचें कस त्या शेजारीं लावले असतां त्यांची प्रत कोणती लागते हा तौलनिक विचारहि त्यांत केलेला आहे. कारण प्रत्येकाला आपलाच धर्म साहजिकपणें सर्वांत उत्तम असा वाटतो व त्या दृष्टीनें पाहूं गेल्यावर सर्वश्रेष्ठत्वाचे गुणहि त्याला तेथें दिसूं लागतात. परंतु सत्य निवडून काढावयाचें असेल त्याला अशी एकांगी दृष्टि टाकून इतर धर्मांच्या तुलनेनें आपल्या धर्माची योग्यता पारखली पाहिजे. हाच सिद्धांत TYLOR नांवाच्या विद्वानानें पुढील शब्दांत स्पष्टपणें मांडला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

He who only knows one religion can no more understand that religion; than he who only knows one language can understand that language.

अशा तौलनिक धर्माभ्यासाची सांप्रत अत्यंत अवश्यकता आहे. साऱ्याच धर्मांत स्थिति अशी आहे कीं, जुन्या वळणाचे धर्माधिकारी लोक आपल्या धर्मापलीकडे पसरलेल्या जगावर नजर टाकीत नाहींत आणि आधिभौतिक शिक्षणाचे पंख फुटलेल्यांना तर काय--

निःस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः !

जुन्यांची दृष्टि अति कोती; तर नव्यांची फारच विशाल ! त्यामुळें प्रत्येक धर्माचीं खरीं तत्त्वेंच कळत नाहींत आणि हें अज्ञानच सर्व धर्मकलहांचें बीज आहे. तें नष्ट करण्यासाठीं प्रत्येकानें आपापल्या धर्माचा अभ्यास केला पाहिजे व त्याची सांगता करण्यासाठीं तो अन्य धर्मांशीं तोलला पाहिजे; तरच इहलोकीं व परलोकीं सौख्य प्राप्त होईल. हिंदुधर्मीयांवर तर ही जबाबदारी विशेष आहे. कारण सैतानाच्या कारवाईनें 'नष्ट झालेला स्वर्ग' हिंदुस्थान 'पुनः प्राप्त' करून घेत आहे. तो संक्रमणावस्थेंत आहे, यावेळीं जो 'स्वशक्त्या दान' करीत नाहीं, 'स दरिद्रो महापापी' ठरेल. तसें आपण ठरूं नये म्हणून प्रत्येक हिंदु सुशिक्षितानें आपल्या धर्माचा तौलनिक अभ्यास करावा-निदान गीता, बायबल व कुराण या ग्रंथत्रयाचा तरी व्यासंग ठेवावा; म्हणजे आपला सर्वश्रेष्ठ हिंदुधर्म विश्वधर्म झाल्याविना रहाणार नाहीं, अशी त्याची खात्री पटेल.

हिंदुधर्माच्या संक्रांतिसमयीं वर लिहिल्याप्रमाणें 'दरिद्री महापापी' ठरूं नये म्हणून पुढील ग्रंथ लिहिला आहे. त्याची रचना सिद्ध होण्यास जे कारणीभूत आहेत त्या हृदय-निवासी सर्वच सज्जनांचा नामनिर्देशहि येथें शक्य नसला तरी, हिंदुमहासभेचे अध्यक्ष श्री. भिलावशास्त्री, केसरीचे सह-संपादक श्री. वा. कृ. भावे, श्री. ज. स. करंदीकर, व श्री. के. ना. वाटवे एम्. ए., श्री. गो. म. जोशी, बी. ए. आदिक विद्वद्वर्यांनीं केलेल्या उदार साहाय्याबद्दल त्यांचें अंतःकरणपूर्वक आभार मानून 'आनृण्याची' अंशमात्र तरी जोड करून घेतल्यावांचून रहावत नाहीं.

पुणे मकरसंक्रमण शके १८५१ दामोदर नरहर शिखरे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

प्रकरण पहिलें--विश्वधर्माचा उदयकाल (पृ. १-३)

मानवी समाजाची पूर्णावस्था--तिच्या आगमनाचीं सूचक चिन्हें--विश्वधर्माचीं लक्षणें.

प्रकरण दुसरें--धर्माचें सामान्य स्वरूप (पृ. ३-८)

देवविषयक कल्पनेचा उदय--तिची उत्क्रांति ' धर्म ' शब्दाचे रूढ अर्थ--धर्माच्या व्याख्या--धर्माचें फल--त्याचें महत्त्व.

प्रकरण तिसरें--जगांतील प्रचलित धर्मांची स्थिति.(पृ.८-३०)

धर्मांचें तारतम्य--चार प्रमुख धर्म--त्यांची लोकसंख्या--हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लीम, धर्मांचा परस्परसंबंध.

बौद्ध धर्म--बुद्ध व रासेलस यांचें साम्यवैषम्य--बौद्धधर्माचें विचारप्राधान्य व अहिंसातत्त्व--त्यांतील नास्तिक्य व ' क्षणिक ' वाद--टॉलस्टॉयवर झालेला धर्माचा परिणाम--बौद्धधर्माचें वैगुण्य.

ख्रिश्चन धर्माच्या उदयापूर्वीची अव्यवस्था--त्याचें बौद्ध धर्माशीं साम्य-- ' गिरि-गीतें'तील शांतिपाठ, त्यांतील सत्तत्वें.

बायबलांतील विसंगति व असंभाव्यता-ख्रिश्चन धर्मावरील निट्शेचा वज्रप्रहार--ख्रिस्ताच्या अनुयायांचा दर्जा--ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराचा इतिहास-ख्रिश्चन धर्मावरील टॉल्स्टॉय, स्वामी दयानंद इत्यादींचे अभिप्राय

मुसल्मानी धर्मापूर्वीचा अरबस्थानांतील अनाचार-महंमदाचें स्वभावचित्र--त्याचें एकेश्वरी मत-मुस्लीम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मांतील समता, सामुदायिकता इत्यादि गुणविशेष--
' मुसलमान ' शब्दाचे अर्थ-महंमद हा शेवटचा देवदूत !
गिबनचें टीकास्त्र-इबनचें मत-कुराणाची योग्यता -धर्मप्रसाराचे आततायी उपाय-- मुस्लीम धर्माचें अंतिम साध्य---त्याला ' धर्म ' ही संज्ञा लावतां येईल काय ?

प्रकरण चौथें--हिंदुधर्माची रूपरेषा (पृ. ३०-४२)
बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लीम या धर्मांचें भवितव्य--' हिंदू ' शब्दाची व्युत्पत्ति--हिंदुत्वाच्या अकरा व्याख्या व त्यांची चिकित्सा---बॅ. सावरकरांच्या व्याख्येंतील दोष-लोकमान्यांच्या व्याख्येची व्यवहार्यता--तिच्यांतील वैगुण्य—
आमची हिंदुत्वाची व्याख्या—हिंदुधर्माचे प्रणेते अनेक, धर्मग्रंथ अनेक--त्यामुळें अनुयायांना विचारस्वातंत्र्य--वेदांच्या अपौरुषेयत्वाचें मर्म--हिंदुधर्माचें सर्वसंग्राहकत्व-येशू ख्रिस्ताची मर्यादा.

प्रकरण पांचवें--हिंदुधर्मरहस्य (पृ. ४३-५५)
हिंदुधर्माची प्राचीनतमता--ज्योतिःशास्त्र व भूस्तरशास्त्र यांचे पुरावे--चार वेदांचें स्वरूप--उपनिषदांबद्दल शोपेनहौरचें मत--मेकॉलेची कुत्सित टीका--उपनिषदांची तर्कशुद्धता--मॅक्समुल्लरचा अभिप्राय--षड्दर्शनांची अतुल्यता--प्रस्थानत्रयी.
स्मृतींचे विषय--मनुस्मृतीबद्दल नित्शेचें मत,--पुराणांचें रहस्य--रामायणभारतांचें महत्व- या धर्मग्रंथांतून गोंवलेलें अद्वैत मत--सगुणोपासनेचा इतिहास-दशावतारांचें रहस्य--मूर्तिपूजेची मीमांसा--अन्य धर्मांतील मूर्तिपूजेचीं स्वरूपें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण सहावें--हिंदुधर्माची व्यवहार्यता. (पृ. ५६-६६)

व्यक्तिहितापेक्षां समाजहित श्रेष्ठ असें हिंदु धर्माचें तत्त्व--म्हणून आनृण्याचा उपदेश-व्यक्तीला चतुराश्रम व समाजाला चातुर्वर्ण्य-पूर्वी एकच वर्ण-गुणांवरून वर्णनिश्चय--वर्णांतराचा प्रघात--जन्मावरून चातुर्वर्ण्य करण्याचीं कारणें-पुरुषसूक्तावरील गांवढळ टीका--त्याचें मर्म व महत्त्व-जातिभेदाचा बागुलबुवा-त्याच्या निवारणाची मर्यादा-चातुर्वर्ण्याचा जीर्णोद्धार-अस्पृश्यतेची जन्मकथा-गौरवर्णीयांच्या वर्तनाशीं तुलना--तिच्या निवारणाचीं कारणें.

हिंदुधर्मासंबंधीं विवेकानंदांचें मत- ' मी हिंदू कां ? ' याचीं महात्माजींनीं दिलेलीं कारणें-प्रो. जिनसीवाल्यांचे अभिमानोद्गार

प्रकरण सातवें--उद्यांचा हिंदुधर्म (पृ. ६६-७५)

हिंदुधर्माच्या बंधनाचें रहस्य--अन्य धर्मांचें शाक्तपंथीय स्वैराचरण-वाटण्याचीं कारणें व वाटविण्याचीं साधनें — धर्मांतराची फलश्रुति-शुद्धीचा इतिहास— तिला शास्त्राचा पाठिंबा-तिचे प्रसारक महात्मे— शुद्धीकृतांशीं वर्तन-हिंदुधर्मप्रसाराचें साहिष्णुत्व.

धर्मोपदेश करण्याचा हिंदुस्थानचा जन्मसिद्ध हक्क-हिंदुधर्माची सर्वश्रेष्ठता-त्याचा उज्ज्वल भविष्यकाल-' पसायदान '

परिशिष्ट १ लें—हिंदुधर्माचीं वैशिष्टयें (पृ. ७६-७७)

परिशिष्ट २ रें—हिंदुधर्माचीं कांहीं सामान्य लक्षणें (पृ. ७८)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

॥ ॐ ॥

सर्वश्रेष्ठ हिंदुधर्म

प्रकरण पहिलें

विश्वधर्माचा उदयकाल

प्राणीमात्राच्या जीवितव्यापाराचें एकमेव सूत्र म्हणजे सौख्य-शोधन. सुखाचा पाठलाग कितीहि केला तरी मानवी मनाचा असा एक विशेष आहे कीं, त्याच्या आशेचें पाऊल प्राप्तीच्या सदैव पुढेंच असावयाचें. या मनोधर्मामुळें मनुष्याचें मन प्राप्त परिस्थितींत कधींहि संतोष पावत नाहीं. मिळालेल्या स्थितींत संतुष्ट न रहाणारें हें मानवी मन सुखाच्या आशेनें भूतकालाकडे नजर टाकतें आणि तेथेंहि निराशेचा देखावा दृष्टीस पडल्यास कल्पनेच्या कुंचलीनें निरवधि भविष्यत्कालावर इच्छित चित्र निरंकुशपणें रंगवीत असतें. कांहीं लोक " आहे ही स्थिति चांगली नाहीं " असें म्हणून सद्यःकालाला कलियुग असें नांव ठेवून हिरमुसलेले राहतात आणि सर्व समाज पूर्णावस्थेला जेव्हां सर्वशः पोंहोंचलेला होता अशा ' रामराज्या'ची आठवण काढून झुरत असतात. उलट, कांहीं लोक वर्तमान स्थितीला नाकें मुरडणारे असले तरी मनुष्यप्राणी 'शतमुख विनिपाता'कडे धांवत नसून दिवसेंदिवस अधिकाधिक सुधारत आहे या उत्क्रांति-तत्त्वावर विश्वास ठेवून भावी ' सुवर्ण युगा'ची मार्गप्रतीक्षा आशावादीपणानें करीत आहेत. 'मानवी समाजाची पूर्णावस्था होऊन गेली कीं होणारी आहे?' हा प्रश्न एक कोडें होऊन बसणारा असला तरी सुवर्णयुगाच्या अवतरणाची कल्पना रम्य, आशादायक व क्रिया-प्रवर्तक असल्यानें बहुमान्य होत आहे. या सुवर्णयुगाच्या गंधर्वनगरीची रचना जो तो आपल्या स्थापत्य-ज्ञानाप्रमाणें चित्रित करतो हें जरी खरें असलें तरी बंधुता, समता, स्वतंत्रता या देवतात्रयीला तेथें वास्तव्य करावयास लावण्याला कोणी चुकत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें तर या उमलत्या सुवर्णयुगाची भूमिका ऐक्य ही आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक भाषा, एक वेष, एक धर्म—सर्वत्र एकता उत्पन्न करावयाची हें ध्येय आहे. आजकाल देश अनेक, भाषा विविध, रीतिभाति, आचारविचार, सर्वच बाबतींत जें नानात्व दृष्टीस पडत आहे, त्याचें अंतर्यामीं दडून बसलेलें एकत्व शोधण्यास व संस्थापिण्यास आज मानवी बुद्धि उत्सुक व उद्युक्त झालेली आहे.

जगाच्या सध्यांच्या लहानमोठ्या घडामोडींचें निरीक्षण करणाऱ्यास सद्यः-स्थितींत वाहणारें हें ऐक्याचें वारें भासमान झाल्याविना राहणार नाहीं. संघ आणि संघटना यांनीं आपलें पाऊल अडाणी अंतःकरणांतहि रोवलेलें आहे. जातिनिष्ठेची कोंडी फोडून जाणते लोक एकराष्ट्रीयत्वाच्या झेंड्याखालीं संमीलित होत आहेत. राष्ट्राराष्ट्रांतील भाऊबंदकीला मूठमाती देण्याचा विचार मुत्सद्दी करीत आहेत, आणि बंधुभावाची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठीं झटत आहेत. युयुत्सु वृत्तीला गति देण्यासाठीं देशोदेशींचे विद्वान् पुढें येत आहेत, आणि या सर्वांचा अध्वर्यु असा 'राष्ट्र-संघ' तर ऐक्यदेवतेच्या आवाहनाचे मंत्र जपत आहे.

या राजकीय अद्वैतापेक्षां धार्मिक ऐक्य सुलभ व म्हणून पूर्वीपासून आराधिलेलें आहे. प्रत्येक धर्मांतील सत्तत्वांचा समुच्चय करून एक धर्म सिद्ध करावयाचा व त्याच्या छायेखालीं सर्व जगाला आराम द्यावयाचा ही महत्त्वाकांक्षा धारण करणारे सम्राट भूतकालांत होऊन गेलेले आहेत. आजकालहि 'थिऑसफी' या नांवाखालीं भिन्नभिन्न देशांतील जिज्ञासु एकत्र जमून धर्म-तत्त्वांची चिकित्सा करीत आहेत. ॐकार, क्रॉस आणि अर्धचंद्र एकसंस्थ झालेले आहेत आणि त्यांचे अनुयायीहि कालांतरानें एकत्र होऊन सर्व जगती-तलावर प्रकाशमान होणाऱ्या एकाच सूर्यनारायणाप्रमाणें एकाच विश्वधर्माची उपासना करतील असें आशावादी भविष्य सांगितल्यावांचूनहि कळणारें आहे. प्रश्न आहे तो त्या विश्वधर्माच्या स्वरूपाचा.

कोट्यवधि किंवा परार्धावधि वर्षांनीं कां होईना पण ज्या कोण्या सु-वेळीं त्या विश्वधर्माचा प्रकाश सर्वत्र प्रसृत होणार, त्या वेळीं त्याची रूपरेषा कशी असेल याची अटकळ लोकमान्य टिळकांच्या पुढील सिद्धांतरूप वचनावरून बांधतां येईल. ते लिहितात:—

"प्रतिपाद्य विषय, प्राप्य फल व तत्प्रापक साधन ह्या तिन्ही गोष्टी ज्या धर्मांत उत्तम रीतीनें विचाराच्या कसोटीस उतरतील तो धर्म उत्तम होय"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हीं विचारमान्य त्रिविध लक्षणें सांप्रत ज्या धर्मांत अधिक अंशानें प्रतीत होत असतील त्याचेच अंगीं विश्वधर्मत्वाचें बीज आहे असें म्हणतां येईल. यासाठीं जगाच्या पाठीवर प्रचलित असणाऱ्या धर्मांचा तौलनिक विचार करणें जरूर आहे. हा विचार करतांना पर–धर्माची कुचेष्टा करण्याची आमची भूमिका नाहीं आणि आमच्या अंगीं मुरलेलें सहिष्णुताप्रधान हिंदुत्व आम्हांला तसें करूंहि देणार नाहीं. तथापि अपरिहार्य असेल तेथें दोष पुढें मांडून त्यावर टीका करणें हें प्रस्तुतचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य आचरीत असतांना आमच्या वाचकांना असें आढळून येईल अशी आमची खात्री आहे कीं, कोणत्याहि भावनेला अथवा विकाराला बळी न पडतां शक्य तेथें त्या त्या धर्मानुयायांच्याच मुखानें हें दोषदर्शन करण्याची खबरदारी घेतलेली आहे.

भावी काळांत अस्तित्वांत येणाऱ्या विश्वधर्माचें वाहन होण्यायोग्य कोणता प्रचलित धर्म आहे हें अनुमित करण्यासाठीं, धर्माच्या सामान्य स्वरूपाचा आतां विचार केला पाहिजे.

प्रकरण–दुसरें.

धर्माचें सामान्य स्वरूप.

आहारनिद्राभय इत्यादि विकार मनुष्याप्रमाणें पशूंतहि आहेत; मानवी समाजाला अधिक काय आहे तें धर्माचें नियमन. पशुत्वापासून फार दूर न गेलेला पहिला मानव शरीरानें जसा नंगा होता, तसाच मनानेंहि नग्न म्हणजे निर्बंधरहित होता. खाण्याची इच्छा झाली कीं खावें, पिण्याची इच्छा झाली कीं प्यावें, अशा वासना-तृप्तींत त्याच्या आयुष्याची इतिकर्तव्यता होई. कांहीं नवीन पाहिलें किंवा ऐकलें कीं आश्चर्यानें चकित व्हावें अथवा भीतीनें भेदरून जावें, अशी अर्भकाप्रमाणें त्याच्या मनाची कोमलता होती. या कोमलतेवर सृष्टि-चमत्कारांचा परिणाम विलक्षण होई. सूर्योदयापूर्वी गगनप्रदेश गुलाबी रंगानें उजळून निघालेला त्यानें पहातांच, या अलौकिक चमत्काराचे मागें कोणी तरी अतिमानुष शक्ति व्यापार करीत आहे अशी कल्पना त्या प्राथमिक मनुष्याचे डोक्यांत उद्भवली आणि त्या शक्तीला देवता समजून 'उषा' या नांवानें संबोधण्यास त्यानें सुरवात केली. शास्त्रीय दृष्ट्या या सृष्टिरहस्याची उपपत्ति लावण्याइतका त्यांचा बुद्धिविकास झालेला नव्हता. त्या सृष्ट चमत्काराला देवतेचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थान दिल्यानंतर त्यानें आपल्या कल्पनेच्या पोतडींतून तिचा रथ, तिचा वे
तिची शक्ति, मनुष्याच्या गरजेप्रमाणें सर्व साहित्यसामुग्री बाहेर काढिली
एवढेंच नव्हे तर बाहुलीशीं खेळणाऱ्या मुलीप्रमाणें, त्यानें उषेपाशीं धनधा
न्याची प्रार्थना केली, आणि आपल्याला सर्व प्रकारचें साहाय्य देण्याबद्द
आपल्या मानसकन्येला विनविलें! मेघांचा गडगडाट किंवा विजेचा क
कडाट ऐकून गर्भगळित झालेला तो पुराण पुरुष एकाद्या रौद्र देवाला कल्प
नेच्या कुशींतून जन्मास घालून त्याच्यापुढें किती नम्र होत असे हें ऋग्वेदाच
वाचकास सांगावयास नको. या भीतिजन्य नम्रतेचेंच रूपांतर भक्तींत झालें
वरुण वगैरे देवांना पुढें पुढें सृष्ट चमत्कारापासून विभक्त करण्यांत आलें त
नीतीचे नियामक या नात्यानें त्यांचें आसन स्थिर राहिलें आणि त्यांचेपा
धनधान्यपशूंची याचना व स्वहितपरनाशाची प्रार्थना, हे पूर्वोक्त प्रकार चा
राहिलेच.

निसर्गव्यापारांना देवत्व देण्याची प्रवृत्ति वाढत गेल्यानें 'जळीं स्थ
काष्ठीं पाषाणीं' सर्वत्र देव आहे अशी भावना मानवी मनांत उत्पन्न झाल
पृथ्वीला पादस्पर्श होतो म्हणून क्षमायाचना करण्याचा जो श्लोक प्रातःस्मरण
म्हटला जातो त्याचें बीजाहि हेंच. परंतु 'जें सर्वांचे शिरीं; तें कोणीहि न क
या नेहमींच्या अनुभवाप्रमाणेंच, सर्वत्र असलेला देव अतिपरिचयामुळें भक्त
कोठेंच नाहीं असें वाटूं लागलें. म्हणून एका सर्वश्रेष्ठ परमेश्वराची कल्पना
झाली; आणि यापुढें मनुष्याच्या बुद्धीचा जसाजसा विकास होत जाईल
सृष्टिलीलेची कोडीं ती जसजशी अधिकाधिक सोडवित जाईल तसतसें अस
मानव धर्मीय Anthropomorphic देवत्वाचें क्षेत्र आकुंचित होत जाई
आणि ज्या दिवशीं निसर्गाच्या एकोनएक व्यापारांचें आकलन होण्याइतकी मा
बुद्धि विकसित होईल, तेव्हां या देवांच्या साम्राज्याचें यथातथ्य स्वरूप प्र
होईल.याच विचारसरणीचा अवलंब करून जोसेफ मॅकेब या लेखकानें आप

Twilight of Gods या पुस्तकांत असा निर्णय दिला

"In losing God, we are discovering man."

परमेश्वर कर्ता करविता आहे असें न म्हणतां स्वतांकडे कर्तृत्व घेतल
मनुष्याचे शिरावरील जबाबदारी वाढते आणि तो आपल्या गुणांचा वि
करीत पूर्णत्वाप्रत पोहोंचतो हा त्याच्या म्हणण्याचा आशय. परंतु मेघ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नेची किंवा विद्युत्तेजाची उपपत्ति शास्त्रीय ज्ञानानें लावून त्यांची पूर्ण माहिती करून घेतली तरी ते प्रकार कां घडतात हें मनुष्याला समजणें अशक्य आहे असें पदार्थविज्ञानी विद्वानच सांगत आहेत. पंचमहाभूतांचें नियमन करणें मानवाला जोंवर साधलें नाहीं तोंवर त्याला त्यांची सूत्रचालक शक्ति मान्य करावीच लागेल. अखिल वस्तुजातांत खेळणारी ही जी शक्ति तीच मी आहें अशी अद्वैताची भावना झाल्याविना मनुष्य हा मर्यादितच रहाणार. ही अद्वैत वृत्ति प्राप्त झाल्यावर मात्र मनुष्यत्व हरपतें व धर्माची गरजहि सरते. परंतु येथपर्यंतचा मुक्काम गांठण्यास, विचारविकास करण्यास, धर्माची आवश्यकता अतिशय आहे.

सामान्य व्यवहारांत धर्म या शब्दाचा उपयोग विविध अर्थांनीं होत असल्यामुळें प्रस्तुत स्थलीं त्याचा कोणता अर्थ विवक्षित आहे हें येथें सांगणें अवश्य आहे. 'औषधींचा धर्म' या वाक्यप्रयोगांत गुण हा अर्थ अभिप्रेत असतो, तर 'स्त्रीधर्म' या शब्दांत कर्तव्य हा अर्थ धर्म शब्दानें व्यक्त केला जातो. 'अहिल्याबाईचा धर्मादाय' या शब्दसंहतींत धर्म शब्दानें दानाची कल्पना निर्दिष्ट केलेली असते; तर 'हिंदूंचा धर्म' या भाषा-प्रयोगांत आत्यंतिक दुःखविध्वंसाचा मार्ग हा अर्थ उद्दिष्ट असतो. पैकीं शेवटचा अर्थ येथें ग्राह्य आहे.

धर्म व्यष्टि-समष्टींचें इहामुष्मिक कल्याण साधणारा आहे हें त्याच्या व्युत्पत्तीवरूनहि स्पष्ट आहे.

'ध्रियते लोकोऽनेन, धरति लोकं वा।'

धृ=धारण करणें या धातूपासून धर्म हा शब्द सिद्ध झालेला आहे; आणि

धारणाद्धर्ममित्याहुः

या महाभारतांतर्गत व्याख्येवरून समाजधारणेचें धर्माचें कार्य व्यक्त होतें. व्यक्तीव्यक्तींतील संबंध सुसंलित ठेवण्यास आवश्यक अशा नीतीचा समावेश याच कारणास्तव धर्मांत केलेला आहे. या नीतीच्या आधारानें ऐहिक कल्याण म्हणजेच अभ्युदय धर्म मिळवून देत असतो आणि त्याशिवाय, पारलौकिक हित अर्थात् निःश्रेयस याचीहि जोड करून देण्याचें कार्य धर्म करीत असतो; म्हणूनच श्रीमत् शंकराचार्यांनीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः ।

अशी व्याख्या केलेली आहे. नीतीचीं मुळें तत्वज्ञानाच्या भूमिकेंत रुजलीं असलीं म्हणजे तिला धर्माचें स्वरुप प्राप्त होतें. समाजाचें ' चक्र प्रवर्तित ' ठेवणें एवढेंच धर्माचें कार्य आहे असें नव्हे, त्याबरोबरच त्यानें पारलौकिक कल्याणाचाहि मार्ग दाखविला पाहिजे.

केवळ इंद्रियांच्या इच्छा तृप्त करून घेण्यांत जीवितसाफल्य मानणें मानव प्राण्याला पशूप्रमाणें शक्य नाहीं. त्याच्या अंतःकरणांत बीजरूपानें वास्तव्य करणारी बुद्धि जसजशी अंकुरित होत जाईल तसतशी तिला, ' मी कोण ! मला व जगाला जन्म दिला कोणीं ? त्या जन्मदात्याची व माझी गांठ केव्हा पडेल ? कशी पडेल ? ' इत्यादि जिज्ञासेची पालवी फुटूं लागते. आणि तिला आत्मसाक्षात्काराचें फल लटकण्यासाठीं धर्माचें सिंचन सतत केलें पाहिजे. जीव-जगत्-जगच्चालक यांच्यासंबंधींच्या मनुष्य-सहज प्रश्न-परंपरेचें समाधान करण्याचें कार्य धर्माचें आहे. मनुष्या-मनुष्याचा व मनुष्या-ईश्वराचा संबंध पटविणारा म्हणजेच नीतीला तत्वज्ञानाचा पाठिंबा देणारा तो धर्म, अशी व्याख्या लो. टिळकांनीं पुढील शब्दांत केलेली आहेः—

" Dharma means our duties towards God and duty towards man. "

अशा द्विविध लक्षणांनीं अन्वित असेल तोच धर्म, आचार्यांनीं सांगितल्याप्रमाणें इहपरलोकीं अभ्युदय व निःश्रेयस यांची प्राप्ति करून देतो. धर्माचें हेंच फल मनूनें,

' इह कीर्तिमवाप्नोति प्रेत्य चानुत्तमं यशः

या शब्दांनीं निर्दिष्ट केलेलें आहे. अशाच धर्माच्या आधारावर समाजाचें आस्तित्व टिकतें व वर्चस्व वाढतें. हा धर्माचा पाया जर ढासळला तर दोरा तुटलेल्या माळेंतील मण्याप्रमाणें समाजाचें एक एक अंग अलग होऊं लागेल आणि मनुष्यप्राणी पाशवी आयुष्यक्रम आचरूं लागेल. हा धर्मशून्यतेचा परिणाम महाभारतकारांनीं पुढील श्लोकांत स्पष्ट केला आहे.

' अप्रतिष्ठे तमस्येतज्जगन्मज्जेदनिन्दिते ।
निर्वाणं नाधिगच्छेयुः जीवेयुः पशुजीविकाम् ॥ '

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मप्रदीप मालविल्यावरोवर सर्व जग अंधारांत बुडून जाईल आणि मनुष्याला पशूंचें दुःखद आयुष्य कंठावें लागेल; इतकें महत्वाचें स्थान मानवी जीवितांत धर्माला प्राप्त झालेलें आहे. पशूहून उन्नत करणारा, मनुष्यपद अचल ठेवणारा आणि देवस्वरूपाला पोंचविणारा धर्म हाच जगाचा आधार !

' धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा '

हें सत्य त्रिकालाबाधित आहे. जगताची प्रतिष्ठा असणारा हा धर्म मानवी जीविताचा सूत्रधार आहे. आणि म्हणूनच श्रेष्ठ लोक ' धर्मासाठीं मरावें ' असा उपदेश कंठरवानें करीत असतात, एवढेंच नव्हे तर धर्मरक्षणासाठीं दैहिक सौख्य किंवा ऐहिक ऐश्वर्य यांवर तिलांजलि सोडतात; फार काय आपले पंचप्राणहि अर्पण करतात !

राजवैभवाचें ताट पुढें वाढून आलें असतां केवळ हिंदु धर्माच्या अभिमानासाठीं स्वतांच्या प्राणांवर तुळशीपत्र ठेवणाऱ्या गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपति संभाजी महाराजांनीं धर्माचें आत्यंतिक महत्व हिंदुस्थानाला पटवून दिलेलें आहे ! आपल्या पंचप्राणांहूनहि प्रिय असणाऱ्या पुत्राचा देखतां डोळां वध पहाणाऱ्या, एवढेंच नव्हे तर, त्याच पोटच्या गोळ्याचें कोंवळें काळिज आपल्या तोंडांत कोंबलें गेलें तरी, हिंदुत्वाचा त्याग न करणाऱ्या बंदा-बहादुरानें

धर्माचें महिम्न-स्तोत्र

कृतीनें गाईलें आहे ! ! केवळ प्राचीन कालींच धर्माचा महिमा होता असें नव्हे तर सद्यःकालींहि--' स्वराज्य' या शब्दानें हिंदुस्थानचें वातावरण दुमदुमत ठेवणाऱ्या सद्यःकालींहि--अनेक धर्मवीरांनीं आपलीं नांवें इतिहासांत अमर करून ठेविलीं आहेत. स्वामी श्रद्धानंदजीसारख्या हुतात्म्यासंबंधीं तर सांगावयासच नको, पण राजकारणांत मुरलेल्या इतर हिंदी पुढाऱ्यांनाहि इंग्लंडनें जर उद्यां असा सवाल टाकला कीं, ' तुम्ही हिंदुधर्म सोडाल तर आम्ही तुम्हांला स्वराज्य देऊं; तर मग स्वराज्यसंपादनार्थ तुम्ही हिंदुधर्माचा त्याग करण्यास सिद्ध आहां काय ? ' तर अशा सवालाला हिंदुस्थान कोणता जबाब देईल हें हिंदुस्थानांत तरी सांगावयास हवें काय ? हिंदुस्थानांतच काय पण, स्वदेहयज्ञानेंहि स्वधर्मरक्षण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करणाऱ्या विशप-सप्तर्षींना जन्म देणाऱ्या इंग्लंडांत, त्या मार्टिन ल्यूथरच्या जर्मनींत, किंबहुना शतकानुशतकें धर्मयुद्धें खेळणाऱ्या युरोपांत, जगाच्या पाठीवरील कोणत्याहि सुसंस्कृत देशांत, वरील प्रश्नाचें उत्तर—मनुष्याच्या आयुष्यांतील धर्माचें स्थान—कोणी कोणास सांगावयास हवें काय ?

———

प्रकरण—तिसरें

जगांतील प्रचलित धर्मांची स्थिति.

धर्माचें तत्त्व म्हणजे गुहेंतील एक अज्ञेय वस्तु अशी जरी वस्तुस्थिति असली तरी नीति व तत्त्वज्ञान यांचा समावेश करणारा तो धर्म असें त्याचें सामान्य स्वरूप समजण्यास चिंता नाहीं. एवंगुणविशिष्ट धर्माचें उद्दिष्ट समाजाचें धारण-पोषण हें होय. प्रत्येक समाजाच्या प्रकृतिभेदानुसार, स्थलभेदानें व कालभेदानें, भिन्न भिन्न धर्मांचा उदय होत असतो. या सर्व धर्मांचे प्रवाह 'आकाशात्पतितं तोयं' या न्यायानें एकाच स्थलीं पर्यवसान पावावयाचे असले तरी त्यांच्यांतहि तर-तम-भाव आहेच. स्वामी विवेकानंदांनीं म्हटल्याप्रमाणें, 'प्रत्येक धर्मांत सत्य असतें हें खरें, तरी अगदीं रानटी मानलेल्या लोकांच्या धर्मापासून अगदीं सुधारलेल्या लोकांच्या धर्मापर्यंत जर आपण पहात गेलों, तर आपण अल्प सत्यापासून पूर्ण सत्यापर्यंत सारखे प्रवास करीत चाललों आहों असें दिसून येईल.' या प्रवासांत आपल्याला पहाणें एवढेंच कीं, अधिकांत अधिक सत्य कोणत्या धर्मांत समाविष्ट केलेलें आहे. अर्थात् सर्वाधिक सत्य सामावणारा धर्मच श्रेष्ठ ठरणार.

अशा तौलनिक विचाराच्या कक्षेंत प्रविष्ट करण्याजोगे धर्म जगाच्या पाठीवर चार आहेत. इतर लहान लहान समाजाचे धर्म अनेक असले तरी त्यांच्यांतील तत्त्वें हीं वरील चार धर्मांपैकीं कोणाची तरी संततिच शोभण्यासारखीं आहेत. पारशी हे आर्य असून त्यांचा धर्मग्रंथ जो अवेस्ता त्याचा हिंदूंच्या वेदांशीं निकट संबंध आहे हें 'अवेस्ता' व 'वेद' या दोन्ही शब्दांतील 'विद्' (जाणणें) या धातुवरूनहि सूचित होण्यासारखें आहे. पारशांची लोकसंख्या एक लाख असून ती हिंदुस्थानांतच आहे. स्वतंत्र विचार करण्याइतकें वैशिष्ट्य या धर्मांत जसें नाहीं तसेंच ऋषभदेवानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्थापिलेल्या जैनधर्मांतहि नाहीं. जैनांची लोकसंख्या अवघी तेरा लाख व ती केवळ हिंदुस्थानांत. स्वतंत्र विचार करण्याइतकें वैशिष्ट्य ज्या

चार धर्मांमध्यें

आहे, ते म्हणजे मुसलमान धर्म, ख्रिश्चन धर्म, बौद्ध धर्म व हिंदुधर्म. शिरगणतीच्या मानानें ख्रिश्चन धर्माला आद्य स्थान द्यावें लागतें. एक अब्ज चौसष्ट कोटी जगद्वस्तीपैकीं चौपन्न कोटि लोक स्वतांस ख्रिस्ताचे अनुयायी म्हणविणारे आहेत, सेहेचाळीस कोट बौद्ध आहेत, मुसलमानांची संख्या बावीस कोट आहे आणि हिंदु एकवीस कोट आहेत.

भाषेचा अपभ्रंश होऊन एकाच शब्दाचीं जशीं वेगवेगळीं रूपें होत जातात परंतु तीं रूपें भिन्न असलीं तरी त्यांचें नातें निरीक्षकास जसें समजून येतें; त्याप्रमाणें विचारासाठीं घेतलेल्या वरील धर्म-चतुष्टयांत एक सांखळी असल्याचें दिसून येतें. अभिमानी विद्वानांमध्यें कितीहि रणें माजत असलीं तरी आतां सामान्यपणें असें विधान करण्यास चिंता नाहीं कीं, सर्व धर्मांमध्यें हिंदुधर्म हा अत्यंत प्राचीन आहे. त्याच्याइतके उन्हाळे-पावसाळे खाऊन आजतागायत टिकून राहिलेला व भविष्यकाळाकडे आशेनें पहाणारा दुसरा धर्म पृथ्वीतलावर नाहीं. ज्येष्ठ अशा या हिंदुधर्माची घडी आपल्या मताप्रमाणें सुव्यवस्थित बसविण्यासाठीं बौद्ध धर्म जन्मास आला. यज्ञयागांतील हिंसाप्रधान कर्मकांडामुळें बुद्धाच्या मतें हिंदुधर्मावर आलेलें मालिन्य झाडून टाकण्याचें कार्य बौद्ध धर्मानें केलें. बौद्ध धर्म जसा हिंदुधर्माच्या पोटांतून बाहेर पडला, त्याप्रमाणेंच बौद्ध धर्माचीं कांहीं तत्त्वें उचलून त्यांच्या मुशींत ख्रिस्ती धर्म ओतला गेला. परलोकासंबंधींचें ज्ञान अगम्य आहे म्हणून त्याचा विचार करण्यांत कालक्षेप करूं नये असें जें बुद्धाचें मत होतें, तेंच ख्रिस्तानें स्वीकारलें. हिंदु धर्मग्रंथांनीं बायबलांतलि तत्त्वें चोरलीं असें निराधार विधान एकादा लॉरिन्सन ठोकून देवो; परंतु सत्यवक्ता इतिहास असेंच सांगत आहे कीं; येशू हिंदुस्थानांत आलेला होता, त्याची व बौद्ध भिक्षूंची गांठ पडली होती व पौर्वात्य धर्मतत्त्वांच्या शिदोरीवरच येशूनें आपला संसार युरोपांत थाटला. कांहीं ख्रिश्चन लेखकांच्या मतें येशू ‘ एसेन ’ मठांत (Essene Monastry) मध्यें गेला होता व तेथें पर्शियन धर्मतत्वांचा अभ्यास करून ‘ स्वर्गाचें राज्य ’

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

' प्रहारकापुढें दुसरा गाल करणें ' ' विवाहाचा तिटकारा ' इत्यादि प्रकारचें शुभवर्तमान त्यानें फैलाविलें. तो खुद्द हिंदुस्थानांत येवो किंवा त्याच्या सरहद्दीवर राहो, बायबलच्या प्रत्येक विवेचक वाचकाला खिस्तानें पौर्वात्यांची केलेली उसनवारी कबूलच करावी लागेल. निरभ्र आकाश, उष्ण हवा, पशूंचीं खिल्लारें, शेतकीचीं हत्यारें, विहिरीवरून घागरी भरून नेणाऱ्या स्त्रिया इत्यादिकांचें जें वर्णन बायबलांत आढळतें, तें पौर्वात्य देशांतीलच आहे हें कोणाहि अकलुषित दृष्टीचे वाचकास समजून येईल, **बौद्धःधर्माचा पाया जसा हिंदुधर्म आणि खिस्ती धर्माचें बीज जसें बौद्ध धर्मांत; त्याप्रमाणें मुसलमान धर्माचा उगम खिस्ती धर्मापासून झालेला आहे.** बायबलाप्रमाणें कुराणांताहि मरयमचा पुत्र ईसा आहे, सैतान आहे, आदम आहे, ईव्ह आहे, कियामतचा दिवस आहे—फार काय, डोळ्याबद्दल डोळा व दांताबद्दल दांत असलीं तत्वेंहि उभयत्र आहेत. अशा प्रकारचीं साम्य-स्थानें चिकित्सक बुद्धीनें पाहिलीं म्हणजे, ' कुराण ही नवीन गोष्ट नव्हे तर तें पूर्वग्रंथांचें सत्यत्व पटवितें ' ही कुराणांतील उक्ति विनयाची नसून बायबलचा आधार घेतल्याची कबुलीच आहे असें लक्षांत येतें.

दिव्यावर काजळी चढावी त्याप्रमाणें प्रत्येक धर्मावर कालांतरानें ग्लानीचें आवरण पडत असतें. तें काढून टाकण्यासाठीं धर्म-संरक्षक विभूति जन्मास येत असतात. हिंदुधर्मामध्यें अशी जी संतपरंपरा निर्माण झाली, तिनें हिंदुधर्मांतच राहून त्याचा जीर्णोद्धार केला ही महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ज्या महात्म्यांचा लढा हिंदुधर्माच्या मूलभूत तत्वांशींच होता, त्यांना त्यांतून फुटून बाहेर पडण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. अशा महात्म्यांमध्येंच गौतम बुद्धाची गणना केली पाहिजे. विचार-प्राधान्य हें बौद्ध धर्माचें वर्णनीय वैशिष्ट्य आहे. स्वतः बुद्धाचा स्वभावच बुद्धिप्रधान व विचारी होता; आणि म्हणूनच त्याचें जीवित-कार्य यशस्वी झालें. त्याचें चरित्र उठून दिसण्याकरितां रासेलसची पार्श्वभूमिका संलग्न पाहिजे. रासेलस आणि सिद्धार्थ-म्हणजेच बुद्ध-दोघेहि राजपुत्र, दोघेहि राजविलासांत लोळणारे, दोघांनाहि दुःखाचें दर्शन दुर्लभ केलेलें, परंतु तेथें वैचित्र्य व नावीन्य नसल्यामुळें दोघांनाहि वीट आलेला; दोघेहि कस्तूरीमृगाप्रमाणें सुख-सुगंधासाठीं धांवपळ करूं लागलेले-फरक काय तो परिणामांत-भावनाशील रासेलस हात हालवीत परत आला, पण सिद्धार्थाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्थ सिद्ध झाला, सुखाचा शोध स्वतांमध्यें लागला आणि गौतम बुद्ध धर्म-संस्थापक बनला ! त्याचा धर्मीहि असा भाग्यवान् कीं त्यानें अशोकासारख्या सम्राटाला कुरवाळून आपल्या दृष्टिपातानें कोट्यवधि लोकांना अनायासें आपलेसें करून घेतलें.

बौद्धधर्माला हें जें भाग्य लाभलें त्याला त्याच्या अंगचे कांहीं गुणच कारणीभूत आहेत. विचाराला पटेल तेंच मान्य करावयाचें हें ब्रीदवाक्य सुसंस्कृत व बुद्धिप्रधान मनुष्याला बौद्धधर्माच्या पंखाखालीं घेऊं शके. बौद्धधर्म हा अत्यंत बुद्धिवान् माणसांसाठींच आहे असें सांगून नित्शेसारखे तत्वज्ञानी त्याचें स्तुतिस्तोत्र गातांना असेंहि म्हणण्यास कमी करीत नाहींत. कीं, ‘ Buddhism is the only properly positivist Religion’ बौद्ध शब्दाची व्युत्पत्तिच ‘ बुद्धया निर्वर्तते स बौद्धः ’ अशी विचार-प्राधान्य दर्शविणारी आहे. पण या विचाराची तार इतकी दूरवर ताणण्यांत आली कीं, ईश्वराचें अस्तित्वच बुद्धानें अमान्य केलें. ‘ सर्व क्षणिक आहे, प्रत्येक अणु-परमाणु क्षणाक्षणाला बदलत आहेत ’ असें असमर्थनीय व तर्कविरोधी मत त्यानें प्रसृत केलें. नास्तिक्याचा व त्या ‘ क्षणिक ’ मताचा खरपूस समाचार हिंदु तत्ववेत्यांनीं व वैशेषिकांनीं घेतलेला आहेच. मौज ही कीं, देव नाहीं म्हणून गरजणाऱ्या व देवतेची पूजा न करणाऱ्या बौद्ध लोकांनीं बुद्धाला मात्र देवतांचे षोडशोपचार अर्पण करण्यास कमी केलें नाहीं ! देव नाहीं म्हणणारा बुद्धच देव होऊन बसला! आणि मूर्तिपूजेचा पायंडा घालता झाला! आस्तिक्य उध्वस्त करणाऱ्या ‘ लेनिनचा कोपरा ’ प्रत्येक रशियन शाळेंत पूजिला जातो त्यांतलाच हा प्रकार !

आस्तिक्याबरोबरच जातिभेदालाहि बुद्धानें अर्धचंद्र दिला. पण गंमत ही कीं, त्याच्या स्वतांच्या धर्मांतच वैभाषिक, सौत्रांतिक, योगाचार व माध्यमिक असे चार भेद उत्पन्न झाले ! तसेंच यज्ञादिकांच्या नांवाखालीं जी हिंसा होत असे तिच्या विरुद्ध त्यानें बंड उभारलें. ज्ञानप्राधान्य व अहिंसा ही दोन सत्तत्वेंच बौद्धधर्माच्या प्रचंड प्रसाराला कारणीभूत होत. परंतु सर्वसंग्राहक हिंदुधर्मानें हीं दोन्ही तत्वें आपल्या अंगीं पचविलीं असल्यानें बौद्धधर्मांत अभिवृद्धिकारक असें वैशिष्टय आतां राहिलें नाहीं. बौद्धांच्या त्या ‘ प्रार्थना-चक्रांची ’ गति दिवसेंदिवस मंदावत जाईल व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचे ते भिक्षुभिक्षुणींचे ' विहार ' ओस पडत जातील. कारण, आत्मा व परमात्मा यांच्यासंबंधीं ज्या धर्मांत विचार केलेला नाहीं, त्यांत इतर कितीहि उदात्त तत्वें समाविष्ट केलेलीं असलीं तरी त्यांच्याकडे कोण धांव घेईल ? ' हें जग शाश्वत आहे कीं नाहीं ? ' अशी शंका एकाद्यानें विचारल्यास बुद्ध मौन धारण करी आणि ' आपण मेल्यावर आपल्याला कोणती स्थिति प्राप्त होणार ?' असा स्वाभाविकपणें उद्भवणारा प्रश्न जिज्ञासूनें विचारल्यास तो कानांवर हात ठेवी ! आपल्या अनुयायांच्या मनांत असमाधानाची चुटपुट कायम ठेवणारा धर्म कोणा विचारशील मनुष्याला स्वीकरणीय वाटेल ? कोणताहि साधक धर्माच्या आश्रयाला जो जातो तो, मनांतील शंकाकुशंकांची खवखव निघून जावी, व ऐहिक तापत्रयांत होरपळून निघत असतांना मनाला अखंड शांति व अढळ सुख लाभावें म्हणून. ' सुख पहातां जवापाडें व दुःख पर्वताएवढें ' हा अनुभव सर्वांनाच येत असतो; त्याच्या उलट अनुभव देऊन चिरसौख्याची जोड करून देण्याचें कार्य धर्म करीत असतो. हा सिद्धान्त स्पष्ट करणारें उत्कृष्ट उदाहरण टॉलस्टायचे आहे. त्यानेंच म्हटल्याप्रमाणें, प्रेमळ पत्नी, विपुल संपत्ति, जोमदार आरोग्य, स्पृहणीय कीर्ति, तेजस्वी अपत्यें, इत्यादि सर्वविध सुख-साधनें अनुकूल असतांहि टॉलस्टॉयच्या मनाला असमाधान वाटत असे--इतकें कीं, बंदुकीच्या गोळीनें किंवा फासाच्या दोरीनें आत्महत्या करण्याचा विचार त्याच्या मनांत येई. परंतु या अ-विचारापासून त्याचा जर कोणीं बचाव केला असेल तर आत्मसाक्षात्काराच्या तळमळीनें ! त्याला ईश्वराचें ज्ञान झालें व आपलें आयुष्य ईश्वरमय आहे असें वाटूं लागलें. धर्माचें कार्य हें ! ईश्वरविषयक ज्ञान अर्पण करून साधकाला दुःखाच्या मगरमिठींतून सोडवील तो धर्म. इमर्सन जी प्रशंसा करतो ती अशाच धर्म-बुद्धीची. तो म्हणतो.

Religious sentiment is a mountain air
It is the embalmer of the world.
It is the beautitude of man.

या दृष्टीनें विचार केल्यास बौद्ध-धर्माला विश्व- संजीवक (' embalmer of the world ') असें म्हणतां येईल कां ? आत्मा, परमात्मा, इहलोक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परलोक, या धर्मांच्या मूलतत्वासंबंधीं असमाधान अविच्छिन्न ठेवणारा बौद्धधर्म सर्वश्रेष्ठ आहे असें कोणता निःपक्षपाती मनुष्य म्हणूं शकेल? 'सर्वस्य संसारस्य दुःखात्मकत्वं सर्वतीर्थिकरसंमतम्' असें सुखदुःखमिश्रित जगाचें वर्णन करणाऱ्याकडून अनुयायांना लाभ कोणता होणार? नीतिची चाड न बाळगणारा धर्म सर्वमान्य कसा होईल? बौद्धधर्माच्या साक्षात् संस्थापकालाहि सत्य हें सत्य म्हणून प्रिय नव्हतें तर त्यापासून स्वतांचें कल्याण होतें म्हणून प्रिय होतें. नीतिनियमापेक्षां उपयुक्ततावादाला प्राधान्य देण्याचा बुद्धाच्या वृत्तीचें एक मासलेवाईक उदाहरण असें आहे कीं, प्रसेनजित नांवाच्या राजाला आपला प्रधान आपल्या पत्नीशीं व्यभिचार करतांना आढळला म्हणून त्यानें त्या प्रधानाला बंदिवासांत टाकलें आणि त्याला कोणती शिक्षा करावी म्हणून धर्म-संस्थापक अशा भगवान् बुद्धाला विचारलें. त्यावर बुद्धानें प्रश्न केला, 'तो प्रधान बुद्धिमान व राज्यकारभाराला आवश्यक आहे काय?' राजाचें होकारार्थी उत्तर ऐकून या धर्म-संस्थापकानें त्या प्रधानाला मुक्त करण्याचा सल्ला दिला! ऐहिक सौख्याप्रीत्यर्थ नीतिमत्तेला पायाखालीं तुडविण्यास त्यास दिक्कत वाटली नाहीं! त्याला स्वतांला ईश्वराची, वेदांची व ब्राह्मणांची मनसोक्त निंदा करण्यांतहि कांहीं वावगें वाटलें नाहीं. म्हणून कांहीं ग्रंथकार, 'ज्ञानसंचयाचा द्वेष्टा व अडाणी लोकांच्या टोळींत बसून ज्ञानी वर्गाची चेष्टा करणारा' असें हीन व निंद्य स्वरूप गौतमबुद्धाचें रेखाटीत असतात. प्राचीन कालीं उपयुक्त असणाऱ्या कांहीं तत्वांच्या आकर्षणानें कोट्यवधि लोक बौद्धधर्माकडे खेंचले गेले असले तरी त्यांतील अंगभूत वैगुण्यामुळें त्याला भविष्यकाळाचा पाठिंबा मिळणें शक्य नाहीं.

फांदीला फांदी फुटावी त्याप्रमाणें बौद्धधर्माच्या आधारावर जो खिस्तीधर्म उत्पन्न झाला, त्याचा विस्तार अल्पावधींतच इतका प्रचंड झाला कीं, त्याच्या छायेखालीं जवळजवळ अर्धें जग आज विसावत आहे. अशा जोरानें ख्रिस्ती धर्म फोफावण्याची छलबलादि जीं बाह्य कारणें आहेत त्यांचा विचार पुढें करण्यांत येणार आहे. प्रस्तुत स्थलीं ख्रिस्ती धर्माच्या अंगभूत गुणावगुणाची छाननी करावयाची आहे. जरी ख्रिस्ती धर्मानें रक्तानें शिंपडलेल्या मार्गानेंच प्रवास केलेला असला, आणि जरी खुद्द येशु, 'came not to send peace, but a sword' असें अभिमानानें गरजत असला तरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केवळ समशेरीच्या लखलखाटांत किंवा कपटाच्या संधिप्रकाशांत ख्रिस्ती धर्मानें जगभर संचार केला, असें म्हणतां येणार नाहीं. या अधम साधनांखेरीज अनुयायांना आपल्याकडे आकृष्ट करण्यासारखें स्वयंभू महत्व ख्रिस्ती धर्मामध्यें आहे. येसू जन्माला येण्याचे पूर्वी अधर्माचें इतकें प्रबल अभ्युत्थान झालेलें होतें कीं, " प्रार्थनालयें म्हणजे निव्वळ लुटारूंच्या गुहा " बनलेल्या होत्या. ही धर्मग्लानि झाडून काढण्याला स्वतांस समर्थ करण्यासाठीं येशूनें चाळीस दिवस उपवास केला, आणि बौद्ध भिक्षूकडून ज्ञान संपादन केलें. येशू व बुद्ध यांच्या उपदेशांतच साम्य आहे असें नव्हे तर त्याची जन्मकथा, चमत्कार इत्यादि गोष्टींतहि आहे अशीं एकावन्न सादृश्यस्थलें 'सेडेल' नांवाच्या ग्रंथकारानें दाखविलेलीं आहेत. पिता पुत्र पवित्रात्मा ही जी त्रिपुटी सध्या ख्रिश्चन धर्मांत बोकाळलेली दृष्टीस पडते, तिला बायबलचा मुळींच आधार नसून इ. स. ८०० पासून हिंदुधर्मांतील ब्रह्माविष्णु महेश यांची ती एक नक्कल सुरु केलेली आहे असें विद्वानांचें मत आहे. आणि आल्बर्ट जे. एडमंडस हा विद्वान स्पष्टपणें सांगतो कीं, ख्रिस्तानें बुद्धाची मदत घेतली. सेंट ल्यूकला बुद्ध-महाकाव्यांची माहिती होती. ' पौर्वात्य परिस्थितीची बायबलान्तर्गत वर्णनांचीं उदाहरणें मागें नमूद केलेलीं आहेतच. शिवाय, बुद्धानें भिक्षूंना ' द्रससीलम् ' या नावांखालीं केलेल्या दहा आज्ञा येशूच्या ' Ten commands ' ची आठवण देतात, बौद्धांचें 'पातिमोक्ख' म्हणजे स्वपातकनिवेदन वाचून खिस्त्यांच्या confession चें स्मरण होतें आणि बुद्धाचें ' सत्यचतुष्टया ' वरील काशींतील प्रवचन ऐकून येशूचें ' पर्वत-पुराण ' ध्यानीं येतें. अशीं उज्ज्वल व आकर्षक तत्वें मनन्नाच्या द्वारें आपल्या अंगीं मुरवून येशूनें ' गिरि-गीते ' च्या (sermon on the mount) योगानें लोकांना सौजन्याची व नीतीची शिकवण दिली. तत्कालीन समाजांत तंट्याबखेड्यांचें जें विष भिनलें होतें, त्यावर उतारा म्हणून त्यानें शांतिपाठ म्हटला.

Ye have heard that it hath been said, An eye for an eye, and a tooth for a tooth. But I say unto you, That ye resist not evil; but whosoever shall Smite thee on thy right cheek, turn to him the other also. '

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या शब्दांत येशूनें ' तुझ्या एका गालांत लगाविली तर दुसरें गालफड पुढें कर ' असा उपदेश केला. शिवाय कोणालाहि–प्रत्यक्ष भावालाहि ' अरे वेड्या ! ' अशीं दुरुत्तरें बोलूं नयेत, त्याच्यावर राग धरूं नये असें सांगून त्यानें त्याला अशी भयंकर शिक्षा सांगितली आहे कीं,

Whosoever shall say, Thou fool, shall be in danger of hell-fire.

' शेजाऱ्यावर किंबहुना शत्रूवर प्रीति कर ' ' आत्मवत् सर्वभूतेषु ' वाग इत्यादि शांततेचे मंत्र-पाठ करून त्याच्या सिद्धीसाठीं ' सर्वस्वाचा त्याग करा ' हा विरक्तीचा उपाय पढविला.

ज्या काळीं ज्याची भूक, तेंच त्यानें दिल्याकारणानें त्यावेळीं त्याच्या अनुयायांची संख्या फुगत–पसरत होती हें साहजिक आहे. परंतु आजकालहि जे परधर्मी लोक ख्रिस्त–सेवक होतात, त्यांपैकीं पुष्कळांचें हेतु द्रव्याभिलाष, विषयोपभोग वगैरे हीन स्वरूपाचे असतात हें खरें असलें तरी त्यांपैकीं कांहीं लोकांना–अज्ञानामुळें असो कीं विपरीत ज्ञानामुळें असो–खरोखरच ख्रिस्तीधर्माचें श्रेष्ठत्व पटत असतें याचें कारण येशु ख्रिस्तानें बुद्धधर्मांतून ख्रिस्ती धर्मांत घेतलेलीं कांहीं खरो-खरीचीं सत्तत्त्वें हीं होत. त्यांपैकीं दोन प्रधान तत्वें म्हणजे, परमेश्वर हा सर्वांचा पिता आहे व सर्व माणसें परस्परांचीं भावंडें आहेत. Fatherhood of God & Brotherhood of man अशी कल्पना सामान्य मनुष्याच्या मनाला द्विविध समाधान देते. परमेश्वराचें पितृत्व परलोकासंबंधींचें भय नष्ट करून आपल्याला मरणोत्तर सौख्य मिळणार असा विश्वास उत्पन्न करतें आणि मानवी बंधुत्वामुळें समाजांत समतेची प्राणप्रतिष्ठा होते. इतर व्यवहारांत वरिष्ठांच्या टांपेखालीं चिरडणारा मजूर एकदां कां ' चर्च ' मध्यें शिरला कीं, सर्वसत्ताधीश सम्राटाच्या बरोबरीनें वागूं शकतो. निदान तत्वतः तरी असें समाधान प्राप्त होण्याचा संभव ख्रिस्ती धर्मांत आहे अशा आशेवर पुष्कळ त्रस्त व तप्त जीव ' मज ख्रिस्ती धर्म कुठें आहे सांगा ' अशी ' अभंग ' विनवणी करीत बाप्तिस्म्याचे शीतल तुषार आपल्या अंगावर उडवून घेतात. आणि नंतर ' येशूचें नाम गोड फार । दीनाला लागतें । ' असें गीत गात हिंडतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ख्रिस्ती धर्मात अठरा पुराणांचें कडबोळें किंवा तेहतीस कोटी देवांचें मध-पोळें नसून सर्व कांहीं विवेचक बुद्धीला संमत होईल असेंच आहे, असें मत ज्या कोणाचें असेल त्यानें बायबलचें वाचन चिकित्सक दृष्टीनें करावें आणि सध्यांचे काळीं ख्रिस्ती धर्माचे अनुयायीच त्या धर्मांतील जी व्यंगें चवाट्यावर आणीत आहेत, त्यांचा विचार करावा. जगाच्या उत्पत्तीची जी हकीकत बायब-लमध्यें दिलेली आहे ती शास्त्रीय ज्ञानाच्या कसोटीस उतरणारी नाहीं. आणि मानवप्राण्याची कुळकथाहि निखालस चुकीची आहे, असें सप्रमाण सिद्ध करून देणारे ख्रिस्तशिष्य पाश्चात्य देशांतच निर्माण होत आहेत. ‘ ही अखिल सृष्टि सहा दिवसांत उत्पन्न करून परमेश्वर एक दिवस विश्रांति घेतां जाहला’ ही बायबलची वाणी कोणीहि शास्त्रीय सत्य मानीत नाहीं. तसेंच, मानवप्राण्याची उत्पत्ति म्हणजे (Product of sin) पापाचें फल ही कल्पना कोणालाहि त्याज्यच वाटणार. ईश्वराचा आज्ञा–भंग करून आदमईव्ह या ‘ जगतः पितरौ’ नीं ज्ञान–फल भक्षण केलें, याबद्दल सर्व मनुष्य जातीला दुःख व मृत्यु हा दंड भोगावा लागत आहे. परंतु या अपराधाचें प्रायश्चित म्हणून कुमारी–पुत्र जो येशू त्यानें आपल्या देहाचा बलि दिला व सर्व ख्रिश्चनांना मोक्षाचा दरवाजा उघडून ठेवला. या बायबलोक्त कथेंतील सुसंगतपणा मिशन-ऱ्यांशिवाय कोण सांगू शकणार ? पाप आदमचें, दंड मानव–जातीला, प्राय-श्चित घेतलें येशूनें आणि त्यामुळें सर्वांस अपराधाची क्षमा ! असला न्याय म्हणजे सोम्यानें खून केला म्हणून गोम्याला शिक्षा फर्मावावयाची आणि राम्यानें फांशीं जाऊन गोम्याला शिक्षामुक्त करावयाचें अशापैकींच होय ! ! त्याप्रमाणेंच, पुनरुत्थापनाचे दिवशीं साऱ्या थडग्यांतून मृत आत्मे खडबडून उठावयाचे अशी कल्पना–समुद्राच्या तळीं, व्याघ्रसिंहाच्या उदरीं, युद्धाचे स्थलीं–अशा ठिकाणीं मेलेल्या प्राण्यांचें काय होणार हें शुभवर्तमान त्या बिचाऱ्यांस कोण सांगेल ?–आणि मग तो आकाशांतील बाप ’ ‘ प्रकाशाच्या लेंकरांच्या ’ पापपुण्याची झडती घेणार आणि शिक्षा किंवा बक्षीस देणार, येशूच्या कळपांत शिरलेल्या मेंढरांना नंदनवनांत चरावयास मिळणार व तदितर लांडग्यांना नरकाग्नींत पिचत पडावें लागणार ?––येशूच्या आधीं ज्या हजारों हजार पिढ्या होऊन गेल्या त्यांना नंदनवन मिळणार नाहींच म्हणावयाचें !–अशा जगाच्या आद्यंताच्या कल्पना कोणत्या तर्कप्रधान मनुष्याला पटतील ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परमेश्वराची ओळख हवी असेल तर त्याच्या पुत्राची मध्यस्थी असलीच पाहिजे अशी मनोदास्याची हास्यास्पद अट जशी खिस्ती धर्माची कोती वृत्ति दाखविते, त्याचप्रमाणें स्वर्गद्वाराच्या किल्ल्या अजून पीटरच्या हातीं असून तो खिस्त्यांशिवाय इतरांना मज्जाव करतो अशी असहिष्णु समजूत त्या धर्माची संकुचित बुद्धि दर्शविते.

परमेश्वराचा साक्षात्कार हेंच जर धर्मसेवनाचें फल आहे, तर सर्वांभूतीं सर्वांठायीं, जळींस्थळीं एकच ईशत्व ओतप्रोत भरून राहिलें असें उदार तत्त्व प्रतिपादणारा हिंदुधर्म श्रेष्ठ कीं, 'गाईला आत्मा नाहीं परधर्मी लोकांचें तारण नाहीं' असें संकुचित व असहिष्णु मत प्रसृत करणारा खिस्त धर्म श्रेष्ठ ? ही विशाल दृष्टि व ही उदार वृत्ति म्हणजे धर्माचा प्राण होय. तिच्या विरहित असणारा कोणताहि धर्म—मग तो संख्याबलानें कितीहि पुष्ट असो किंवा त्याचे अनुयायी कितीहि उच्च ऐहिक ऐश्वर्यानें नटलेले असोत—हीन प्रतिचाच ठरणार. बाबा पदमजीसारख्यांनीं खिस्ती होण्याचा एक फायदा असा सांगितला आहे कीं, त्याच्या स्वीकारानें पूर्वधर्मातील महाराला पूर्वधर्मातील ब्राह्मण—कन्येशीं लग्न करतां येतें ! इहलौकिक व वैषयिक लाभालाभावरून धर्माची उच्चनीचता अनुमित करावयाची नसते, एवढें साधें तत्त्व देखील त्या 'बाबा' ला कळलें नाहीं ! पण हें 'बाबावाक्यं प्रमाणं' मानून कांहीं अज्ञानी लोक वाटतात ही केवढी दुःखाची गोष्ट !

नीति व तत्त्वज्ञान हीं जीं धर्माचीं प्रधान अंगें त्यांचा विचार केला असतां खिस्ती धर्म हिणकस ठरतो. त्या धर्मातील ईश्वरविषयक कल्पना किती टाकाऊ आहे, हें नित्शे नामक प्रसिद्ध तत्त्वज्ञान्यानें आपल्या 'खिस्तान्तक' (Anti-Christ) या पुस्तकांत पुढील शब्दांत सांगितलें आहे.

The christian concept of God is one of the most corrupt concepts of God, ever arrived at on earth.

खिस्ती धर्मातील नीतिविचाराबद्दल त्याचें मत नमूद करण्यासारखें आहे. तो म्हणतो:—

In christianity neither morality nor religion is in contact with any point of actuality.

२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ईश्वराची कल्पना व नीतीचे विचार एवढेंच ख्रिश्चन धर्मांतील वैगुण्य आहे असें नव्हे; तर त्यांत चांगलें असें फार थोडें आहे. आणि जें कांहीं चांगलें किंवा उन्नत आहे तें पौर्वात्य देशांतून उसनें घेतलेलें आहे असें स्पष्ट मत नित्शेनें लिहून ठेविलें आहे. असा उसना चांगला भाग वगळला तर ख्रिस्ती धर्म अगदीं टाकाऊ आहे. येशूला सुधारणा व सुसंस्कृतता यांची तोंडओळख्वहि नव्हती; जें जें उच्च, उन्नत व उदात्त होतें त्यांवर घाव घालणारा आणि मनुष्याच्या विचारशक्तीला उध्वस्त करणारा असा हा ख्रिश्चन धर्म आहे. बायबलामध्यें व्यक्त होणारा ईश्वर "बालिश, दरिद्री, अल्पज्ञ, अखाडमल्ल, कपटी, जंगली, मांसाहारी व कसाई" आहे असें स्वच्छ मत स्वामी दयानंदांनीं ठसठशीतपणें मांडलें आहे. त्या धर्माला स्वच्छतेची आरोग्यनिर्बंधाचीहि चाड नाहीं. परधर्मीयांचा छळ करणें ही ख्रिश्चन धर्माची शिकवण. अशा स्वरूपाच्या धर्माला जे अनुयायी मिळाले ते साहजिकच अधम व हत्याप्रिय ('Beasts of prey') येशूकडे ज्यांनीं धाव घेतली ते म्हणजे आत्मज्ञानासाठीं तळमळणारे मुमुक्षु होते असें नव्हे; उलट हलकट, नीच, अधम, यांनींच त्याचा आसरा घेतला हें पॉलनें लिहिलेल्या, The base things of the world did God choose. या वाक्यावरून, किंवा त्याहून स्पष्टपणें 'All that ever came before me are thieves and robbers' या जॉननें येशूच्या मुखांत घातलेल्या शब्दांवरून प्रतीत होईल. असे हलक्या प्रतीचे अनुयायी सुद्धां येशूला आरंभीं फारसे मिळाले नाहींत. ख्रिस्तमृत्यूनंतर तीनशें वर्षांत रोमन साम्राज्यांतील दहा कोटी लोकांपैकीं दहा लाख देखील अनुयायी येशूला करतां आले नाहींत. कारण त्या **धर्माला उच्च तत्त्वज्ञान किंवा श्रेष्ठ नीतिमत्ता यांचा आधार नाहीं. जें कांहीं एकादें सत्तत्त्व आहे तें बौद्धधर्म ग्रंथांतील किंवा 'तालमूद' ग्रंथांतील.** पुनरुत्थानादि सर्व सिद्धांत 'तालमूद' नामक धर्म ग्रंथांतून जसेच्या तसे उचलून बायबलांत समाविष्ट केलेले आहेत. या उसनवारीमुळें व हीनतेमुळें ख्रिश्चन धर्म आपल्या पायांनीं कधींच चालू शकला नाहीं. शांतिब्रह्म (Prince of peace) येशूच्या धर्माला तरवारीचा आधार घेऊनच प्रवास करावा लागला. ज्या ज्या देशांत ख्रिश्चन धर्माचें पाऊल पडलें तेथें तेथें त्याचा क्रमशः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतिहास असाच आढळतो कीं, आधीं दारु, नंतर धर्म व मग शस्त्रांच्या साहाय्यानें राज्य यांचा शिरकाव ख्रिश्चनांनीं केला. **मागेंपुढें बाटली–बायबलाचा आधार असल्याविना बायबलाचा डोलारा उभा रहावयाचाच नाहीं** ! विहिरींत पाव टाकून गांवच्या गांव बाटविणें अथवा अंगावर शहारे उभे रहातील अशा वर्णनाचे छळ किंवा खून करुन येशूचा कळप वाढविणें इत्यादि प्रकारच्या पोर्तुगीजांच्या आसुरी लीला लोकप्रसिद्धच आहेत. शिक्षण, रुग्णशुश्रुषा, अनाथरक्षण, इत्यादि जीं शुभकृत्यें मिशनऱ्यांनीं केलीं त्या सर्वांच्या बुडाशीं धर्मप्रसार हा एकच हेतु, बोरांतील तक्षकासारखा, वळवळत होता हें विसरुन चालणार नाहीं. येशूनें आपल्या अनुयायांना केलेला

"Behold, I send you forth as sheep in the midst of wolves; be ye therefore wise as serpents and harmless as doves."

हा उपदेश कोणीकडे व तदनंतरचे मिशनरी कोणीकडे ! या कोंकरांनींच लांडग्यांना खावयास आरंभ केला ! ! सर्पाप्रमाणें ते वर्तले पण शहाणपणांत नव्हे तर दुष्टपणांत ! आणि अशा मिशनऱ्यांना व त्यांमार्फत ख्रिस्तीधर्मखात्याला दरसाल एकेचाळीस लाख रुपयांचा खुराक देणारी हिंदी नोकरशाही आपण धर्मांचे बाबतींत उदासीन आहों अशी शेखी मिरविण्यास कमी करीत नाहीं तें नाहींच !

अशा छलबलादि सूक्ष्मासूक्ष्म साधनांनीं धष्टपुष्ट झालेली ख्रिस्त्यांची संख्या पाहून ख्रिस्ती धर्माची थोरवी मानणें योग्य होणार नाहीं. तसेंच, ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यामुळें युरोपियन राष्ट्रें आजकाल जगाच्या आघाडीस आहेत, वैभवानें संपन्न झालीं आहेत आणि इतर धर्मांच्या राष्ट्रांवर ताबा चालवीत आहेत ही कल्पनाहि भ्रामक आहे. ख्रिस्ती धर्मांत तसा गुण कोणताच नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, युरोपियन लोक ख्रिस्ती धर्माप्रमाणें चालत नाहींत; किंबहुना त्यांनीं **धर्माला राजकारणाचा एक हुजऱ्या** करुन सोडला आहे. टॉलस्टॉयसारख्या महात्म्यानें स्पष्टपणें म्हटलें आहे कीं, ख्रिश्चन धर्म तेथील तत्त्वज्ञांना संमत नाहीं व इतर लोकांना आवश्यक वाटत नाहीं, म्हणून ते आपल्या मिशनऱ्यांमार्फत ही धर्माची अडगळ वसाहतींत किंवा परतंत्र देशांत पिटाळीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतात ! पृथ्वीच्या पाठीवर ख्रिस्ती धर्माचे खरे शत्रू जर कोणी असतील, तर हे ख्रिस्ताचे अनुयायीच ! धर्मतत्त्वांना गौणत्व देऊन इहलोकचें सुख व शरीराचे चोचले यांनाच सर्वस्व मानण्याचा कल पाश्चात्य लोकांचा आहे, हें त्यांच्यापैकींच एकानें पूर्व-पश्चिमेचा विरोध दाखवितांना पुढील वाक्यांत मोठ्या मार्मिकपणानें सांगितलें आहे --

" In West, philosophers think that man is body and he has soul; in East, they feel man is soul and he has body. "

ख्रिश्चन धर्माची योग्यता ही. धर्मामध्यें तत्वें उच्च नाहींत, त्याचे अनुयायी सुसंस्कृत नाहींत व जे आहेत ते धर्माप्रमाणें वागत नाहींत. ईश्वर, नीति यांचा विचार नाहीं, स्वतांचें असें सत्तत्त्व नाहीं, आणि धर्मप्रसाराला छल-बलाविना जोर आलेला नाहीं.

बायबलांतील वचनांचा मार्मिकपणें विचिकित्सा करून स्वामी दयानंद सरस्वती यांनीं आपल्या ' सत्यार्थप्रकाश' या ग्रंथांत येशूसंबंधानें पुढील साधार व विचार्य मत लिहून ठेवलेलें आहे:—

'येशू हा सुताराचा मुलगा असल्याकारणानें लांकडें फोडणें, त्यांची चिरफाड करणें, तोडजोड करणें हाच त्याचा वास्तविक धंदा. परंतु लहर आली, कीं मी ह्या अडाणी देशांत पैगंबर व्हावें. बस्स, मग काय उशीर, लागला गप्पाष्टकें झोडायला ! तेथील लोक जंगली होते, त्यांनीं त्याचें सर्व म्हणणें ब्रह्मवाक्य मानलें. आतां पाश्चात्यांना ख्रिस्ताचें अगाध ज्ञान कळून चुकलें आहे, तथापि व्यवहार व खोटा देशाभिमान, धर्माभिमान, वगैरे दुराग्रहांत ते फसले आहेत एवढेंच.'

असें स्वरूप-कथन करून स्वामीजी शेवटीं उपदेश करतात:--

'पाश्चात्यांनीं हट्टास न पेटतां सर्वथा सत्य अशा वेदमार्गाचा अवलंब करावा.'

या उपदेशाबद्दल जरी कोणाचें भिन्न मत होणारें असलें तरी ख्रिस्ती धर्माची नाडी पाहून स्वामीजींनीं जी चिकित्सा केलेली आहे ती निःसंदिग्धपणें सत्य आहे. यशूख्रिस्ताचें ध्येयबाईट होतें असा शेरा मारून निष्कर्ष म्हणून नित्शे सांगतो,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'Christanity has been the greatest misfortune hitherto of mankind.'
खिस्ति धर्म म्हणजे मानवजातीचें एक प्रचंड दुर्भाग्य होय, असें सांगून खिश्चन धर्माचीं व्यंगें, छिद्रें व वैगुण्यें बाहेर काढल्यानंतर नित्शेनें त्या धर्माचा खरपूस व यथास्थित समाचार घेतलेला आहे. तो वाचनीय असला तरी प्रस्तुत स्थलीं तो उध्दृत करण्याचा मोह आवरला पाहिजे. पुस्तकाच्या शेवटीं दोन्ही हात उभारून तार स्वरानें खिस्ती धर्माला शिक्षा ठोठावतांना त्यानें काढलेले उद्गार तेवढे देऊन पुढील विषय–प्रवासाला आरंभ करूं. त्याची ज्वालामुखी लेखणी लिहिते:—

"I am at the conclusion and pronounce my sentence. I CONDEMN Christanity. Christanity has made a worthlessness out of every value, a lie out of every truth, a baseness of soul out of every straightforwardness. It CREATED states of distress in order to perpetuate itself eternally, drinking out all blood, all love, all hope for life. I call christanity the one great curse, one immortal blemish of mankind."

सत्याला असत्य करणाऱ्या, नीतीला अनीति बनविणाऱ्या व उच्चत्वाला तुच्छतेप्रत नेणाऱ्या, आयुष्याचें सर्वस्व हरण करणाऱ्या, आणि मानव जातीला शापभूत, कलंकभूत व दुदैवभूत झालेल्या खिश्चनधर्माला विश्वधर्माची पात्रता येणें शक्य आहे असें ना. शास्त्र्यांसारख्या "लंडनच्या नागरिका" शिवाय दुसरें कोण म्हणेल ?

जी स्थिति खिश्चन धर्माची, तीच बहुतांशीं मुस्लिम धर्मांची. ज्या परिस्थितींत, ज्या कालांत, ज्या उपदेशाची लोकांना अत्यंत आवश्यकता होती, तोच कथन केल्याकारणानें इस्लाम धर्मांचे अर्धचंद्राखालीं लक्षावधि लोक गोळा झाले आणि युरोप व आशिया या दोन्ही खंडांतील बराचसा भाग त्याचे प्रकाशाखालीं आला. या धर्मांचें कालनिरपेक्ष व स्वयंसिद्ध महत्त्व अजमावण्यापूर्वीं महमदाची फत्ते होण्याचीं तत्कालीन कारणें लक्षांत घेतलीं पाहिजेत. इस्लामापूर्वीं अरबस्थानांत अव्यवस्था आणि अनाचार यांचें थैमान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालू होतें. मुलगा प्रत्यक्ष सावत्र आईशीं लग्न लावीत असे. बाल-हत्या जारीनें चालू होती. मद्यपानाचा अंमल मोकाट सुरू होता, अनेक लग्नें करणें हा आचार होऊन बसला होता, भावनाशून्य मूर्तिपूजेचें बंड पसरलें होतें आणि एकंदरींत सर्व समाज अंधारांत चाचपडत होता. म्हणून जो कांहीं प्रकाश मुस्लीम अर्धचंद्रानें पाडला तोंच लोकांना प्रिय झाला. तो प्रकाश ज्या द्वारानें आला तो हजरत महंमद पैगंबर असामान्य पुरुष होता हें निःसंशय.

महंमदाचें शरीर रुबाबदार व भाषण विलक्षण छाप पाडण्यासारखें असून त्याच्या हास्यांतहि एक जादू असे. खजूर, दूध, अशा सात्त्विक आहारानें सत्त्वशुद्धि करून घेतलेला महंमद अत्यंत प्रेमळ अंतःकरणाचा असे. लहान मूल दिसलें कीं तो त्याचे मटामट मुके घेई इतकें वात्सल्य त्याच्या अंतःकरणांत नांदत असे. तो कोणालाहि शिवी देत नसे. संतापानें अतिशयच लाल झाला तर कडकांत कडक म्हणजे 'पडो रे तुझ्या टाळक्यावर चिखल!' अशी शिवी तो देई. तो सत्ताधीश झाला तरी रंकांच्या झोंपड्यांत जाई आणि कंगालांना प्रेमानें वागवी. त्यानें स्वतां तरवारीला कधीं स्पर्श केला नाहीं असें म्हणतात आणि त्याच्या चित्ताला राज्यलोभानें कधीं स्पर्श केला नाहीं असें सांगतात. तो 'हिरा' नामक गुहेंत एकांतवासांत मनन करीत असे. अशा सत्त्वस्थ पुरुषानें उपरिवर्णित परिस्थितींत जो उपदेश केला तोहि समाज-धारणेला योग्य असाच. त्यानें आईशीं विवाह, बालांची हत्या, मद्यपाननृत्य इत्यादि प्रकारचा अनाचार बंद करण्याचा प्रयत्न केला. दारूवर त्याचा कटाक्ष विशेष. चारांपेक्षां अधिक स्त्रियांशीं विवाह करूं नये असा त्यानें निर्बंध घातला. माणसें, पांखरें, जनावरें इत्यादिकांच्या तीनशें साठ मूर्ति मक्केंतील 'काबा' नांवाच्या देवळांत गर्दी करून राहिल्या होत्या; त्यांचा उच्छेद महंमदानें केला, आणि एकेश्वरी मताचा उद्घोष केला.

'लाईला इलल्हा, महंमद रसूल लिल्हा'

म्हणजे ईश्वर एक आहे, अद्वितीय आहे व महंमद हाच त्याचा पैगंबर आहे, हा महामंत्र म्हणजे इस्लामी धर्माचा केवळ प्राणच! खुद्द महंमद आपल्या बोटांत 'महंमद, ईश्वराचा प्रेषित' अशीं अक्षरें कोरलेली रुप्याची

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आंगठी घालीत असे. या महामंत्रातील पूर्वार्ध कोणालाहि पटण्यासारखाच आहे. महंमदानें एकेश्वरी मताच्या गौरीशंकरापर्यंत जी उच्च मरारी मारली त्या योगें बहुत लोक मोहित झाले. या एकमेव ईश्वराची प्राप्ति करुन घेण्याची त्यानें जीं चार साधनें सांगितलीं तींहि सोज्वळ अशींच आहेत. नमाज म्हणजे उपासना, रोजा म्हणजे उपवास, जकात म्हणजे दान, व हज म्हणजे यात्रा—हें तें **साधन–चतुष्टय**. यासंबंधीं मुसलमानांची श्रद्धा अशी आहे कीं, उपासना भक्ताला ईश्वराच्या निम्या रस्त्यावर नेते, उपवास त्याला ईश्वरी प्रासादाच्या दारापर्यंत नेऊन सोडतो आणि दानाच्या योगानें आंत प्रवेश मिळतो. हा श्रद्धेचा भाग सोडला तरी उपवास आणि यात्रा या साधनांनीं शरीराची शुद्धि संपादन करावी आणि उपासना व दान या उपायांनीं मनाची उन्नति साधावी हा सरळ उपदेश कोणाला पटणार नाहीं ? या तात्त्विक श्रेष्ठतेपेक्षां समाजाला आकृष्ट करणारी व्यवहार्यता महंमदी धर्मांत अधिक यशोदायक ठरली. मशिदींतील सामुदायिक प्रार्थना वगैरे आचारधर्मामुळें मुसलमानांत संघशक्ति दृढ स्वरुपाची उत्पन्न झालेली आहे. तसेंच, ख्रिश्चन धर्माप्रमाणें मुस्लीम धर्मानें समाजाला समतेचें अधिष्ठान मिळवून दिलें आहे. उपाध्याय-वर्गाला या धर्मांत स्थान नाहीं. बरोबरीच्या भावनेनें सर्व मुसलमान-बंधु धर्ममंदिरांत वागूं शकतात आणि संघशक्तीनें धर्मकार्यें करीत असतात. **सामुदायिकपणा व व्यवहार्यता** या दोन दृश्य गुणांमुळें मुसलमानी धर्माला बळकटी आलेली आहे. या धर्माची व त्याच्या संस्थापकाची उजळ बाजू अशी भडक असल्या-कारणानें हिंदु कायद्याखालीं नांदत असूनहि, बोहरी, खोजा हे लोक महमदाला ईश्वराचा अवतार मानतात !

मुसलमानी धर्माचें उज्ज्वल अंग तें हें आणि इतकेंच. यापेक्षां अधिक खोलांत शिरल्यास मुसलमानी धर्माचा दर्जा बराच खालीं असलेला आढळतो. हिब्रूंच्या भाषेमध्यें मुसलमान या शब्दाचा अर्थ ढोंगी असा आहे आणि इस्लाम या शब्दाचा मूळचा अर्थ ‘ आपल्या मित्रांना शत्रूंच्या हवालीं करणारा दगलबाज ’ असा आहे. पुढें त्या अर्थांत बदल होऊन, ‘ आपल्या मित्रांना ईश्वराच्या हवालीं करणारा म्हणजे भक्त ’ असें गोंडस स्वरुप प्राप्त झालें व त्यावरुन इस्लाम म्हणजे शांतता, इस्लाम म्हणजे ईश्वराज्ञापालन इत्यादि पुटें पुढें पुढें त्यावर चढविलीं गेलीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्व धर्मांचें अंतिम ध्येय असलेलें मुसलमानी तत्त्व म्हणजे एकेश्वरी मत सर्वांना संमत होण्यासारखें असलें तरी, 'महंमद हाच परमेश्वराचा दूत आहे, दुसऱ्या धर्मांचे संस्थापक देवाचे दूत नव्हत-फार काय, महंमदापूर्वी अनेक देवदूत होऊन गेलेले असले तरी तो सर्वांत शेवटचा देवदूत आहे, यापुढें महंमदानंतर देवदूत म्हणून पृथ्वीवर जन्मास येणार नाहीं!—महंमदाची कुल-मुखत्यारी नाकारणारे ग्रंथ जाळून टाकावेत'—हा मुस्लीम महामंत्राचा उत्तरार्ध कडव्या मुसलमानांशिवाय कोणाला पटेल? सूर्याप्रमाणें परमेश्वराचें तेज दाहीं दिशांना सहस्रकरांनीं पसरत नसून तें केवळ महंदाच्या झरोक्यांतूनच खालीं उतरतें हें म्हणणें अत्यंत कोतेपणाचें आहे. या कोत्या वृत्तींना अनुलक्षूनच स्वामी विवेकानंदांनीं '**महंमदी धर्माचे अनुयायी अत्यंत आकुंचित बुद्धीचे आहेत**' असे सत्योद्गार काढले.

खुद्द महंमदानें उपदेशिलेलीं तत्त्वें पाहिलीं तर तीं त्यानें जीं कांहीं थोडीं-बहुत सत्तत्त्वें ख्रिस्ती धर्मापासून उसनीं घेऊन उपदेशिलीं, त्यांच्या विरुद्ध अशीं होतीं. त्यानें एकेश्वरत्वाचा मंत्र उच्चारला; आणि त्याच्या उलट अनेक देवतांचा संदेश कुराणांत सांगितला. या विसंगतीचें समर्थन करणें मुसलमानांना भाग पडतें! पुनरुत्थानाचे दिवशीं सारे मृत आत्मे थडग्यांतून उठावयाचे हें ज्यानें सांगितलें त्याच महंमदानें लढाईत आपल्या लोकांनीं शौर्य गाजवावें म्हणून असें लिहून ठेविलें कीं, युद्धांत पतन :पावणाऱ्या इस्लामी वीरांना नंदनवनांतले सुखोपभोग मिळणार, उलट शत्रूंना मात्र नरकाग्नींत जळत रहावें लागणार! तसेंच मूर्तिपूजेवर हत्यार उपसणारा महंमद, पण मक्केतील देवळामधील कृष्णपाषाण त्यानें शाबूद ठेविला व मूर्तिपूजेचा निखारा आपल्या अस्तनींतच ठेवून दिला. खुद्द महमदाचे वैयक्तिक आचरण विशेष स्पृहणीय नव्हतें. परंतु त्याच्याशीं व्यक्ती या दर्जानें आम्हांस कांहीं कर्तव्य नसल्यानें त्या बाबत लिहून आम्ही आपली लेखणी विटाळूं इच्छीत नाहीं.

गिबन नामक जगप्रसिद्ध इतिहासकार आपल्या 'रोमन साम्राज्याचा ऱ्हास व नाश' या सर्वमान्य ग्रंथांत म्हणतो,

Mahamad was perhaps incapable of dictating a moral and political system for the use of his country men.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महंमदाला नीतिमत्तेचा उपदेश करण्याची पात्रता नव्हती हें मत परधर्मी लेखकच प्रतिपादतात असें नसून खुद्द महंमदाचा अनुयायी इब्न इशाक हाहि असेंच ठांसून सांगतो कीं,

'महंमदाला नीति, आत्मा परमात्मा इत्यादिबद्दल विचार यांची माहिती नव्हती.

एका मुसलमानांचें हें लिहिणें इतर मुसलमानांनीं विचारांत घ्यावें! वस्तुस्थिति अशी आहे कीं, सबंध कुराणांत नीतीचें किंवा तत्त्वज्ञानाचें उच्च वारें कोठेंच खेळत नाहीं.

'जिवावरचा प्रसंग आल्यास स्वधर्म लपवावा'

असे नीतिपाठ व काफरांची कत्तल करावी असे ज्यानें शांतिपाठ शिकविले त्याबद्दल गिबन काय, इब्न काय—कोणी झालें तरी असेंच लिहिणार.

कुराणांत नीति किंवा तत्त्वज्ञान यांचा खोल विचार मुळींच केलेला नाहीं. महंमदाचें चरित्र,—त्याच्या लढाया, चमत्कार–यांनींच बरीचशी जागा अडविलेली आहे. जगदुत्पत्तीचें वर्णन, बायबलप्रमाणें सहा दिवसांत पृथ्वी रचिली इत्यादि तर्काला अग्राह्य असेंच आहे. 'और किया सूर्यचंद्रको। सदैव फिरनेवाले' असलीं असत्य विधानें केलीं. म्हणजे मौज ही कीं 'तालमूद' व बौद्धग्रंथ यांच्यांतून कांहींतत्त्वें बायबलनें घेतलीं आणि त्यापैकींहि कांहीं भाग कुराणानें घेतला. कुराणांत कायदेविषयक विवेचन कोठें कोठें आलेलें आहे. पण तें अपूर्णता, अव्यवस्था व परस्परविरोध या त्रिदोषांनीं पीडित आहे. म्हणून गिबनतें कुराणामध्यें,

Endless incoherent rhapsody of fable, and precept and declamation, which seldom excites a sentiment or an idea, which sometimes crawls in the dust and is sometimes lost in the clouds.

कुराणाचा सूक्ष्मपणें अभ्यास करून स्वामी दयानंद असाच अभिप्राय देतात. ते म्हणतातः—'पुनरुक्तिदोषांचें कुराण म्हणजे जणूं भांडार होय. हें पुस्तक न ईश्वरकृत, न विद्वानरचित न विद्यायुक्त असें आहे. अल्पसा सत्यांश सोडून दिल्यास बाकी सर्व अविद्यात्मक, भ्रमोत्पादक मनुष्याच्या आत्म्यांना पशुवत् बनवून सोडणारें, शांतताभंगकारक व उपद्रव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माजवून मनुष्यामनुष्यांत द्रोह पसरविणारें व परस्परांना दुःखसागरांत बुडविणारें आहे. उच्च भावनांचें पोषक असें कांहीं.नाहीं फार काय, ईश्वराविषयीं मीमांसा करणें महंमदास आवडत नसे. तो म्हणेच, 'अल्लाजवळ जाण्यापेक्षां त्याची भीति बाळगावी.' त्याला स्वतांला ईश्वराविषयींच्या अज्ञानामुळें अंधारांतील बागुलबोवा दिसत असेल म्हणून त्यानें आपल्या अनुयायांना असा इषारा दिला हें योग्यच आहे. अटलांटिक महासागरापासून हिंदी महासागरापर्यंत जरी त्याच्या अर्धचंद्राचा प्रकाश एके काळीं पडला असला तरी खुद्द महंमदाची महत्त्वाकांक्षा अरबस्थानाच्या सरहद्दीपलीकडे आपला धर्म वाढेल अशी होती असें त्याच्या वर्तनावरून किंवा उद्गारावरून दिसून येत नाहीं. आयुष्याच्या पश्चिमभागांत मात्र ह्या धर्मप्रसाराच्या लालसेनें त्याच्या हृदयांत ठाणें दिलें.

ही धर्मप्रसाराची महत्त्वाकांक्षा इतकी अनावर झाली कीं तिच्या पूर्ततेसाठीं आततायी व अमानुष साधनांचा उपयोग करण्यासहि त्यानें परवानगी दिली आणि त्याच्या अनुयायांनीं तर काय, मद्यनिषेधादि त्याचा उपदेश पायाखालीं तुडविला असला तरी, धर्मप्रसाराचें इष्ट कोलित हवें तसें जगभर फेंकावयास सुरवात केली. याबद्दल गिबनची इतिहास-वादी लेखणी म्हणते,

The use of fraud and perfidy, of cruelty and injustice, were often subservient to the propagation of faith. The influence of such pernicious habits would be poorly compensated by the practice of the personal and social virtues, which are necessary to maintain the reputation of a prophet.

अनुयायांच्या आततायीपणाबद्दल महंमदाला जबाबदार धरलें पाहिजे. कारण, 'मुसलमानांनीं आपली नजर खालीं राखावी' असले सौजन्याचे आदेश किंवा 'परमेश्वर अत्याचार करणाऱ्यांना पसंत करीत नाहीं, अत्याचार करूं नका' असले सौम्य उपदेश कुराणांत जरी तुरळक व अपवादभूत असे असले तरी पुढच्याच ओळींत--जणुं कांहीं त्यायोगें आपल्या अनुयायांत शेळपटपणा शिरेल या भीतीनें त्यानें कोष्टकच असें घालून दिलें कीं A drop of blood shed in the cause of god is of more avail than two months of fasting orPrayer!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'शत्रूंची कत्तल करा' असा ठणठणीत हुकुम ठणकावला आहे ! सामान्यतः संबंध कुराणांतून,

'दांताबदला दांत, डोळ्याबदला डोळा व जिवाबदला जीव घ्यावा' असा हिंसात्मक सूर वाहत आहे आणि आज मुसलमानांच्या ज्या झुंडीच्या झुंडी हिरव्या निशाणाखालीं गोळा झालेल्या दिसत आहेत त्यांतील बीजहि गुप्त अशा क्रौर्यादि पाशवी वासनांना खाद्य देणाऱ्या वरच्यासारख्या आज्ञाच आहेत. रानटी अवस्थेंतील अरबांना मारहाण व दंगेधोपे करण्याची हौस होतीच. महंमदापूर्वींच्या सतराशें लढायांच्या आख्यायिका चालू आहेत. त्या राक्षसी वृत्तीलाच हातीं धरून महंमदानें तरवारीच्या टोंकावर आपल्या धर्माला जगभर नाचावयास लावलें. धर्मासाठीं कां होईना पण एकदां समाज अत्याचाराला चटावला म्हणजे त्याला धरबंद रहात नाहीं. औषधासाठीं आरंभलेली दारु व्यसनरूपानें रहावी, त्याप्रमाणें धर्मप्रसाराच्या नांवाखालीं एकदां जो हत्येचा उगम झाला, त्याचें पर्यवसान पांचशें वर्षेपर्यंत पासिफिक महासागरापासून अटलांटिक महासागरापर्यंत रक्ताचे पूर वहाविण्यांत झालें ! प्रकाशासाठीं म्हणून ओढलेली काडी दारूच्या कोठारावर पडल्यानें कल्पनेपेक्षां अधिक काळापर्यंत मुसलमानांची धर्मवेडाची आग जग जाळीत होती--किंबहुना जाळीत आहेहि ! महंमदानें आपल्या अनुयायांच्या हातीं ज्या कोलत्या दिल्या होत्या, त्या अद्याप विझल्या नाहींत हें कोणालाहि मुसलमानी समाजाचें वरवर निरीक्षण केलें तरी कळून येईल. त्यांच्यातील जबाबदार, अधिकारसंपन्न व सुशिक्षित पुढारीहि आपल्या धर्मवेडाचा नंगा नाच निरंकुशपणें घालीत आहेत. मुसलमानानें धर्मांतर केल्यास तीन वर्षांची कैदेची शिक्षा एक अधिकारी व्यक्ति फर्मावीत आहे, तर दुसऱ्या धर्मांत गेलेल्या मुसलमानाला कुत्र्याप्रमाणें दगडानें ठेंचठेंचून मारण्यांत दुसरे धर्म-वीर कृतकृत्यता मानीत आहेत आणि धर्मांतराच्या अपराधाला देहांत प्रायश्चित्तच द्यावें असा आततायी व जुलुमी सल्ला देण्यास एक मौलाना पुढें आलेले आहेत ! स्वतांच्या धर्माची अशी बंदिस्ती करण्यालाहि कोणी फारशी हरकत घेणार नाहीं; परंतु आपल्या धर्माचा जळजळीत अभिमान बाळगणारे एक मुसलमान राजे देवळांना नुसतें कळस बांधण्यांचीहि मुभा हिंदूंना देत नाहींत; तर दुसऱ्या राणीसाहेब देऊळच बांधण्याची मोकळीक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवीत नाहींत ! एक मुस्लीम बॅरिस्टर ' प्रत्येक मुसलमानानें आपल्या हयातींत तीन तरी हिंदू बाटवावेत' असें बिनदिक्कत बरळतो तर दुसरा एक बॅरिस्टर हिंदू अस्पृश्यांतील तीन कोटींचा निम्मा गट गट्ट करावा असें बेशरम प्रलाप काढतो ! कुराणांत आदिष्ट नसलेल्या व अफगाणिस्थानासारख्या कट्टर मुस्लीम देशांत रूढ नसलेल्या वाद्यवादन व गोवध अशा नाहक प्रश्नांवरून कुरापती काढून कलागती करणाऱ्या मुसलमानांच्या, मूर्ती फोडणें, देवावर लघुशंका करणें, खून करणें, इत्यादि आसुरी अत्याचारांची हृदयभेदक नामावलि देण्या इतका अवकाश नाहीं—आणि ते हिंदु हृदयांत जळत असल्यानें आवश्यकताहि नाहीं ! ज्वालामुखींतून उसळत पसरत वहाणाऱ्या कढतकढत ' लाव्हा ' नांवाच्या अग्निरसाला ज्याप्रमाणें भेदाभेद न करतां पुढें येईल तो प्रदेश भस्मसात् करावा एवढेंच ठाऊक असतें, त्याप्रमाणें मुस्लीम धर्माचा अग्निरस समोर आलेल्या साऱ्या समाजांना जाळीत पोळीत गेला किंबहुना, अजूनहि तो शांत झालेला नाहीं ! ! महंमदानें आपली पुंगी वाजवून जें सर्पमंडळ गोळा केलें, त्यांनीं पाशवी लीला व दंगाधोपा केला हें गिबननें पुढील शब्दांत सांगितलें आहे:—

His voice invited Arabs to arms & rapine, to indulgence of darling passions.

महंमद हाच ईश्वराचा एकुलता एक प्रेषित अशा संकुचित वृत्तीमुळें त्याच्या आनुयायांच्या अंतःकरणांत जें धर्मवेडाचें वारें खेळूं लागलें; त्यामुळें सूक्ष्मासूक्ष्म मार्गांनीं ते परधर्मीयांना आपल्या जाळ्यांत अडकवूं लागले, मुसलमानांचें संख्याबल वाढविण्याचा सद्धेतूनें एका बहाद्दरानें तर पसतीस उपाय सुचविले आहेत आणि त्यांमध्यें वेश्यांकडून धर्मप्रसार करणें हाहि एक सोज्वळ मार्ग सांगितला आहे ! अशा पसतीस पवित्र पायऱ्यांचा जिना चढून जो एकादा मुमुक्षु मुसलमानी धर्ममंदिरांत प्रवेश करील त्याला तेथें काय आढळेल? ऐहिक सुखदुःखांच्या द्वंद्वांतून सुटून धर्माच्या सात्त्विक वातावरणांत आपल्या चित्तवृत्ति शांत होतील आणि अखंड आनंदाचें साम्राज्य आपल्या हातीं येईल अशा आशेनें तो मुमुक्षु जर मुसलमानी धर्म चाचपूं लागला तर निर्भेळ निराशेशिवाय त्याचे हाताला कांहींही लागणार नाहीं. ऐहिक ऐश्वर्य व दैहिक सौख्य यांपलीकडे मुस्लीम धर्माची नजरच पोंचत नाहीं. त्यांचे श्रेष्ठां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वलें श्रेष्ठ असें प्राप्त फल म्हणजे स्वर्ग ! आणि हा स्वर्ग म्हणजे एकाद्या विषयी सुलतानाच्या राजवाड्यासारखाच ! याच स्वर्गाचें वर्णन ' A carnal paradise' असें गिबननें केलें आहे. अरबस्थानच्या रखरखीत वाळवंटावर ज्याच्या पायाला चटके बसत होते तो महंमद आरामशीर बागापेक्षां श्रेष्ठतर कोणतें सुख कल्पिणार आणि आपल्यावर विश्वास ठेवणाऱ्या अनुयायाला बहात्तर छोकऱ्यांपेक्षां दुसरें कोणतें उच्चतर पारितोषिक हा रंगेल रसूल देऊं शकणार? हा एकुलता एक देवदूत विचारतोः--

" बायका, सोनें इत्यादि इहलौकिक क्षणिक साधनांपेक्षांहि मी तुम्हांस अत्युत्तम चीज दाखवून देऊं का ?"

" आणि ही अत्युत्तम चीज " तो धर्मसंस्थापक सांगतो " ही कीं, ज्या लोकांनीं परमेश्वराला भिऊन आचरण केलें, त्यांच्यासाठीं त्यांच्या पालन कर्त्यासमीप स्वर्गाचे बाग होत कीं त्यांच्या खालून नद्या वाहत आहेत व ते त्यांत सदासर्वदा रहातील. आणि त्यांच्याकरितां मोठमोठाल्या डोळेवाल्या चोख्या पत्न्या होत. हवे तर मोत्या रंगाचे पोरगेहि मिळतील!

हुऱ्यापऱ्या सेवेला आहेत, शराबकबाब सेवन करण्याला आहेत आणि निजायला तारेचे पलंग–त्यावर गाद्या गिर्द्या ! ! "

अधिकांत अधिक उत्तुंग साध्य महंमदानें दाखविलें तें हें ! कुराणाच्या ' अनफाल ' नांवाच्या सुऱ्यामध्यें "लूट करावी व मुसल्मानानें शत्रूच्या बायकांना दासी करावें" असें सांगितलें आहे, 'वाक ओ ' मध्यें विलासस्थान असलेल्या स्वर्गाचें आमिष दाखविलें आहे आणि ' अबराव ' मध्यें काफरांची कत्तल करण्याबद्दल हुकूम फर्मावला आहे ! आधीं मुसलमानी धर्म म्हणजे खिश्चन धर्मावर वाढलेला. त्यानें एकुलता एक देवदूत अशासारखीं किंवा खिस्ती धर्मावर कडी करून मानवजातीचें अर्धांग असणाऱ्या स्त्रीवर्गाला आत्मा नसतो अशासारखीं कोतीं मतें पसरविलीं. शिवाय धर्मप्रसारासाठीं अधम, असहिष्णु आणि आततायी उपायांची योजना केली ! हा कसला धर्म ! हा निखळ क्रौर्यमूलक स्वार्थ ! लूट करा म्हणून सांगणारा तो धर्म ! कत्तल करा म्हणून सांगणारा तो धर्म ! मद्यमांसादिमकार–पंचक अंतिम साध्य मानणारा तो धर्म ! स्त्रियांना आत्मशून्य गणणारा, क्रौर्याला ऊत आणणारा, रक्ताचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूर वाहविणारा आणि एकंदर जगाची नीति, शांति व सुस्थिति यांना अर्धचंद्र देऊन अधर्माचें साम्राज्य पसरविणारा तो धर्म ! मग कोणता आचार धर्म या संज्ञेत समाविष्ट होणार नाहीं ?

प्रकरण चौथें

हिंदुधर्माची रूपरेषा.

सारासारदृष्टीनें परीक्षण केल्यास असें निष्पन्न होतें कीं, बौद्धधर्मात ज्ञान-प्राधान्य, अहिंसा इत्यादि सत्तत्त्वें जरी समाविष्ट आहेत; तरी आत्म्याचें अमरत्व व ईश्वराचें अस्तित्व अशा धर्ममूलक प्रश्नांबद्दल मौनच धारण केलेलें आहे, सौजन्य व समता यांचे मंजुळ सूर ख्रिश्चन धर्मात निनादत असले तरी त्यांत आकुंचित वृत्तीचे बदसूर मिसळले गेले आहेत आणि मुसलमानी धर्माला एकेश्वरी मताचें जें मधुर फल लागलेलें आहे त्याला अत्याचाराची कीड लागलेली आहे. या वैगुण्यामुळें वरील तिन्ही प्रमुख धर्म भवितव्यतेच्या दृष्टीनें अधःपतनाकडे धांव घेत आहेत. जोसेफ मॅकेब नांवाचा ग्रंथकार लिहितो–

'Buddhism with its incense and prayer-wheels and monasteries will collapse as soon as Asia is awakened. The name 'Christian' will have to go. Mohamedanism is already collapsing in Turkey, India, Egypt and where education spreads.

वरील तीन धर्म भावी काळांत गडगडत जाणार व त्यांचें अस्तित्वाहि रहाणें जर कठीण आहे, तर ते विश्वधर्म होण्याला पात्र कसे ठरणार ? म्हणून शिल्लक उरलेला जो एक धर्म वौलनिक विचार कक्षेंत अवतीर्ण होतो, त्याचा आतां निर्विकारपणें विचार करावयाचा आहे.

'रानटी व नीचत्वास पोंचलेला' अशा शेलक्या विशेषणांनीं मेकॉलेसारख्या विद्वानांनीं हेटाळलेला, कालियाविषाच्या बावळटपणानें भरलेला अतएव आग्निशुद्ध करून घेण्याजोगा, 'भीषण, बीभत्स, अमंगळ वंचक' अशा शब्दांत, सुधारणेचें आगर म्हणविणाऱ्या पंडितांनीं वर्णिलेला, 'आकुंचित पायावर आधारलेला' या उद्गारांनीं आंग्लविद्येच्या भाटांनीं निंदिलेला, 'वेडगळ समजुतींचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गठ्ठा' अशा लक्षणानें हिंदुधर्मीय गणिताचार्यांनीं अवमानलेला, आणि हिंदुस्थानचें हरतऱ्हेनें हितशत्रुत्व साधणाऱ्या महामायांनीं व महाधूर्तांनीं, वाघिणींनीं व नागिणींनीं ज्योतींनीं व द्वितवादींनीं, निंद्य, गर्ह्य व त्याज्य ठरविलेला असा एक जुनापुराणा धर्म आतां विचारांत घ्यावयाचा आहे.

आणि तो म्हणजे हिंदु धर्म ! हा हिंदुधर्म म्हणजे जगांतील अतिप्राचीन व आद्य धर्म असून तो श्रुतिस्मृतिपुराणेतिहासादि ग्रंथांतून अनेक ऋषीमहर्षींनीं ग्रथित केलेला आहे. या सामान्य धर्माचें लक्षण देण्याचा प्रयत्न करणें सोपें नाहीं. तथापि त्या दिशेनें अप्रत्यक्ष असा थोडा प्रयत्न, हिंदु कोणास म्हणतां येईल, या प्रश्नास दिलेल्या नाना उत्तरांच्या रूपानें पुढें दिलेल्या प्रमाणें करतां येईल. 'हिंदुधर्म' या सामासिक शब्दांतील उत्तरपद आरंभींच विवेचित झालें असल्यानें 'हिंदु' या शब्दाचा अर्थबोध करणें सांप्रत अवश्य आहे. 'हिंदु' हा शब्द फारशी असून त्याचा अर्थ ' गुलाम ' असा असल्यानें भारतवासीयांना कमीपणा देण्यासाठीं तो शब्द मुसलमानांनीं उपयोगांत आणला असें कांहींचें मत आहे; परंतु प्राचीन वाङ्मय धुंडाळलें असतां हा शब्द मुसलमानी धर्माच्या आधींचा फार पुरातन आहे असें आढळून येतें. बाराव्या शतकांतील एका ताम्रपटावर ' हिंदव ' हा शब्द लिहिलेला आहे; आणि त्याच्याहि पूर्वींच्या ग्रीक वाङ्मयांत या शब्दाचा उल्लेख सांपडतो. कित्येक हजार वर्षांपूर्वी हिमप्रलयामुळें आर्य लोक आपली उत्तर ध्रुवाजवळची वस्ती सोडून पंजाबापाशीं वसाहत करून राहिले. तेथील सात नद्यांवरून ' सप्तसिंधु ' असें नांव रूढ झालें व त्यांचा उल्लेख वेदांतहि आढळतो. त्याचाच अपभ्रंश ' हप्तहिंदु ' अवेस्ता ग्रंथांतहि सांपडतो. म्हणजे ' हिंदु ' हा शब्द फार प्राचीन असून पूर्वी चांगल्या अर्थी उपयोजिलेला आहे. हा शब्द बौद्धांच्या व चीनांच्या वाङ्मयांतहि दृष्टीस पडतो. याशिवाय, या देशांत पूर्वी इंद्राचें साम्राज्य असेल म्हणून ' इंद्रस्थान ' हें नांव सुरू झालें असेल व त्याचें अपभ्रष्ट स्वरूप ' हिंदुस्थान ' असेल इत्यादि व्युत्पत्ति मौजेच्या असल्या तरी उपयोगाच्या नाहींत. एकंदरींत, हिंदु हा शब्द पुराण-पुनीत असून स्व-परधर्म ग्रंथांत विहार करणारा आहे. या हिंदूंच्या धर्मालाच आर्यधर्म, वैदिक धर्म, सनातन धर्म, वर्णाश्रम धर्म इत्यादि नांवें प्राप्त झालेलीं आहेत. हिंदुधर्माचें लक्षण कोणतें हें येथें सांगणें जरूर आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वत्वाची व्याप्ति निश्चित करणारें व परधर्मांची व्यावृत्ति करणारें एकच एक असंदिग्ध लक्षण बांधणें हिंदुधर्माचे बाबतींत शक्य नाहीं. 'हिंदु कोण ?' या प्रश्नांचीं जीं भिन्नभिन्न उत्तरें दिलीं जातात तीं किती सदोष असतात हें पुढील चिकित्सेवरून ध्यानीं येईल.

(अ) 'ज्याचे आईबाप हिंदु असतील तो हिंदु' या हिंदुत्वाच्या व्याख्येमध्यें दोष असा आहे कीं, व्रात्यस्तोमादि संस्कारांच्या द्वारें ज्या अहिंदु मातापितरांच्या संततीला हिंदु करून घेतलेलें असेल त्यांचा समावेश उपरि-व्याख्यात हिंदुत्वांत होत नाहीं.

(आ) 'हिंदुस्थानांत ज्याचा जन्म झाला असेल तो हिंदु' असें म्हणावें तर परदेशांत ज्या हिंदूंचा जन्म झाला असेल त्यांना बाहेर टाकलें पाहिजे; उलट ज्या ख्रिस्त्यांचा किंवा मुसलमानांचा जन्म हिंदभूच्या कुशींत झाला असेल त्यांनाहि हिंदु म्हणावें लागेल! म्हणजे ही व्याख्या अव्याप्ति व अतिव्याप्ति या दोन्ही दोषांनीं दुष्ट आहे.

(इ) 'स्वतांला हिंदु म्हणवून घेईल तो हिंदु' ही व्याख्या तर इतकी लवचीक व लेचीपेची आहे कीं तिचे दोष दाखविण्याचीहि गरज नाहीं.

(ई) 'जातिभेद मानील तो हिंदु' असें म्हटल्यास, लिंगायत, शीख, ब्राह्मो इत्यादिकांस हिंदुत्वांतून वगळावें लागेल.

(उ) 'शेंडी असेल तो हिंदु' यांतील लक्षण गौण स्वरूपाचें आहे व अलीकडील 'शिखा-नष्ट' शिक्षितांना त्यामुळें हिंदु गणतां येणार नाहीं.

(ऊ) 'अंतरीय म्हणजे धोतर नेसणारे ते हिंदु,' ही व्याख्या वरीलप्रमाणेंच विचारणीय नाहीं.

(ए) 'देवाची भक्ति करील तो हिंदु' असेंहि सांगतां येणार नाहीं. कारण 'ईश्वर माना' असें मीमांसाहि म्हणत नाहीं.

(ऐ) 'खाद्यपेयाचे विशिष्ट निर्बंध म्हणजे मांसाहार व मद्यपान यांपासून निवृत्ति पाळील तो हिंदु' ही व्याख्याहि सर्वसंग्राहक नाहीं.

(ओ) 'अवतारावर श्रद्धा ठेवील तो हिंदु' असें म्हटल्यास आगाखानाला कलंकी समजणाऱ्या हिंदुधर्माच्या कलंकांना हिंदु गणण्याची आपत्ति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येईल; व शीख अवताराची कल्पना मानीत नाहींत म्हणून त्यांना वगळावें लागेल.

(औ) 'अहिंसाशील असेल तो हिंदु' कारण 'हिन्सा दूयते' म्हणजे हिंसेनें दुःखित होतो तो हिंदु अशी व्याख्या एकाद्या कोटिबाज हरिदासालाच शोभेल.

(अं) 'जो हिंदु कायदा मानतो तो हिंदु' अशी व्याख्या कांहीं विद्वान् पुढें आणतात. तथापि दत्तक, वारसा, विवाह या बाबतींत हिंदु कायदा निश्चित स्वरूपाचा नाहीं. शिवाय, 'हिंदु लॉ' ज्याला लागतो तो हिंदु म्हणजे लो. टिळक म्हणतात त्याप्रमाणें, कार्य-कारणभाव बदलून घोड्याला गाडीच्या मागें जोडण्यासारखें आहे.

वरील चिल्लर व्याख्यांपेक्षां अधिक चिंत्य अशा दोन व्याख्या हिंदुत्वाच्या आहेत; त्यांचा विचार स्वतंत्रपणें केला पाहिजे. त्या व्याख्या म्हणजे बॅ. सावरकर व लो. टिळक यांच्या. पैकीं, '**ज्याची पितृभू आणि पुण्यभू हिंदुस्थान तो हिंदु**' अशी बॅ. सावरकरांची व्याख्या आहे. यामध्यें पितृभू शब्द अव्याप्तिदोषानें कसा ग्रस्त आहे हें वर दिलेल्या पहिल्या व्याख्येच्या चिकित्सेचे वेळींच स्पष्ट केलें आहे. आणि तीच गत पुण्यभू शब्दाची. हिंदु-स्थानाला केवळ पवित्र मानण्यानें सिद्ध व्हावें इतकें ढिलें हिंदुत्व आहे काय? याच व्याख्येचा विस्तार त्यांनीं पुढील श्लोकांत केलेला आहेः—

'आसिन्धुसिन्धुपर्यन्ता यस्य भारतभूमिका ।
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ॥

या श्लोकाचा मराठी अनुवाद त्यांनीं पुढीलप्रमाणें केला आहेः—

'हिंदु तो, कीं जो सिंधूपासून सिंधूपर्यंतची भूमि पितृभूमि मानतो, आपल्या अंगांत आर्यांचें रक्त खेळवितो आणि हिंदु संस्कृतीचें परिपालन करतो.'

यांतील 'संस्कृति' हें पद घोटाळ्यांत पाडण्याइतकें मोघम आहे. व्रात्यस्तो-मादि मार्गांनीं हिंदुधर्मांत प्रवेश करणाऱ्यांचा समावेश होत नसल्यानें आणि हिंदुधर्मांतर्गत आचारविधि वगैरे कशाचाच उलगडा होत नसल्यानें प्रस्तुत व्याख्येचा निरोप घेऊन तिच्यापेक्षां अधिक उपयुक्त अशा दुसऱ्या व्याख्येचा विचार करूं. ही व्याख्या म्हणजे 'श्रुतिरत' टिळकांची. इ. स. १९०० सालीं टिळकांनीं हिंदुधर्माचें लक्षण पुढील श्लोकांत केलें:—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

‘ प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।
उपास्यानामनियम एतद्धर्मस्य लक्षणम् ॥ ’

म्हणजे वेदांना प्रमाण मानणें, ईश्वरप्राप्तीचीं साधनें अनेक समजणें आणि उपासना कोणाची करावयाची याबद्दल आग्रह न करणें हें हिंदुधर्माचें लक्षण होय.

यानंतर पंधरा वर्षांनीं, ‘ हिंदु कोणाला म्हणावें ? ’ याचें उत्तर त्यांनीं पुढीलप्रमाणें देऊन ठेविलें आहे:–

धर्ममेनं समालम्ब्य विधिभिः संस्कृतस्तु यः ।
श्रुतिस्मृतिपुराणोक्तैः क्रमप्राप्तैरथापि वा ॥
स्वे स्वे कर्मण्यभिरतः श्रद्धाभक्तिसमन्वितः ।
शास्त्रोक्ताचारशीलश्च स वै हिंदुः सनातनः ॥

यांतील दुसरा श्लोक अपरिहार्य नसला तरी पहिल्या श्लोकांत त्यांनीं संस्कारांचें महत्त्व सूचित केलेलें आहे. त्या संस्कारांचें विशेष विवरण करून वे. शा. सं. किंजवडेकर शास्त्री यांच्या ‘ संस्कार-मीमांसा ’ ग्रंथाच्या प्रस्तावनेंत लोकमान्य म्हणतात:– ‘ संस्कार पाळल्याशिवाय कोणाहि मनुष्याचा त्या धर्माच्या अनुयायामध्यें समावेश होत नाहीं. ’ संस्कारावर लोकमान्यांचा कटाक्ष विशेष होता व हें योग्यच आहे. एका गृहस्थाच्या शुद्धीकरणाची हकीकत लोकमान्यांना कोणीं सांगितली; त्याबरोबर त्यांनीं विचारलें ‘ विधि केला ना ? ’ आणि इषारा दिला कीं, विधीवांचून कोणालाहि हिंदुधर्मांत प्रविष्ट करून घेऊं नये. कबीर हा रामाला भजणारा व हिंदुधर्माचें तत्त्वें मानणारा किंबहुना आचरणाराहि होता. परंतु संस्कारभिन्नतेमुळें तो हिंदु गणला गेला नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. वरील निरनिराळ्या व्याख्यांचें संकलित स्वरूप लोकमान्यांनींच पुढीलप्रमाणें मांडलें आहे:––

‘ प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु ’ हें तत्त्व स्वीकारून पारंपर्यागत श्रुतिस्मृतिपुराण-प्रतिपादित विधिसंस्कार किंवा आचार पाळणारा तो हिंदु. ’

हिंदुत्वाचीं बहुतेक लक्षणें वरील व्याख्येंत अंतर्भूत झालेलीं असल्यानें ती व्याख्या व्यवहार्य समजून चालावें लागतें. या व्याख्येंत हिंदूंची चित्तवृत्ति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आचार या बहिरंतरंगाचा विचार केलेला असल्यानें ती पूर्वीच्या सर्व व्याख्यां-हून स्वीकरणीय व उपयुक्त आहे हें कबूल केलें पाहिजे. तथापि, विशेष छाननी करूं लागलों तर ह्याहि व्याख्येंत व्यंग व दोष आढळल्याशिवाय रहात नाहींत. पहिलेंच जें पद 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' त्यावर किंती तरी रणें परवांपरवांपर्यंत माजलीं होतीं. चार्वाकाला वेदप्रामाण्य मान्य नाहीं एवढेंच नव्हे तर तो 'त्रयोवेदस्य कर्तारः भंडधूर्तनिशाचराः'। अशा शिव्यांचा सोटाच वेदावर उगारत आहे! त्याला वगळला तरी जैन, शीख, इत्यादि समाज हिंदुधर्माच्या पोटांत असून वेदांना प्रमाण मानीत नाहींत; मग या व्याख्येनुसार त्यांना काय बाहेर फेंकून द्यावयाचें? शिवाय, स्त्रियांना व शूद्रांना वेदाचा तर अधिकारच नाहीं. याखेरीज आणखी एक प्रश्न असा कीं, वेदाच्यापूर्वी हिंदुधर्म होताच कीं नाहीं? अथर्ववेदामध्यें 'वेद हे यज्ञाचें उच्छिष्ट होत' असें म्हटलेलें आहे, म्हणजे वेदापूर्वी यज्ञ व यज्ञ चालविणारे हिंदुधर्मीय लोक होते. 'श्रुतिस्मृतिपुराणप्रतिपादित' हें पदहि असेंच अनिश्चितार्थ व टीकास्पद आहे. कारण, श्रुति भिन्नभिन्न स्वरूपाच्या असून, 'नैको ऋषिर्यस्य वचः प्रमाणम्।' अशी स्थिति आहे. पुराणांतील परस्पर विरोधाबद्दल तर बोलावयासच नको. तसेंच कोणते 'आचार' आवश्यक आहेत हेंहि लोकमान्यांनीं स्पष्ट केलेलें नाहीं. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं, तसें करणें हें हिंदुधर्माच्या व्यापकतेमुळें दुष्करच आहे. म्हणूनच पुष्कळ विद्वान लोक हिंदुधर्माचा विस्तार, तदन्तर्भूत विविध पंथ, आर्यवंशांत मिसळलेल्या भिन्नभिन्न जाति आणि प्रत्यहीं त्याचें पालटत असलेलें वर्धिष्णु स्वरूप या सर्वांचा विचार करून अव्याख्येयता हीच हिंदुधर्माची व्याख्या आहे असें मत ठोकून देतात. परंतु या मताचा व्यवहारांत काडीइतकाही उपयोग होत नाहीं. कुराण मानणारा व सुंता झालेला तो मुसलमान, बायबल मानणारा व बातिस्मा झालेला तो ख्रिश्चन हें जसें सामान्य माणसालाहि ठामपणें सांगतां येतें, त्याप्रमाणें ज्याच्या धर्माची व्याख्या करतां येत नाहीं तो मी हिंदु, असें जर कोणी म्हणेल तर ऐकणाराला त्यापासून काय बोध होईल? अशा सरळ व्याख्येपेक्षां लोकमान्यांचीच व्याख्या व्यवहार्य व स्वीकरणीय आहे.

लोकमान्यांच्या व्याख्येंतील आहेत हींही व्यंगें कमी करावयाचीं असतील तर हिंदुत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणें केली पाहिजेः—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमाणयति यो गतामद्वैतं सगुणान्वितं ।
स हिन्दुः सेवते धेनुं संस्कारानतुपालयन् ॥

या श्लोकांत प्रत्येक हिंदूच्या अंतःकरणांत भावना कोणती असली पाहिजे आणि त्याचा आचार कोणत्या स्वरूपाचा असला पाहिजे हें स्पष्टपणें सांगितलेलें आहे; म्हणजेच तत्त्वज्ञान व नीति, अंतरंग व बहिरंग, या दोहोंचा यांत निर्देश केलेला आहे. गाईला माता मानून तिचें पूजन करणें हें हिंदुमात्राचें कर्तव्य आहे. 'अमृतस्य नाभिः' व 'मातरः सर्वजीवानां' इत्यादि विशेषणांनीं वेद, महाभारत, पुराणें, संतसाधुसज्जन-सर्वांनींच गोदेवतेचा गौरव केलेला आहे. व्यतिरेकानें पहावयाचें तर, बौधायनानें म्लेंच्छांचें लक्षण सांगतांना 'गोमांसखादको' हें पद प्रथम घातलेलें आहे; अर्थात् यावरून आपल्याला असें म्हणतां येईल कीं, गोपूजक तो म्लेंच्छेतर म्हणजे हिंदुत्वाचें एक चिन्ह धारण करणारा होय. गोपूजन ख्रिश्चन किंवा मुसलमानी धर्मांत नसून हिंदुधर्मांत मात्र पुरातन कालापासून चालत आलेलें आहे. म्हणून त्याचा समावेश हिंदुत्वांत करणें अपरिहार्य आहे. ऋग्वेदाच्या कालापासून सद्यःकालापर्यंत, ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत, हिंदूच्या घराघरामध्यें गाईला मातादेवता मानून पूजण्यांत येतें. 'सनातनी हिंदु' असणारे महात्मा गांधी तर लिहितात–

Which distinguishes Hinduism from every other religion is its Cow protection.

इतर धर्मांपासून वेगळें करणारें हिंदुधर्माचें व्यावर्तक लक्षण म्हणजे गोरक्षण एका आंकडेशास्त्रज्ञानें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, एक गाय आपल्या एका पिढींत पावणेपांच लक्ष व सहाशें माणसांना दुग्धादिरूपानें एकदां सुखी करते! गाय ही दूधतूपच नव्हे तर धनधान्य देते, या उपयुक्ततावादाचे दृष्टीनें व धर्माचे बाबतींत बोलावयाचें तर ती कारुण्यमूर्ति–

("Giver of plenty; poem of piety")

आहे आणि तिचा गौरव म्हणजे सर्व प्राणिमात्राविषयीं अनुकंपा असा अर्थ होतो. म्हणून गोगौरव हें हिंदुत्वाचें एक दृश्य लक्षण मानणें सयुक्तिक आहे.

ख्रिस्ताचें बायबल, महंमदाचें कुराण, बुद्धाचीं सुत्तें, झाराथूस्त्राच्या गाथा कानफ्यूशियसची 'नीति' हे जसें त्या त्या धर्माचे प्रमाणग्रंथ मानतात तसा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमाणग्रंथ हिंदु-धर्माचे बाबतींत वेद मानण्याचा प्रघात असला तरी त्यांतील सदोषता 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' हें पद चिकित्सतांना, व्यक्त केलेली असल्यानें 'कृष्णस्तु भगवान् स्वयं' अशा अधिकारी पुरुषानें किंवा पुरुषोत्तमानें उपदेशिलेली श्रीमद्भगवद्गीता हेंच हिंदूंचें धर्मपुस्तक मानावें हें सोईस्कर व हितकर आहे. याचा अर्थ सर्व हिंदुधर्मानुयायांनीं डोळे मिटून गीतेवर विश्वास ठेवावा व बौद्धिक दास्य पतकरावें असा नाहीं. गीतेला प्रमाणग्रंथ मानणें यांतील रहस्य एवढेंच कीं, तिच्यांत अनुस्यूत असलेलें,

'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।'

इत्यादि वचनांनीं स्पष्ट केलेलें अद्वैत मत मान्य करणें. इतर सर्व धर्मांतील तत्त्वज्ञानाच्या भागापेक्षां हिंदुधर्मीय तत्त्वज्ञान अधिक तेजस्वी जर कशानें दिसत असेल तर या अद्वैतमताच्या कोहिनुरानेंच. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' ही भावना बिंबल्यावरोबरच 'अहं ब्रह्मास्मि' हें तत्त्व पटतें; मग 'तत्त्वमसि' असा उपदेशहि कोणीं करावा लागत नाहीं. सर्वत्र परमेश्वर भरलेला असून तोच आहे अशी भावना असणें हें हिंदुधर्माचें द्वितीय चिन्ह होय. शुद्धाद्वैत, विशिष्टाद्वैत, इत्यादि प्रकार जरी प्रस्तुत तत्त्वासंबंधीं प्रचलित असले तरी अद्वैत मत हीच वेदांच्या लाटांना कुंठित करणारी 'वेला' आहे.

गोपूजन, अद्वैतमत यांप्रमाणेंच बाह्य आचाराचीहि हिंदुत्वाचें लक्षण पूर्ण होण्याला आवश्यकता आहे. सगुणोपासना किंवा मूर्तिपूजा यथाधिकार करणें हें हिंदुधर्माचें परंपराप्राप्त वैशिष्ट्य तद्धर्मीयांनीं व परधर्मीयांनीं प्रामुख्यानें मानलेलें आहे. हिंदूंचे संस्कारांची संख्या सोळा असली तरी सांप्रत सर्वत्र रूढ असे तीनच संस्कार आहेत आणि ते म्हणजे, उपनयन, विवाह व अंत्येष्टि. गर्भाधान-पुंसवनादि संस्कार लुप्त झाले आहेत किंवा होत आहेत. या तीन संस्कारांचें आचरण हिंदूंना निर्बंधकारक असावें हें तत्त्वदृष्ट्या उचित असलें तरी व्यवहारदृष्ट्या एकच संस्कार एकोनएक हिंदूंना आवश्यक असावा व बाकीचे ऐच्छिक असावेत. असा संस्कार म्हणजे उपनयनाचा. ख्रिश्चनांचा जसा बाप्तिस्मा, मुसलमानांची जशी सुंता, तसें हिंदूंचें उपनयन असावें. उपनयन हा संस्कार ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्र—फार काय, अतिशूद्रहि—जो जो हिंदु असेल त्याला आवश्यक करावा म्हणजे तें एक दृश्य व बाह्य असें हिंदुधर्माचें निश्चित व निर्णायक चिन्ह होऊन बसेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तदन्तर्गत सूर्योपासना इतकी दिव्य व श्रेष्ठ आहे कीं, 'सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च' या किंवा संध्यामंत्रासारख्या हिंदुधर्मवचनांतच नव्हे, तर पारशी चिनी इत्यादि आशियावासी लोकांनाहि ती मान्य होत आहे. कांहीं अस्पृश्यांनीं हा संस्कार नुकताच करून घेतलाहि. तोच सर्व हिंदूंना अपरिहार्य करून ठेवण्याचें आवश्यक कार्य धर्मपीठांनीं व धर्मवेत्त्यांनीं केलें पाहिजे तरच आजच्या मिश्र व विस्तृत हिंदुधर्माचें लक्षण निश्चित होऊन बसेल. एवंच, **गो हें दैवत, अद्वैत हें मत व उपनयन हा संस्कार ज्याचा आहे तो हिंदु असें ठरतें.**

एवंगुणविशिष्ट हिंदुत्व आपल्या अनुयायांना पूर्ण विचारस्वातंत्र्य देत आहे. येशूला मानील तोच ख्रिश्चन, महंमदाला मानील तोच मुस्लीम, त्याप्रमाणें एकाहि व्यक्तीचें माहात्म्य मानण्यावर हिंदुत्व अवलंबून नाहीं. हिंदुधर्माचे प्रणेते अनेक आहेत, एकाद्या विशिष्ट व्यक्तीच्या चरणीं आपलें विचारस्वातंत्र्य अडकवून ठेवावें लागत नाहीं. वेदप्रामाण्य हें जरी एक लक्षण मानलें तरी वेद हें कांहीं कोणा एका मनुष्याच्या कर्तृत्वाचें फल नव्हे. वेद अपौरुषेय आहेत या सिद्धांताबद्दल परवांपरवांपर्यंत वाद चालू होते. इंग्लिश शिक्षणामुळें जडवादी बनलेल्या–तर्ककर्कश बनलेल्या विद्वानांना तर वेदाचें अपौरुषेयत्व हास्यास्पद वाटे ! आकाशांतून खालीं पडणाऱ्या पावसाच्या सरीप्रमाणें किंवा भूमींतून वर उगवणाऱ्या वनस्पतीच्या अंकुराप्रमाणें वेद हे जमीनअस्मानांतून अकस्मात् उगवणें किंवा उतरणें केवळ अशक्य असें त्यांचें मत ! परंतु त्या मताची बरीच वर्षे छाननी झाल्यानंतर आतां बहुतेक विद्वानांना हें मान्य आहे कीं, जरी कांहीं ऋषींनीं कांहीं ऋचा म्हटल्या असल्या तरी ते त्यांचे कर्ते नव्हते, द्रष्टे होते. गुरुत्वाकर्षणाची शक्ति विश्वाच्या अणुरेणूंत वास्तव्य करीत आहे याचा शोध प्रथम न्यूटननें लावला असें जेव्हां आपण म्हणतों, तेव्हां त्याचा ज्याप्रमाणें असा अर्थ होत नाहीं कीं, त्यानें ही एक नवीनच शक्ति निर्माण केली, तर ती शक्ति परमेश्वरानें सृष्टीच्या उत्पत्तीबरोबरच उत्पन्न करून ठेविली. न्यूटननें जें काय केलें तें म्हणजे तिचें अस्तित्व जाणलें; त्याचप्रमाणें वेद हे पूर्वीच उत्पन्न झालेले होते, त्यांचें स्वरूप ओळखून लोकांना सांगण्याचें काम ज्यांनीं केलें ते मंत्रद्रष्टे ऋषि होत ! ऋषि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा शब्दच मुळीं ' दृश्=पहाणें ' या धातूपासून ' दृषि ' असें रूपांतर पावून झालेला आहे. वेद पहाणारे ते ऋषि, त्यांनीं ते निर्माण केले असें नव्हे.

' यस्य निश्वसितं वेदाः ' म्हणजे
' हा वेदार्थसागरु । जया निद्रिताचा घोरु ।

ईश्वराचा निश्वास हाच वेद होय.

हें अपौरुषेयत्वाचें वलय मुसलमानांच्या कुराणाभोंवतींहि जडविण्याचा हेतु होता असें दिसतें. ' एका रात्रींत कुराण रचलें!' असा चमत्कार त्यांत वर्णन केलेला आहे आणि ' ह्या सारखाच एक अध्याय तुम्ही रचून आणा मग कुराण मानवी म्हणूं ' या कुराणोक्त वचनांतून ध्वनि असा निघत आहे कीं, महंमदानें कुराणांत जें जें कांहीं लिहिलें तें तें समाधिसारख्या अवस्थेंत तो असतांना परमेश्वराचे जे जे आदेश झाले, तेच होत. महंमदाचे बोल म्हणजे अल्लाचेच बोल; त्यांचें ' प्रकटीकरण ' मात्र महंमदाचे मुखानें झालें, असा मुसलमानांचा विश्वास आहे. म्हणजे महंमदाचा ' बोलविता धणी ' अल्ला आहे. परंतु सर्व कुराणांत विसंगतपणा किती सुसंगतपणें आढळतो याचें एक उदाहरण येथें पहाण्यासारखें आहे. कुराण ईश्वरानें लिहिलें म्हणून सांगितलें आणि त्या बरोबरच,

आरंभ साथ नाम अल्लाइको

अल्लाला नमन करून ग्रंथारंभ केला ! अल्लाच लिहितो, आणि अल्लालाच नमतो—खासा न्याय ! ! शिवाय मुसलमानांच्या वरील कल्पनेंत व वेदाच्या अपौरुषेयत्वाच्या कल्पनेंत एक सूक्ष्म भेद आहे. तो असा कीं, केवळ महंमदाच्याच द्वारें परमेश्वर आपल्या इच्छा जगास कळवितो असा ध्वनि कुराणाचा; तर हिंदूंची भावना अशी कीं, आकाशांतील तारांगणांप्रमाणें वेदांतील ज्ञान साऱ्या जगाला उघडें होतें, तें उघड्या डोळ्यांनीं पाहिलें मात्र ऋषींनीं !

हे अनेक ऋषि हिंदुधर्माचे प्रणेते होत; एकच एक व्यक्ति अशी मानलेली नाहीं, हें वैशिष्ट्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ख्रिश्चन किंवा मुस्लीम धर्म ग्रंथांचा एक एक प्रणेता ठरून गेलेला आहे; म्हणजे बायबलांतील किंवा कुराणांतील मतें सत्य कां मानावयाचीं ? तर तीं ख्रिस्तानें किंवा महंमदानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांगितलेलीं आहेत म्हणून ! अर्थात् त्या धर्मग्रंथाचें सत्यत्व व्यक्तिनिष्ठ झालें आणि त्यांच्या अनुयायांनीं तें डोळे मिटून मानलें पाहिजे अशी मानसिक गुलामगिरी उत्पन्न झाली. परंतु वेदान्तर्गत तत्त्वांचा प्रवेश अनुयायांच्या हृदयांत होण्यासाठीं, तीरामागील पुच्छाप्रमाणें, व्यक्तिमाहात्म्य हें पाठीराखें असावें लागत नाहीं. वेदांतील तत्त्वें स्वयंभूच सत्यपूर्ण असल्यानें कोणाचीहि खाली पटविणारीं आहेत, तीं स्वतांच प्रमाण अशीं आहेत. त्यांचेमागें प्रमाणभूत अशी एकहि व्यक्ति उभी असण्याची गरजच नाहीं अशी वेदाच्या स्वयंसिद्धतेची भावना ठेवणें म्हणजे वेदप्रामाण्य. अनुयायांना आपल्या तर्कवादाच्या ' निघर्षण–छेदन–ताप–ताडन ' या चतुर्विध साधनांनीं खात्री करून घेण्याइतकें विचार–स्वातंत्र्य देणारें असें हें वेदप्रामाण्य आहे. हिंदुधर्माचे प्रवक्ते अनेक असल्यानें त्याच्या अनुयायांना हें विचार–स्वातंत्र्य प्राप्त होतें; अन्य धर्मांचे प्रणेते एकएकच असल्यानें त्यांच्या अनुयायांना मनोदास्य पतकरावें लागतें. हिंदुधर्मामध्यें प्रणेत्यांच्या या बहुत्वाप्रमाणेंच धर्मग्रंथांचें विविधत्वहि अनुयायांना उपकारक आहे. वेद किंवा प्रस्थानत्रयी अथवा एकली गीता यांना धर्मपुस्तक मानण्याला हिंदुधर्माची हरकत नाहीं, हें जरी खरें असलें तरी अमुक एका विशिष्ट ग्रंथालाच चिकटून बसा असें म्हणून धर्मानुयायांना कोठें डांबून ठेवलेलें नाहीं. ' अधिकार तैसा उपदेश ' ग्रहण करण्याची सोय, विविध धर्मग्रंथ निर्माण करून, हिंदुधर्मानें ठेविलेली आहे. खालच्या पायरीपासून वरच्या पायरीपर्यंत सर्व दर्जांच्या अनुयायांच्या सोईसाठीं सुबोधापासून गूढापर्यंत निरनिराळ्या स्वरूपाचे धर्मग्रंथ हिंदुधर्माच्या भांडारांत समाविष्ट केलेले आहेत. जरूर असेल त्यानें चावीखालीं आंघोळ करावी, किंवा हौदांत डुंबावें, अथवा सरोवरांत पोहावें अगर नदीचा परतीर गांठावा व शक्ति असेल तर सागर तरून जावा–ज्यानें त्यानें आपल्या कुवतीप्रमाणें देहशुद्धीचा मार्ग पतकरावा; त्याप्रमाणेंच आपापल्या पात्रतेनुरूप धर्मग्रंथाची कास धरून चित्तशुद्धि साधावी अशी सोय उदार हिंदुधर्मानें मात्र केलेली आहे.

मनुष्यजात एकच; पण माणसामाणसांतहि किती फरक असतो! ' एकमेवाद्वितीयम् ' असण्याचा जो गुण ब्रह्माचे ठायीं आहे तो पिंडब्रह्मां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न्यायानें प्रत्येक मनुष्यप्राण्याचेहि अंगीं उतरलेला आहे. एका माणसाचा स्वभाव, त्याचे मनोधर्म, त्याच्या आवडीनावडी जशा असतील तशाच तंतोतंत असणारा दुसरा माणूस उभ्या सृष्टींत सांपडावयाचा नाहीं! प्रत्येक प्राण्याचें कांहीं ना कांहीं तरी वैशिष्ट्य हें असतेंच. सर्वशः एकरूप असणारीं दोन माणसें आढळणें केवळ अशक्य! एकाच्या अंतःकरणांत तर्ककर्कश बुद्धीचा लखलखाट पडलेला असेल, तर दुसऱ्याच्या हृदयांत श्रद्धेचें चांदणें फुललेलें असेल. एकाला केवळ चिंतन करणें सोईचें असेल तर दुसऱ्याला भक्तिरसभरित भजन सुलभ असेल आणि तिसऱ्याला सतत निष्काम कर्म करण्याचीच आवड असेल. अशा भिन्नभिन्न सामर्थ्यांच्या व अधिकाराच्या अनुयायांसाठीं हिंदुधर्मानें ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग, कर्ममार्ग, योगमार्ग इत्यादि अनेक मार्ग मोकळे ठेवले आहेत. आपल्याला अनुकूल अशा कोणत्याहि मार्गावर पाऊल ठेवून परमार्थाचा प्रवास आरंभावा असें मानसिक स्वातंत्र्य हिंदुधर्माइतकें दुसऱ्या कोणत्याहि धर्मानें दिलेलें नाहीं. तुम्ही तर्कप्रधान असा, श्रद्धासंपन्न असा कीं, कर्मप्रवण असा, सर्वांनीं एकाच येशूप्रणीत साधनाचें अवलंबन केलें पाहिजे असें मनोदास्य लादणाऱ्या बायबलाला दूर फेंकलें जावें लागतें, तें या मानसिक स्वातंत्र्याच्या अभावामुळेंच! धर्म म्हणजे कांहीं हिंदी नोकरशाहीचें शिक्षणखातें नव्हे कीं, ज्यांत बरे वाईट, उच्च नीच सर्व लोक एकाच दावणींत खेंचून फरफरां ओढीत नेतां येतील. केळी-बाभळीसारख्या भिन्न वृक्षांनाहि एकाच खतपाण्यावर पोसणाऱ्या खुळ्या माळ्याप्रमाणें सर्व व्यक्तींना एकाच मार्गानें हांकून नेण्याचा जुलूम इतर धर्मांनीं जसा केलेला आहे तसा हिंदुधर्मानें केलेला नाहीं.

येशूला ' गुराखी ' असें कल्पितात; पण हा गुराखी आपल्या कळपांत शेळ्यामेंढ्याबरोबर कोल्हे-लांडगे व वाघ-सिंह अशाहि प्राण्यांना एकाच रस्त्यानें हांकीत नेत आहे हें ख्रिस्तभक्तांपैकीं विचारी लोकांनाच पटेनासें झालें आहे. मग परधर्मीयांना कितीसें पटणार? बायबलांतील स्तोत्रसंहिता (Psalms) ' धर्मश्रद्धेच्या भावनांनीं थबथबलेला ' आहे हें जरी खरें तरी भक्तीच्या दिंडीशिवाय दुसरा प्रवेश-मार्ग ख्रिश्चन धर्मांत उघडा नाहीं. म्हणून फारफार झालें तर, या **गुराखी येशूची** तुलना आमच्या गोपाल-कृष्णाशीं-व तीहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बालकृष्ण शींच–करतां येईल. दोघांनींहि लोकांच्या घरोघर भक्तीच्या कावडी वाहिल्या आणि ' माझी भक्ति करा; त्यांतच तुमचें तारण आहे ' असें बोधगीत आपल्या मुरलींतून वाजविलें. जे भक्त गोपगोपींप्रमाणें भक्तिभावसमन्वित असतील त्या समाजांतील एका घटकावयवाची उत्तम सोय यानें होईल हें खरें; परंतु श्रद्धेचा ओलावा नसलेल्या तर्कप्रधान जिज्ञासूंसाठीं ज्ञानमार्गाचा दरवाजा उघडा करावयास हवा; व तसा तो प्रौढ कृष्णानें गीतेच्या गुरुकिल्लीनें केलाहि; परंतु येशूनें मात्र आपल्या सर्व अनुयायांना या भक्तीच्या दिंडींतूनच जावयास सांगितलें. जें येशूनें केलें, तेंच महंमदानें व तेंच बुद्धानें ! नेणत्या बालकांपासून जाणत्या वयस्कांपर्यंत सर्वांचे तोंडांत उपदेशाचे घास सारख्या आकाराचेच भरविण्यांत या धर्मांनीं मानवी स्वभावाविषयींचें आपलें अज्ञान किंवा सर्वांची अधिकारानुरूप सोय लावण्याची आपली असमर्थता व्यक्त केलेली आहे. हिंदुधर्म माल हिऱ्याच्या, मोत्याच्या, सोन्याच्या प्रत्येक प्रकारच्या दागिन्यांसाठीं निरनिराळ्या पेट्या बाळगणाऱ्या श्रीमंताप्रमाणें, प्रत्येक जिज्ञासूची व्यवस्था त्याच्या त्याच्या योग्यतेनुसार लावीत असतो. ' मी सांगतों याच रस्त्यानें साऱ्यांनीं ईश्वराकडे गेलें पाहिजे ' असें सांगणाऱ्या धर्मांची, हास्यास्पद अशी संकुचित वृत्तीच व्यक्त होते, हें लक्षांत घेऊन लोकमान्य लिहितातः—

" सर्वव्यापी ईश्वराकडे जाण्यास एकच वाट ठेविली आहे असें म्हणणें म्हणजे ईश्वराच्या घराला रानटी मनुष्याच्या घराप्रमाणें एकच दरवाजा आहे असें म्हणण्याइतकेंच उपहासास्पद आहे ! "

अशी उपहासास्पद वृत्ति इतर धर्मांची असली तरी प्रणेत्यांच्या व धर्मग्रंथाच्या अनेकत्वामुळें हिंदुधर्माची नाहीं. श्रीमत् शंकराचार्यांसारखी विचक्षण विभूति ज्ञानमार्गानें जाईल, श्री तुकाराममहाराजासारखा भक्तीचा जिव्हाळा जाणणारा दैवाचा पुतळा भक्तिमार्गानें प्रवास करील, तर लोकमान्य टिळकांसारखा कर्मकेसरी कर्ममार्गानें दौड ठोकील; पण सर्वजण शेवटीं एकाच मुक्कामाला पोंचतील, असें उदार व स्वातंत्र्यपोषक धोरण हिंदुधर्माशिवाय दुसऱ्या कोणत्या धर्माचें आहे ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण पांचवें.

हिंदु–धर्म–रहस्य.

हिंदुधर्माची प्राचीनतमता निर्विवाद आहे. एक हजार, दोन हजार, किंवा अडीच हजार इतक्या वर्षांमागें नजर टाकिली असतां मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध इत्यादि धर्मांचें उगमस्थान दृष्टीस पडतें; परंतु हिंदुधर्माच्य नदीचें मूळ माल अज्ञात आहे. ज्योतिःशास्त्रदृष्ट्या विचार करून रा. दप्तरी-सारखे विद्वद्वर्य लिहितात कीं, 'आर्य समाज व सनातन धर्म कमींत कमी बारा हजार वर्षांपूर्वी उत्पन्न झाला.' भूस्तरशास्त्रदृष्ट्या तर दुसरे कांहीं अभ्यासी लोक ऋग्वेदांतील संवादान्तर्गत पुराव्यावरून हिंदुधर्माचा जन्मकाल लक्षावधि वर्षें मागें लोटीत आहेत. उलटपक्षीं कांहीं वृथाभिमानी पाश्चात्य पंडित हा काल अलीकडे ओढण्याचा प्रयत्न करीत आहेत. हेतु हा कीं, आपला धर्म अगदींच पोरसवदा दिसूं नये! परंतु अशा पंडितांनाहि ऋग्वेदाचा काल दहा हजार वर्षांपेक्षां अलीकडे खेंचतां आला नाहीं. ह्मणजे **हिंदुधर्माचें वयोमान दहा हजारांपेक्षां अधिक आहे.** हें पौर्वात्य व पाश्चात्य, हिंदुधर्मीय व परधर्मीय––सर्वंच विद्वानांना निर्विवादपणें मान्य करावें लागलें आहे.

हें जें अनन्यसाधारण दीर्घायुष्य या हिंदुधर्माला लाभलें आहे त्याचें बीज त्याच्या अंगभूत श्रेष्ठतेमध्येंच आहे. आद्य ऋषींनीं ज्ञानाच्या कणाकणाची भर घालून जो पाया रचला तो खंबीर असाच ठरला. वेदकालीं रुजूं घातलेलें हें धर्मबीज वृक्षरूपानें अद्याप एकसारखें वाढत आहे. 'धर्म आणि शास्त्र यांच्या चिंतनांत मन अगदीं गढून जाणें हा प्रकार हिंदुस्थानांत आढळतो, तसा दुसरा कोठें आढळत नाहीं.' असे प्रशंसोद्गार मॅक्समुल्लरसारख्या वेदसेवकानेंच काढले आहेत असें नव्हे तर, ख्रिस्ताची तळी उचलणारे रे. डब्ल्यु हॉलंड या नांवाचे जे ग्रंथकार त्यांनींहि म्हटलें आहे कीं 'आध्यात्मिक बाबतींत हिंदुस्थान अर्ध्या मानव-जातीला मातृवत् झालेलें आहे.' जगन्माता होण्याचें भाग्य हिंदुधर्माला त्याच्या तत्त्वज्ञानामुळें प्राप्त झालेलें आहे. तत्त्वज्ञान हा हिंदुधर्माच्या पाठीचा कणा आहे. त्या तत्त्वज्ञानाचें भांडार ज्यांत सांठविलेलें आहे व ज्यांत हिंदु-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मांचें स्वरूप प्रगट झालेलें आहे अशा हिंदुधर्म ग्रंथांचें सामान्य स्वरूप आत दिग्दर्शित करूं.

हिंदुधर्माची चतुःसीमा म्हणजे चार वेद. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्व वेद ही त्यांचीं नांवें. ऋग्वेद हा हिंदुधर्माचा--किंबहुना अवघ्या जगाचा-- आद्य ग्रंथ. या ऋग्वेदाचीं दहा मंडलें असून श्लोकसंख्या दहा हजार आहे. य ऋचांच्या द्वारें ऋषींनीं देवतांचें शंसन केलेलें असून प्रार्थनाहि केलेली आहे. वरुण, मित्र, उषा यांसारखे द्युस्थानांतील, इंद्र, रुद्र, वायु, यांसारखे अंतरिक्ष स्थानांतील, आणि पृथ्वी, अग्नि यांसारख्या पृथिवीस्थानांतील निरनिराळ्या देवदेवतांच्या गुणांचें व पराक्रमांचें वर्णन करून आपल्याला धनधान्यपशुपुत्रादि समृद्धि द्यावी अशी याचना केलेली आहे. यांतील उषा सूक्तासारखे कांहीं भाग तर काव्यदृष्टया नितांत रमणीय आहेतच; पण मुख्यतः यांतील बहुतेक सूक्तांतून अनुस्यूत झालेलें ईश्वरविषयक परिणत ज्ञान अखिल जगतांत अद्वितीय आहे.

" आनीदवातं स्वधया तदेकं
तस्माद्धान्यन्न परः किंचनाऽऽस "

या शब्दांत जगाच्या मूळारंभींची स्थिति कथन करणाऱ्या ऋषीबद्दल 'गीतारहस्य' कारांनीं काढलेले पुढील उद्गार स्मरणीय आहेतः---

'नामरूपात्मक नाना देखाव्यांच्या जाळ्यांतच गुंतून न रहातां त्यापलीकडे कांहीं तरी एक व अमृततत्त्व आहे हें ज्ञानदृष्टया ओळखणें हेंच सर्व वेदान्त शास्त्राचें रहस्य होय; आणि या लोण्याच्या गोळ्यावर नासदीय सूक्ताच्या ऋषीच्या बुद्धीची पहिल्याच झपाट्यास जी अचुक उडी पडली आहे त्यावरून त्याचें अंतर्ज्ञान किती तीव्र होतें तें स्पष्ट दिसून येतें.'

याच्याशीं तुलनेकरतां जगदुत्पत्तीसंबंधीं अन्यधर्मांनीं पत्करिलेलें ताकाचें पाणी ध्यानीं आणावें म्हणजे या भारतीय 'लोण्याच्या गोळ्याची' अपूर्वता व अतुल्यता स्पष्ट होईल. तत्त्वज्ञानानें व काव्यसर्वस्वानें परिपूर्ण असणाऱ्या अशा ऋग्वेदांतील ऋचा यज्ञप्रसंगीं म्हणत असत. त्या यज्ञाची रचना वगैरे तंत्राचा भाग यजुर्वेदांत आहे; आणि त्या ऋचा आलापांत कशा गाव्यात हें सामवेद सांगतो. म्हणजे ऋग्वेदांत शंसन, यजुर्वेदांत हवन व सामवेदांत गायन हें प्रधानांग आहे. अथर्ववेद मागाहून झालेला आहे व त्यांत जादूटोणा,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जारण मारण यासंबंधीं मंत्र आहेत; म्हणून त्याला पूर्वोक्त वेदत्रयीइतकें महत्त्व देत नाहींत. या वेदांचे मंत्र, ब्राह्मण, आरण्यकें असे भाग पडलेले आहेत.

ज्ञान सम्राट अशा वेदांतील ऋचा गात जे यज्ञ चालत त्यांच्यासभोंवतीं बसणाऱ्या ऋषींमध्यें जीव, जगत् व जगन्नाथ या त्रिपुटीबद्दल चर्चा होत असे; तिला चिरंजीव करण्याचें कार्य ज्या ग्रंथांनीं केलें ते म्हणजे उपनिषदें! या उपनिषदांची संख्या दीडशें असलीं तरी दहा उपनिषदें प्रमुख व प्रसिद्ध आहेत.

' कीं हे सुखाचीं तारुवें लोटलीं।
आक्षै आनंदें उतटलीं।
विश्वजनास उपेगा आलीं।
नाना प्रयोगाकारणें ॥ '

हें समर्थकृत वर्णन जर कोणत्या ग्रंथांना यथार्थत्वानें लागू पडत असेल तर या उपनिषदांनाच. या ' विवेकनिधीच्या भांडारांनीं ' कैकांचें मनोदैन्य हरण केलें आहे. जीवितास विटलेल्या शोपेनहौरनें जेव्हां हें " नाना सुखाचें उचंबळलें सरोवर " पाहिलें तेव्हां आनंदानें वेडा होऊन तो म्हणूं लागला:—

' In the whole world, there is no study so beneficial and so elevating as that of the Upanishads. It shall be the solace of my life, and the solace of my death.'

आयुष्याच्या मंदिरांत आनंदाचा नंदादीप तेवत ठेवणारा व त्यायोगें मृत्यूच्या अंधाऱ्या दालनावरहि उजेड पाडणारा उपनिषदांचा ठेवा अवघ्या पृथ्वींत अतुल्य आहे असें त्यांचें म्हणणें आहे! मेकॉलेसारख्या एकाद्या लेखकानें वेदांवर व त्यांच्या उपनिषद्–ब्राह्मणादिक संततीवर कितीहि बोटें मोडलीं असलीं व ' इसापच्या गोष्टींपेक्षां ब्राह्मणग्रंथ अधिक विचारार्ह किंवा मौल्यवान् आहेत असें नाहीं ' असें वाष्कळ विधान ठोकून दिलेलें असलें, तरी त्यामुळें त्या ग्रंथांची योग्यता तिळमात्र कमी न होतां साहेबमजकुरांचें अज्ञान किंवा स्वार्थ मात्र खासा नजरेस पडतो. कारण, जे जे निर्विकारी विद्वान या ग्रंथसंपत्तीकडे पाहूं लागले ते सर्व दिपून गेले. बाय-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बल किंवा कुराण यांप्रमाणें असंबद्ध अथवा भाकडकथा उपनिषदांत नसून तर्कशुद्ध विचारसरणीनें तत्त्वज्ञानाचा उलगडा केलेला आहे. देवानें बाग केला, पुरुष केला, त्याच्या बरगडीपासून स्त्री केली, साप केला—इत्यादि शास्त्रीय दृष्ट्या असमर्थनीय अशा बालिश गप्पा उपनिषदांत झोंकलेल्या नाहींत. त्यांतील गूढ सिद्धांतांचें आकलन होऊन त्यांचें रहस्य जसजसें उकलत जातें, तसतसें त्यांचें सत्यत्व आधुनिक शास्त्रदृष्टयाहि सिद्ध होत आहे. प्रो. रा. द. रानडे यांनीं उपनिषदांचें आलोचन करून आपल्या ग्रंथांत त्यांची श्रेष्ठता सप्रमाण दाखविलेली आहे. नमुन्याकरतां मनुष्याच्या उत्पत्तीचें एक उदाहरणहि येथें पुरेसें होईल. आकाशांतून पाऊस, पावसांतून वनस्पति, वनस्पतीपासून पुढें अन्न, नंतर पुरुष अशी दिलेली उत्क्रांतिपरंपरा सत्य आहे हें स्पष्ट आहे. शिवाय, 'ओषधीभ्यः अन्नं अन्नात् पुरुषः।' या वचनांतील अन्न शब्दाचा अर्थ, 'अद्यते आत्ति च' या उपपत्तिप्रमाणें प्राणीवर्ग असा घेतला पाहिजे व तो तसा ग्रहण केला म्हणजे वनस्पतिसृष्टि व त्यामध्यें मानवसृष्टि ही उत्क्रांतिशास्त्राची परंपरा येथें तंतोतंत पाळल्याचें दिसून येतें. अशा तर्कशुद्ध विचारप्रागल्भ्याला मोहित होऊन डयूसेन-प्रमुख वेदोपासकांनीं उपनिषदांवर स्तुति-सुमनांजलि उधळलेली आहे. तिची परीक्षा स्थालीपुलाकन्यायानें व्हावी म्हणून भट्ट मोक्षमुल्लर यांचा उपनिषदांसंबंधींचा अभिप्राय पुढें देतों. ते म्हणतात:—

'Upanishadas maintain a place in the literature of world amongst the **most astonishing productions** of the human mind in any age and in any Country.'

कोणत्याहि देशांत व कोणत्याहि काळांत उपनिषदांचें स्थान अत्युच्च आहे असें सांगून साहेब म्हणतात:—

'They are to me like the light of the morning, like the pure air of the mountains, so simple, so true if once understood.'

हे सत्योद्गार विशेषतः शेवटचे तीन शब्द—मेकॉलेप्रभृतींना समजले असते तर त्यांनीं ब्राह्मणग्रंथासंबंधीं काढलेले पूर्वोल्लेखित उद्गार काढण्याइतका असमंजसपणा खास केला नसता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेद व उपनिषदें यांमध्यें आर्यांच्या बुद्धीची जी सूक्ष्मता व प्रगल्भता दृष्टीस पडते ती षड्दर्शनांमध्यींहि व्यक्त होते. जैमिनीची पूर्वमीमांसा, बादरायणाची उत्तरमीमांसा, कपिलाचें सांख्यशास्त्र, गौतमाचें न्यायशास्त्र पातंजलीचें योग-शास्त्र व कणादाचें वैशेषिक शास्त्र—या षडदर्शनांमध्यें जें बुद्धिवैभव प्रगट झालेलें आहे त्याची बरोबरी करणारे ग्रंथ हजारों वर्षें लोटलीं तरी अद्याप झालेले नाहींत. जगांतील ' आश्चर्यसप्तकां ' त मोडण्यासारखे हे प्राचीन भारतीय ग्रंथ असामान्य आहेत. शेंकडों प्रयोग करून व्यायामाच्या ज्या पद्धति अमेरिकनादि तज्ज्ञ बसवीत आहेत, त्यांचें वर्णन आमच्या योगशास्त्रांत पूर्वीच करून ठेवलेलें पाहून ' रामचरका ' सारखे पाश्चात्य विद्वान भारतीय ज्ञानापुढें लोटांगण घालीत आहेत, भारतीय तत्त्वज्ञानाची सोळावी कलाहि पश्चिमेकडे उदय पावली नाहीं. याबद्दल तर दुमतच नाहीं. जी स्थिति योगशास्त्राची, जी स्थिति तत्त्वज्ञानाची तीच इतर शास्त्रांची. या सर्व बाबतींत भारतीय ज्ञान भांडार अद्यापि अतुल्य असेंच आहे. या ज्ञानभांडाराचें संक्षिप्त स्वरूप प्रस्थान-त्रयीच्या रूपानें पहावयास सांपडतें.

प्रस्थानत्रयी म्हणजे गीता, उपनिषदें व वेदान्तसूत्रें. हिच्या योग्यतेसंबंधीं ' रहस्यकार ' म्हणतात—

' प्रस्थानत्रयी म्हणजे निवृत्ति व प्रवृत्ति मिळून दोन्ही मार्गांचें पद्धतशीर व तात्त्विक विवेचन करणारे वैदिक धर्माचे तीन मुख्य आधारभूत ग्रंथ किंवा खांब होत.

या प्रस्थानत्रयीला हिंदुधर्मांत इतकें महत्त्व व प्रामाण्य प्राप्त झालें कीं, ज्यानें ज्यानें एकएकदां धर्मसंप्रदाय संस्थापिला, त्या त्या आचार्यांनें प्रस्थान-त्रयीवर भाष्य लिहिलें. असें श्रेष्ठत्व प्राप्त होण्यासारखेच प्रस्थान त्रयींतील ग्रंथ आहेत. उपनिषदांचें स्वरूप व महत्त्व मागें सूचित केलेलें आहेच. त्यांच्यांत एकवाक्यता करण्याचें कार्य वेदांतसूत्रांनीं केलेलें असल्यानें त्यांनाहि मोठेपणा मिळाला. आणि श्रीमद्भगवद्गीतेबद्दल तर सांगावयासच नको. हा ग्रंथराज म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानाचा कौस्तुभमणिच होय. त्याचें नित्य-नव्य, रम्य दिव्य तेज अक्षरशः त्रिखंडांत पसरलेलेंच आहे. सबब त्याच्या वर्णनानें जागा अडविण्याची गरज नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्माचें एक अंग जें तत्त्वज्ञान त्या संबंधींचे उपर्युक्त भारतीय ग्रंथ जसे श्रेष्ठ आहेत त्याप्रमाणेंच धर्माचें दुसरें अंग जी नीति तीसंबंधानें विचार करणारे स्मृति–ग्रंथहि सर्वमान्य होण्यासारखेच आहेत. एकंदर स्मृति एकशें आठ असल्या तरी, मनुस्मृति, याज्ञवल्क्य स्मृति, पराशरस्मृति, वसिष्ठस्मृति, गौतमस्मृति, विष्णुस्मृति, बृहस्पतिस्मृति, बौधायनस्मृति, इत्यादि स्मृति प्रमुख होत. या स्मृतींमध्यें जगदुत्पत्तीसंबंधीं जरी थोडें विवरण असलें तरी त्यांचा मुख्य विषय म्हटला म्हणजे चार वर्ण, चार आश्रम, राजधर्म, दांपत्यधर्म इत्यादि व्यवहारांचें विवेचन करणें व निर्बंध घालून देणें. कोणाहि कायदे-कारानें कौतुकच करावें इतकी व्यवस्थित मांडणी या स्मृतिग्रंथांची आहे. त्यांच्याशीं तुलतां येतील असे ग्रंथ दुसऱ्या कोणत्याहि धर्मांत सांपडणें कठीण. ‘ जुनें ठेवणें मीपणें आकळेना ’ या न्यायानें आंधळे होऊन घरच्या काम-धेनूवर हत्यार उपसणाऱ्या झुंजार हिंदु बांधवांनीं मनुस्मृतीसमवेत आपल्या ज्ञानाचें, धर्माभिमानाचें व स्वत्वाचें दहन करण्यापूर्वी पाश्चात्य तत्त्ववेत्ता नित्से ज्ञानें जातींचा नसता अभिमान सोडून सत्यशोधक बुद्धीनें जो अभिप्राय नमूद केलेला आहे तो नजरेखालीं घालण्याची तसदी घ्यावयास हवी होती. मनुस्मृतीसंबंधानें नित्से म्हणतो:—

‘Incomparably intellectual and superior work, which, it would be a sin against the spirit even to name in the same breath with the Bible. It has actual philosophy behind it. Sunshine spreads over the entire book.’

‘शब्दाशब्दांतून ज्ञानाचे किरण फेंकणाऱ्या मनुस्मृतीची श्रेष्ठता इतकी अतुल्य आहे कीं, तिच्या नामोच्चरणानंतर बायबलचें नांव घेणें म्हणजे जीभ विटा-ळणेंच होय’ असा खडखडीत अभिप्राय त्यानें दिलेला आहे. देशकालानुरूप क्वचित् मुरड घालणें कोणत्याहि ग्रंथाला जरूर असते. तेवढी काजळी झाडली कीं, मनुस्मृतीचें तेज सर्वांना उपकारक असेंच आहे हें हिंदु धर्माला भडाग्नि देऊं पाहणाऱ्या आगलाव्याशिवाय सर्वांना मान्य होणारें आहे.

भारतीयांचे पुराणेतिहासहि जगाच्या वाङ्मयांत अप्रतिम ठरलेले आहेत. पुराणांची संख्याहि उपनिषद्स्मृतींप्रमाणें शतावधिच आहे. त्यांपैकीं अठरा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुराणें व अठरा उपपुराणें प्रसिद्ध आहेत. पूर्वी घडलेली हकीकत देण्याचें काम पुराणांत केलेलें असतें हें ' पुरां परंपरां वक्ति पुराणं तेन वै स्मृतं ' या पद्म-पुराणांतील वचनावरून स्पष्ट आहे. पुराणांचे विषय पुढील श्लोकांत सांगितलेले आहेत:—

सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वंतराणि च ।
वंशानुचरितं यस्मिन् पुराणं तत्प्रकीर्तितम् ॥

साधारणपणें एकएका पुराणांत एकएका देवाचें माहात्म्यवर्णन असतें. आणि त्या एकांतिक वर्णनाचा उद्देश, इतर मार्गांकडे चित्त न चळतां अव्यभिचारी भक्तीकडे तें वळावें हाच होय.

खरोखर पाहतां स्त्रीबालवृद्धांना मनोरंजनाच्या चमच्यानें धर्मामृत पाजण्याचें महत्कार्य हीं पुराणें करीत आहेत.

भारतीय इतिहासाचे मुख्य ग्रंथ दोन. महाभारत व रामायण हे ते राष्ट्रीय ग्रंथ प्रत्येक हिंदूला आनंद आणि स्फूर्ति यांचें दान प्रत्यहीं करीत आहेत. गांडीव धनुष्याच्या टणत्कारांतूनच भवानी तलवारीचा खणखणाट जन्मास आला. अशा भारताचें वाचन सोडून गिबनचें पारायण करा म्हणून मित्राला सांगणाऱ्या आमच्या सुधारकाचार्यांची कींवच करावयास नको काय ?

इतिहासाचे विषय आमच्याकडे कोणकोणते मानलेले आहेत तें पुढील श्लोकावरून कळेल:—

धर्मार्थकाममोक्षाणामुपदेशसमन्वितम् ।
पूर्ववृत्तं कथायुक्तमितिहासं प्रचक्षते ॥

या विषयांचें रमणीय वर्णन रामायण–महभारतांत सांपडतें. सर्व देवांना कारागृहांत कोंडलेल्या रावणाचा वध रामानें केला ही कथा रामायणांत सांगितलेली आहे आणि कौरवांनीं कपटानें राज्य हरण करून पांडवांना वनवासांत पाठविल्यानंतर श्रीकृष्णाच्या अनुग्रहानें पांडवांनीं स्वराज्य संपादन केलें हा भारताचा विषय आहे. या विषयाच्या अनुरोधानें उपाख्यानें, वर्णनें, तत्त्व–ज्ञानाची चर्चा, नीतीची मीमांसा, इत्यादि इतके भाग या दोन्ही ग्रंथराजांत –विशेषतां भारतांत– आलेले आहेत कीं,

'म्हणऊनि महाभारतीं नाहीं । तें नोहे लोकीं तिहीं ।
येणें कारणें म्हणिपे पाही । व्यासोच्छिष्ट जगत्रय ॥ –

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

‘ जें या ग्रंथांत नाहीं तें जगांत नाहीं; जगांत जें आहे तें सर्व या ग्रंथांत आहे’ हें अतिशयोक्त विधानाहि कांहीं अंशीं खरें वाटूं लागतें. महाकाव्य या दृष्टीनेंहि महाभारत हें इलियड वगैरे इतर महाकाव्यांपेक्षां निःसंशय श्रेष्ठ आहे असें मत भारताचार्य वैद्यांनीं सप्रमाण व सयुक्तिक रीतीनें सिद्ध केलेलें आहे. या दोन राष्ट्रीय ग्रंथांच्या पाठीमागें हिमालयासारखी उत्तुंग व धवल अशी जी संस्कृति उभी आहे तिच्यासंबंधानें अरविंद बाबू म्हणतातः—

‘ Civilization in Ramayan & Mahabbharat is second to none in massiveness of its outlines or perfection of its details.

अद्वितीय असा हा भारतीय ज्ञान–निधि दुसऱ्या कोणत्या धर्माला हेवा वाटावयास लावणार नाहीं?

तत्त्व–चर्चा करणाऱ्या श्रुति, समाजव्यवस्था सांगणाऱ्या स्मृति आणि नीतिपाठ देणारे पुराणेतिहास यांमध्यें जरी विविध विषयांचा समावेश झालेला असला तरी त्या भिन्नत्वांतून आरपार ओंवलेलें असे एक सूत्र आहे आणि तें म्हणजे अद्वैतमत. हिंदुधर्माला एकेश्वरी मत संमत नाहीं असें विधर्मी उपदेशक किंवा स्वधर्मी ‘ समाजिस्ट ’ जें तुणतुणें वाजवीत असतात तें निखालस निराधार असून त्यांच्या अज्ञानाचें व दिशाभुलीच मात्र दर्शक आहे. सर्व विश्वांतील अणुरेणूंत एकच ईश्वरी तत्त्व ओतप्रोत भरलेलें आहे हें वेदशास्त्रपुराणें दोन्ही हात उभारून कंठरवानें सांगत आहेत. ऐकायला न आलें तर दोष बहिरटांचा; हिंदुधर्माचा नव्हे! ईश्वराचें सर्वव्यापित्व कोणत्याहि इतर धर्मापेक्षां अधिक स्पष्टपणें व सयुक्तिकपणें हिंदुधर्माच्या वेदोपनिषदादि ग्रंथांत सांगितलेलें आहे हें सिद्ध करण्यासाठीं उतारे देणें म्हणजे महाभारतासारखा प्रचंड ग्रंथ लिहिणेंच होय !

‘ स भूमिं विश्वतो वृत्वाऽत्यतिष्ठद्दशांगुलम्’ ही, ईश्वराचें सर्वव्यापित्व दर्शविणारी, पुरुषसूक्तांतील ब्राह्मण–कुमारांनाच काय, पण कोणत्याहि हिंदु मुलाचे कानांवर तिचाच अनुवाद,

‘ स्थिरचर व्यापुनि अवघा तो परमात्मा दशांगुलें उरला’ या आर्यार्धाच्या रूपानें सतत खेळत असतो. दहा बोटें हें मनुष्याच्या परिमाणाचें प्रमाण. त्याच्याहि पलीकडे म्हणजे परिमाणातीत अर्थात् अमर्याद अ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तें तत्त्व 'जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं' म्हणजेच सर्वत्र भरून राहिलें आहे. हें ज्ञान पुराणादिकांच्या द्वारें हिंदु समाजाच्या खालच्या थरापर्यंत मुरलें आहे. संतपरंपरेनें तर हरिहरादि देवांत अभेद मानून ईश्वराचें एकत्व व सर्वव्यापित्व पुनः पुनः गाइलें आहे. मनूनें धर्मलक्षणाच्या ज्या चार कसोट्या सांगितल्या आहेत कीं, 'वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः' या चारहि कसोट्यांवर हें ईश्वरी एकत्व व सर्वव्यापित्व सिद्ध होत आहे अशी खाही तुकाराममहाराज पुढील अभंगांत नमुनेदार मुद्देसूतपणानें देत आहेतः--

'विश्वीं विश्वंभर। बोले वेदांतीचा सार॥
जगीं जगदीश। शास्त्रें वदती सावकाश॥
व्यापिलें हें नारायणें। ऐसी गर्जतीं पुराणें॥
जनीं जनार्दन। संत बोलती वचन॥
सूर्याचिया परी। तुका लोकीं क्रीडा करी॥

'सर्वं खल्विदं ब्रह्म' इत्यादि वेदवाक्यापासून 'विश्वीं विठ्ठल विस्तारला' या अभंगवाणीपर्यंत ईश्वरी एकत्वासंबंधानें सुस्पष्ट स्वर हिंदुधर्मांतून निनादत आहे हें, स्वार्थानें किंवा अज्ञानानें बधिर झालेल्या लोकांविना, कोणाला मान्य होणार नाहीं ?

ख्रिश्चन- मुस्लीमादिक धर्मांप्रमाणें--किंबहुना त्रीधेनु वगैरेंस न वगळ- ल्यामुळें त्याच्यापेक्षां अधिक स्पष्टपणें--एकेश्वरी मत हिंदुधर्मांत अधिष्ठित असूनहि, शाळेंतील क्रमिक पुस्तकांप्रमाणें, अधिकारानुरूप सर्व साध- कांची व्यवस्था लावण्यासाठीं, उपास्यांचा अनियम कल्पिलेला आहे. साऱ्या रोगांवर सोनामुखीच देणाऱ्या वेडसर वैद्याप्रमाणें सर्व जीवांना एकच उपास्य व एकच साधन यांची मात्रा उगांळून देण्याचा अडाणी अन्याय हिंदुधर्मानें केलेला नाहीं. प्रत्येक तत्त्व-विवेचकाच्या मनामध्यें बहुदेवत्वाची कल्पना एकदां चमकून जाते. त्याप्रमाणेंच ती हिंदुधर्मांतहि आढळते. ईश्वरविषयक वैदिक कल्पनांची उत्क्रांति कसकशी होत गेली हा इतिहास लिहिण्यासारखा आहे. चमकदार उषा, गरजणारा रुद्र इत्यादि सृष्ट-चमत्कारस्थ देवांच्या गुंतावळींतून एकच देव मानण्याकडे आर्यांच्या मनाचा कल कसा झाला, 'सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च।' असें म्हणून दृश्य व दिव्य अशा सूर्याला महत्त्व कसें दिलें गेलें, त्याच्या विविध कालाच्या व कार्याच्या स्वरूपावरून त्याला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भिन्नभिन्न नांवें कशीं प्राप्त झालीं, त्याच्या उदयाबद्दल कुराणांतील मार्गे उल्ले- खिलेल्या बालिश विधानाप्रमाणें न लिहितां, ' न कदाचित् उदेति ।' उभा दाधार पृथ्वीमुत द्याम् ।' 'दिवि सोमो अधिश्रितः' । इत्यादि शास्त्रीय चिकित्सेला पटणारीं अशींच सत्य तत्त्वें कशीं मांडलीं आहेत, त्यानंतर स्थूलांतून सूक्ष्माक नजर फेंकून त्वष्टा, विश्वकर्मा, प्रजापति इत्यादि भावरूप देवांची कल्पना क कशी वाढत गेली व निर्गुण ब्रह्मांत कशी परिणत झाली हा इतिहास चित्त असला तरी त्याचें विवेचन करणें अस्थानीं होईल. येथें एवढें सांगितलें त पुरें होईल कीं, एकेश्वरी मताची बैठक स्थिर ठेवूनच हिंदुधर्मांत अनेक दे कल्पिलेले आहेत. एक एक गुणाचा आदर्श म्हणून बलभीम, गणपति इत्या पौराणिक देव निर्माण केले व त्या गुणांची उपासना करण्यासाठीं श्रद्धा उत्प व्हावी म्हणून त्यांच्या पराक्रमांचीं पुराणें रचिण्यांत आलीं. परंतु असे व घेत असतांनाहि एकेश्वरी मताचा ध्रुवतारा अढळपणें दृष्टीसमोर ठेविलेला होत हिंदुधर्मांत अनेक देवदैवतें असतील– आहेतहि, पण तें लांच्छनास्पद न भूषणभूतच आहे. कारण त्यांची मांडणी सहेतुक व तर्कशुद्ध आहे. आ ज्यांना त्यांतील रहस्य उकलत नाहीं त्या माकडांनीं तो नवरत्नहार फें द्यावा हें साहजिकच आहे. दशावताराच्या कल्पनेंतील शास्त्रशुद्ध उत्क्रांति बीज न कळल्यामुळें ज्या एका 'महात्म्या'नें, मच्छ्यांतून आले म्हणून म व कचव्यांतून आले म्हणून कच्छ, रानडुकरासारखी मुसंडी मारणारा वराह, व सिंहाची बायको तो नारसिंह, अशा व्युत्पत्तीचें शब्द तासडण्या सपाटा चालविला, त्याच्या अकलेची तारीफ करावी तेवढी थोडीच ! वास्त- विक, पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं जें उत्क्रांति–तत्त्व शोधून काढलें त्यास अनुसरू अशीच दशावतारांची मांडणी आहे. मत्स्य–कच्छ हे केवल जलचरप्राणी, नंतर वराह स्थलजलचर, पुढें नृसिंह पशु व मानव यांच्यांतील दुवा, आ वामन, परशुराम, राम व कृष्ण हे मनुष्यांतील अधिकाधिक सुधारलेले आद पुरुष–अशा शास्त्रशुद्ध पद्धतीनें दशावतारांची मांडणी आहे–हें रहस्य क लागल्यामुळें विद्वान लोक प्राचीन भारतीय ज्ञानाचे गोडवे गात आहेत. प अशा समंजस वर्तनाची अपेक्षा ' महात्म्या ' कडून कशी बरें करतां येई

दशावतारांत जी तर्कशुद्धता तीच मूर्तिपूजेंत. परधर्मीयांकडून हिंदू 'मूर्तिपूजक' हा शब्द शिवीप्रमाणें लावला जातो व सोरटी सोमनाथाच्या द

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खोराप्रमाणें स्वतांला मूर्तिनिंदक–नव्हे, मूर्तिभंजक म्हणविण्यांत त्यांना मोठेपणा वाटला. यांत दुःखाची गोष्ट एवढीच कीं, कांहीं हिंदु लोकच 'पाषाणीपूजक' बनून त्यांची री ओढतात. खरें पाहिलें तर, निर्गुण परमेश्वराचें चिंतन हिंदुधर्म-ग्रंथच अधिक समर्पकतेनें उपदेशितात; परंतु 'क्लेशोऽधिकतरस्तेषां' असल्यामुळें सामान्य लोकांसाठीं चित्तस्थैर्याच्या सौलभ्यार्थ मूर्तिपूजेचा हा पांगुळगाडा तयार केलेला आहे. वेदकालीं तर मातापिता, आचार्य, अतिथि व पति किंवा पत्नी यांचे पंचायतनाची पूजा रूढ होती. 'पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः' अशीं निर्गुणत्वाचीं प्रतिपादकें उपनिषदादि ग्रंथांत पदोपदीं सांपडतात आणि यजुर्वेदांत तर स्पष्टच म्हटलें आहे कीं न 'तस्य प्रतिमा अस्ति'। परंतु या प्रतिमेच्या पोटीं प्रतिष्ठापिलेला भावच भक्ताला उपकारक असतो हें व्यवहार्य तत्त्व हिंदुधर्म विसरला नाहीं हें त्याचें वैशिष्ट्य.

'न काष्ठे विद्यते देवो न पाषाणे न मृण्मये।

हें तत्त्व खिश्चन-मुस्लीमांनीं हिंदुपासून घेतलें असेल. परंतु त्यांची ती सर्व बांधलेली शिदोरी असल्यामुळें

भावे हि विद्यते देवो तस्माद् भावो हि कारणम्

हें इंगित मात्र हिंदूप्रमाणें खिश्चन-मुस्लिमांना जाणतां आलें नाहीं. 'मानला तर देव, नाहीं तर दगड' इत्यादि सर्वपरिचित लोकवचनांमध्येंहि मूर्ति-पूजेचें बीज सांठविलेलें आहे. पण त्याकडे कानाडोळा करून 'मूर्खस्य प्रतिमा-पूजा' असा मंत्र कांहीं शहाणे जपत असतात. केवळ मूर्तींत देव नाहीं हें तत्त्व सांगण्यासाठीं सात हजार मैलांवरून उंटावरील शहाण्यांनीं येथें धांवून येण्याचें कारण नाहीं.

अर्वाचीन विद्वानांना माणसांचे पुतळे चालतात, पण देवांचे चालत नाहींत. याबद्दल आश्चर्य व्यक्त करून मूर्तिपूजेचें मर्म लोकमान्यांनीं दोन दाखले देऊन पुढीलप्रमाणें उकलून दाखविलें आहेः––

'व्हाइसरॉय हे जसे बादशहा नव्हेत, पण बादशहांचे प्रतिनिधि आहेत तशी ईश्वराची सर्वव्यापी मूर्ति ही प्रतिनिधि आहे. मूर्तिपूजेंत कांहीं सूचक चिन्हेंहि आहेत. जुन्या पैशावरील तराजू हें जसें ईस्ट इंडिया कंपनीचें चिन्ह आहे, तसेंच विष्णूच्या हातांत चक्र ठेविलें आहे, तेंहि त्याच्या हातांत चक्र फिरत आहे त्याचें दर्शक आहे.'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूर्तीच्या ठायीं भक्त जो भाव ओतीत असतो व तिच्या ध्यानामध्ये परमेश्वराचे जे गुण चिंतितो, त्यायोगेंच 'श्रद्धेनें भजल्यातें पाषाणहि फलप्रद होतो. 'भाव तेथें देव' ही गुरुकिल्ली न समजल्यामुळें ख्रिस्ती वा अर्ध ख्रिस्ती लोक मूर्तिपूजेवर तुटून पडतात. वास्तविक, स्थूल दृष्टीच्या सामान्य लोकांपुढें ध्यानाच्या सुलभधारणेप्रीत्यर्थ कांहीं तरी प्रतीक अवश्यच असतें. ख्रिश्चनाचें चर्च व क्रास, मुसलमानांची मशीद व कावा, बौद्धांचे विहार, पा घांची अग्यार–हीं सर्व मूर्तिपूजेचीं भिन्न स्वरूपें नाहींत काय ? मूर्तिपूजेला नांवें ठेवणारे ख्रिश्चन लोकच सहाव्या शतकापर्यंत ख्रिस्त, मेरी व इतर सं यांच्या प्रतिमांची पूजा करीत असत. बौद्ध लोक बुद्धाचे चरणीं देवत्वाचे षोड शोपचार अर्पण करतात आणि मुसलमानांच्या विसंगतीबद्दल तर बोलावयास नको इकडे मूर्तिपूजेचे कट्टे द्वेष्टे म्हणून मिरवावयाचें; आणि नमाजाची वे आली कीं, मक्कामदिनेकडे तोंड फिरवावयाचें ! ताबूत या नांवाखालीं हसन हुसेनांची जी प्रेतयात्रा काढतात तिच्यांत व मूर्तिपूजेंत अंतर कोणतें ? असले तर तें हेंच कीं, मुसलमान प्रेताचा गौरव करतात ! हिंदु जिवंत अशा ग पत्नीचा गौरव करतात ! हिंदूंच्या शाळिग्रामाच्या पूजेला हंसणाऱ्या महंमदी यांनीं 'कृष्णपाषाणाचें' चुंबन कां घ्यावें ? तीर्थजलाला नांवें ठेवणारे मुसलमान 'झमझम' विहिरीचें पाणी ज्या पूज्यतेनें पवित्र मानतात, ती ध्यानी घेतली म्हणजे 'मी हांसें लोकां; शेंबूड माझ्या नाकां' या म्हणीची सत्य पटते. हिंदूंच्या डोळ्यांत भासमान होणारें कुसळ काढण्यापेक्षां आपल्या डोळ्यां तील मुसळ काढून टाकण्याइतकी आत्मनिरीक्षणाची बुद्धि मुसलमानां आहे काय ?

तात्पर्य, अद्वैत मत मान्य करूनहि सगुणोपासनेचें साधन हिंदुधर्मानें मोक ठेविलेलें आहे. तुकाराम महाराज तर एक वकिली प्रश्न विचारतात कीं–

> अवघें ब्रह्मरूप रितां नाहीं ठाव ।
> प्रतिमा तो देव कैसा नव्हे ? ॥

जर सर्व विश्वांत ईश्वर व्यापून राहिलेला आहे; तर त्या विश्वाचा एक अ यव जी प्रतिमा तिच्यांत देव नाहीं हें कसें ? भक्ताच्या सुखासाठीं वि विस्तारलेलें ईशत्व मूर्तींत केंद्रीभूत झालेलें असतें हें तत्त्व विशद करण्यासा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुका म्हणे हरि अवघा एकला । परि हा धाकुला भक्तीसाठीं ॥

जिज्ञासूच्या बुद्धीच्या समाधानासाठीं जसा अद्वैतसिद्धांत तशी साधकाच्या आचरणाच्या सुलभतेसाठीं मूर्तिपूजा. त्याप्रमाणेंच जगांत सापाप्रमाणें पसरलेल्या विषमतेमुळें उत्पन्न होणारा विषाद नष्ट करुन विश्वयंत्राची रचना उलगडून दाखविण्यासाठीं "पुनर्जन्मवाद" हिंदु-धर्मानें सांगितलेला आहे. व आधुनिक पाश्चात्य जडवाद्यांनाहि तो पटत आहे. मरणोत्तर स्थितीसंबंधानें किती तीव्र जिज्ञासा विवेचक मनुष्याला असतें याचें उत्तम उदाहरण कठोपनिषदांतील नचिकेताचें आहे व थिआसफिस्ट वगैरे आधुनिकांचे जे प्रयोग चालू आहेत, त्यावरुनहि तीच जिज्ञासा दिसून येते.

'भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः।'

असा चार्वाकवाद मानला तर कृतप्रणाश व अकृताभ्यागम या आपत्तींच्या दाढेंत जग चिरडलें जाईल. बौद्धख्रिश्चनमुस्लिम यांच्या धर्मांत मरणोत्तर स्थितीसंबंधीं किती पोरकट, हास्यास्पद व तर्कविरुद्ध कल्पना आहेत व त्यामुळें त्या अनुयायांच्या मनांत असमाधानाची चुटपुट कशी वास करीत असते, हें पूर्वी दाखविलेंच आहे. पारशीहि त्यांच्याच कोटींतले.

'वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवनि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ॥

असा पुनर्जन्माचा सिद्धांत सांगून भगवान् श्रीकृष्ण भक्तजनांना 'बहूनां जन्मनामन्ते' 'अनेकजन्मसंसिद्धि' प्राप्त होईल असें आश्वासन देत आहेत. ईशावास्योपनिषदांतहि,

'अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययामृतमश्नुते ।'

असा पुनर्जन्माच्या चक्रांतून सुटका करुन घेण्याचा मार्ग सांगितलेला आहे. पुनर्जन्माचा वाद इतका व्यापक आहे कीं त्याच्या पूर्वोत्तरपक्षाची अस्थानीं चर्चा न करतां येथें एवढेंच सांगतों कीं, अद्वैत, मूर्तिपूजा व पुनर्जन्म हा हिंदुधर्मांतील तत्त्व-त्रयी कोणाहि धर्ममुमुक्षूला समाधान देणारी अशीच आहे. इतर कोणत्याहि धर्मांत न आढळणारी ही तत्त्वत्रयी म्हणजे हिंदुधर्माच्या सर्वोत्कृष्टतेचा पायाच होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण–सहावें.

हिंदुधर्माची व्यवहार्यता.

समाज-शीलता हें एक मनुष्यप्राण्याचें अनन्य साधारण लक्षण आहे. पशु-प्रमाणें एकेकट्याचेंच कल्याण न पहातां शक्य तितक्या अधिक प्राण्यांच्या हितसंबंधाची एक सांखळी तयार करणें हें कार्य मनुष्याचेंच. स्वतांचें उदरंभरण झालें कीं आपली इतिकर्तव्यता संपली असें जो मानतो तो मानवच नव्हे. आपल्या घासाचा अर्धा भाग आपल्या कुटुंबीयासाठीं काढून ठेवण्याची बुद्धि मनुष्य-प्राण्यालाच होते. किंबहुना, व्यक्तिगत कल्याणावर तिलांजलि देऊन आपल्या कुटुंबाचें, समाजाचें, राष्ट्राचें किंवा जगाचें अथवा विश्वाचें सुद्धां हित साधणारे महात्मे म्हणजे मानव्याचे आदर्श होत. असें 'स्वसुख-निरभिलाष' महात्मे, समाजहितासाठीं स्वहिताचा त्याग करणारे आदर्श मानव उत्पन्न होण्याचा अधिक संभव ज्या धर्मानें आपल्या रचनेनें राखलेला असेल, तोच धर्म मनुष्याच्या प्रगतीला उपकारक म्हणतां येईल. या दृष्टीनें पाहिलें असतां एकटा हिंदुधर्मच व्यक्तिनिष्ठ नसून समष्टिनिष्ठ आहे–व्यक्तीच्या हितापेक्षां समाजहिताला अधिक किंमत देणारा आहे असें कोणाहि निःपक्ष-पाती निरीक्षकास आढळून येईल.

हिंदुधर्म एका व्यक्तीला स्वतंत्र घटकच मानावयास तयार नाहीं. मनूनें मनुष्याची व्याख्याच पुढीलप्रमाणें केलेली आहेः–

'एतावानेव पुरुषो यज्जायात्मा प्रजेति ह ।

पति भार्या व अपत्य या तिघांनाच 'पुरुष' ही संज्ञा आहे. म्हणजे आपल्या कुटुंबाची जो कोणी काळजी घेणार नाहीं तो मनुष्यत्वाच्या पाटींतून बारंगळला असें समजलें पाहिजे. तसेंच, आपल्या कुटुंबाचीच तेवढी चिंता वहाणारा प्राणी हा मानव्याच्या वरच्या कोटींतील नाहीं हेंहि उघड आहे. पशुत्वांतून उत्क्रांत झालेल्या नराला नारायणस्वरूप व्हावयाचें तर केवळ 'कुटुंब-कबाडी' होऊन भागणार नाहीं, त्यासाठीं वैयक्तिक हिताची दृष्टि काढून समाजहिताकरितां खपलें पाहिजे. मानवी मनाला असें परहिताचें वळण लागण्यासाठीं हिंदुधर्मानें प्रत्यहीं आचरावयाचे विधि आदेशिले आहेत.

प्रत्येकानें रोज पंचमहायज्ञ अगर पांच प्रकारचे यज्ञ करावेत असें सांगि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तलें आहे. ते म्हणजे ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, मनुष्ययज्ञ व भूतयज्ञ. अध्यापन करणें हा ब्रह्मयज्ञ, तर्पण करणें हा पितृयज्ञ, होम करणें हा देवयज्ञ, बलि देणें हा भूतयज्ञ, व अतिथींची पूजा करणें हा मनुष्ययज्ञ होय असें मनू पुढील श्लोकांत सांगत आहे:–

'अध्यापनं ब्रह्मयज्ञः पितृयज्ञस्तु तर्पणम् ।
होमो दैवो बलिर्भौतो नृयज्ञोऽतिथिपूजनम् ॥

मनुष्य जन्माला येतो तेव्हांच 'ऋषिदेवगणस्वधाभुजां' कर्जाचा बोजा पाठीवर घेऊन येतो म्हणून त्यानें ज्ञानयज्ञसंतति यांच्या द्वारानें आनृण्य संपादावें असें सांगितलेलें आहे. 'यज्ञो दानं तपश्चैव' या गीतोक्तींतहि हेंच आनृण्याचें व तज्जन्य समाजहिताचें बीज सांठविलेलें आहे. 'त्यागेनैके अमृतत्वमानशुः' असा इतिहास सांगण्याचें किंवा 'माहं राजन्नन्यकृतेन भोजम्' या ऋग्वेदांतील प्रार्थनेचें प्रयोजनाहि हेंच. आज हजारों वर्षे हिंदुधर्माची जी घडी ठाकठीक बसली आहे त्याचें कारण तिच्यांत हें आनृण्याचें-व्यक्तिहिताचा होम करून समाजहित साधण्याचें–सूत्र ओतप्रोत भरलेलें आहे हें हिंदुधर्माचा विचार करणाऱ्यानें सतत ध्यानांत ठेविलें पाहिजे.

हें ध्येय ध्यानांत ठेवल्यास, पाश्चात्यांच्या बेगडी व्यक्तिस्वातंत्र्याचे बुडबुडे हातांत धरूं पहाणाऱ्या दुधखुळ्यांच्या हातांत कांहीं टिकाऊ मिळणें शक्य आहे काय? काळाचा परिणाम होऊन हिंदुधर्मावर क्वचित् येथें, क्वचित् तेथें, थोडीबहुत ग्लानि आलेली असेल–नाहीं असें नाहीं–व ती ग्लानी निघूनहि जाईल; परंतु आजकाल हिंदुधर्मावर आंतून–बाहेरून गुप्त व प्रकट जे हल्ले करण्यांत येत आहेत त्यांतील पुष्कळशा हल्ल्यांचें कारण, व्यक्तिहितापेक्षां हिंदुधर्मानें समाजहिताला दिलेलें प्राधान्य न उमगणें हें होय. **व्यक्ति-सुधारणेसाठीं जसे चतुराश्रम तसेच समाज धारणेसाठीं चातुर्वर्ण्य** आंखून देण्यांत हिंदुधर्मानें हेंच ध्येय गोंवलेलें आहे. तें न कळल्यामुळेंच सांप्रत मत्सराचें व यादवीचें विष हिंदुधर्माच्या पोटांत टाकलें जात आहे.

धर्म, अर्थ, काम, व मोक्ष हे जे चार पुरुषार्थ, त्यांची प्राप्ति व्यवस्थित रीतीनें व्हावी म्हणून ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ्य व संन्यास हे चार आश्रम व्यक्तीच्या आयुष्याची योग्य प्रकारें वांटणी करतात. जीविताच्या प्रथम चरणांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रह्मचर्यरक्षण व विद्यार्जन करावें, द्वितीय चरणांत संसार करून ' स्वधर्म आणि भूतदया ' साधावी व इतर आश्रमांना पोसावें, नंतर संसाराचा संबंध हळूहळू तोडावा व शेवटीं केवळ आत्मचिंतनार्थ व परोपकरणार्थ सर्व काळ व सर्व शक्ति खर्च करण्यासाठीं संन्यासाश्रमांत पदार्पण करावें—असें हें आश्रम-चतुष्टय व्यक्तीच्या अत्यंत हिताचें आहे हें विशद करण्याची आवश्यकता नाहीं. हे चतुराश्रम जरी वैयक्तिक स्वरूपाचे असले तरी त्यांच्या पोटांत समाजहितांचे बीज रोंवलेलें आढळून येतें.

चतुराश्रम पाळणाऱ्या लोकांचें ध्येय समाजहित हेंच ठेवलेलें आहे. समाजाच्या धारण-पोषणार्थ आपापल्याला शक्तींचा व्यय अधिकांत अधिक चांगल्या तऱ्हेनें व्हावा या हेतूनें ज्याच्या त्याच्या गुणावरून वर्ण निर्माण झाले. चातुर्वर्ण्याची रचनाच इतकी समाजहितपोषक आहे कीं प्लेटोसारख्या विधर्मी तत्त्ववेत्त्यानेंहि ती पसंत केली.

समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत सर्व समाज समान स्थितींत होता, पुढें मात्र श्रमविभागाच्या दृष्टीनें चार वर्ण निर्माण झाले.

' न विशेषोऽस्ति वर्णानां सर्वं ब्राह्ममिदं जगत् ' या भारतोक्तीचा अर्थहि हाच. वर्णावर्णांत भेद नव्हता, सर्वच ब्राह्मण होते; पण पुढें आपापल्या गुणकर्मांप्रमाणें समाजहितार्थ चातुर्वर्ण्य उत्पन्न झालें, हें भगवान श्रीकृष्ण 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' या शब्दांनीं सांगत आहेत. एका वर्णापासून गुणकर्मभेदानें चार वर्ण कसे निर्माण झालें हें महाभारतकारांनीं तपशीलवार पुढीलप्रमाणें सांगितलें आहे:—

' कामभोगप्रियास्तीक्ष्णाः क्रोधनाः प्रियसाहसाः ।
त्यक्तस्वधर्मा रक्तांगास्ते द्विजाः क्षत्रतां गताः ॥

साहस, कामोपभोग यांची आवड बाळगणारे क्षत्रिय झाले.

' गोषु वृत्तिं समाधाय पीताः कृष्युपजीविनः ।
स्वधर्मान्नानुतिष्ठति ते द्विजा वैश्यतां गताः ॥.

गाई व शेती यांकडे लक्ष देणारे वैश्य झाले.

' हिंसानृतप्रिया लुब्धाः सर्वकर्मोपजीविनः ।
कृष्णाः शौचपरिभ्रष्टास्ते द्विजाः शूद्रतां गताः ॥ ''

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्वच लोक आधीं ब्राह्मण होते; परंतु त्यांच्यापैकीं जे हिंसाप्रिय व अशु-द्धाचारी होते ते शूद्र झाले. या कामाच्या वांटणीप्रमाणेंच चातुर्वर्ण्याचीं कर्तव्यें भगवद्‌गीतेंत सांगितलेलीं आहेत. म्हणजे अगदीं आरंभीं चातुर्वर्ण्य नव्हतें, पुढें त्याची स्थापना झाली पण ती गुणकर्मांच्या कसोटीनें. त्यामुळें साह-जिकच गुणकर्मांच्या उत्कर्षापकर्षासमवेत वर्णांतर होई. आईबाप वर्ण देत नसत तर केवळ जन्म देत असत हें

'शरीरमेतौ सृजतः पिता माता च भारत'

या व्यासवाणीवरून स्पष्ट आहे. गुणकर्मांची पारख करून वर्ण नेमून देण्याचें कार्य गुरु करीत असे हें पुढील मनु-वचनावरून दिसून येईल:—

'आचार्यस्त्वस्य यां जातिं विधिवद् वेदपारगः।
उत्पादयति सावित्र्या सा सत्या साऽजरामरा॥

गुणकर्मांच्या पायावर चातुर्वर्ण्य उभारलेलें असल्यानें आपल्या गुणांचा विकास करून कोणालाहि वरच्या वर्णांत प्रवेश करतां येत असे, याचें प्रत्यंतर महाभारतांतील युधिष्ठिराच्या यक्षाशीं व अजगराशीं झालेल्या संवादांत सांपडतें. भागवताच्या सातव्या स्कंधांत स्पष्टच सांगितलें आहे कीं,

'यस्य यल्लक्षणं प्रोक्तं पुंसो वर्णाभिव्यंजकम्।
यदन्यत्रापि दृश्येत तत्तेनैव विनिर्दिशेत्॥

चातुर्वर्ण्याच्या या आरंभींच्या व्यवस्थेंत व्यक्तीला उन्नतीचें स्वातंत्र्य देण्यांत आलेलें असलें तरी तिच्यांत एका दोषाचें बीज होतें व तें काढून टाकणें अवश्य झालें. एखाद्या व्यक्तीच्या गुणांची परीक्षा घेऊन त्याला 'अजरामरा' जाति देण्याची थोर जबाबदारी ज्या आचार्यांचे शिरावर होती, ते नेहमींच गुण-ग्राहक व निःपक्षपाती असतील हें मनुष्यस्वभावाला विरुद्ध आहे. वर्तनाची पारख करून वर्ण देण्याची कुलमुखत्यारी आचार्यांचे हातून काढून घेणें पुढें जरूर झालें. शिवाय, आनुवंशिकतेच्या नियमानुसार ज्यानें सर्व जन्म ब्रह्म-चिंतनांत घालविलेला असेल त्याच्या संततीपेक्षां तरवारीशींच नेहमीं ज्याचें काम अशा क्षत्रियाच्या अपत्यांना युद्धाचे कामीं योजणें श्रेयस्कर असतें हें निर्विवाद आहे. म्हणून एकएका गुणाचा विकास आत्यंतिक मर्यादेपर्यंत एक-एका समाज घटकानें करावा व त्या पूर्णविकसित गुणाचा विनियोग समाज-हिताप्रीत्यर्थ व्हावा, समाजाचे हिताला सर्वच गुणांची आवश्यकता असल्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भिन्न भिन्न गुणांचा विकास करणारीं समाजाचीं वेगवेगळीं अंगें सारख्याच योग्यतेचीं असावींत व ' पोट व अवयव ' न्यायानें सर्वांनीं मिळून समाजाची प्रगति करावी अशी घटना पुढें आली; आणि चातुर्वर्ण्याचें गुणकर्माचें अधिष्ठान जाऊन जन्मावरून वर्ण ठरूं लागले. या व्यवस्थेनुसार ब्राह्मणांनीं ज्ञान, क्षत्रियांनीं शौर्य, वैश्यांनीं संपत्ति व शूद्रांनीं कला यांची भर समाजांत घातली. समाजाचीं हीं चार अंगें व त्यांचीं कार्यें रूपकालंकाराच्या द्वारानें ऋग्वेदांत एके ठिकाणीं सांगितलेलीं आहेत, ज्या अक्कल–कंगालांना हें अलंकाराचें मर्म कळत नाहीं किंवा ज्या बावळटांचा बुद्धिभेद सहज केला जातो अशा भोळ्या लोकांनीं केवळ अज्ञानानें या ऋग्वेदाच्या भागावर टीकेची सारखी झोड उठविलेली आहे. हा भाग म्हणजे पुरुषसूक्तांतील

' ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहूराजन्यः कृतः।
ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत॥'

हा प्रसिद्ध श्लोक होय. समाजावर पुरुषाचें रूपक केलें तर ज्ञानप्रधान ब्राह्मण मुखाचे ठायीं, शौर्यप्रवीण क्षत्रिय बाहूचे स्थानीं, वित्तोपार्जक वैश्य मांड्यांचे ठिकाणीं व कर्मकुशल शूद्र हे पायाचे जागीं आहेत. तथापि सर्वांची आवश्यकता समाजपुरुषाला सारखीच आहे, हें येथें केवळ अलंकृत भाषेंत सांगितलें आहे. पण ज्यांचें ज्ञान 'विकटो' पर्यंत त्यांना हाच अलंकार शृंखलारूप वाटूं लागतो आणि—

' स्रजमपि शिरस्यन्धः क्षिप्तां धुनोत्यहिशंकया

या न्यायानें ते पुरुषसूक्तावर चडफडूं लागतात. यांनीं अशी अज्ञान–ज्योति पाजळली कीं, ब्राह्मण ईश्वराच्या तोंडांतून बाहेर पडले, क्षत्रिय हातांतून बाहेर पडले, वैश्य मांड्यांतून व शूद्र मात्र पायांतून जन्मास आले ! मूळांतच असा भ्रांतिकृत चमत्कार झाल्यानें हे विवेकभ्रष्ट शतमुखानें असें बरळूं लागतात, दुसरें काय !

या लेखकांना संस्कृत भाषेच्या थोडा तरी गंध असता तर बरें झालें असतें असें वाटतें. आणि संस्कृताचें ज्ञान नसतांना हा ' अव्यापारेषु व्यापार ' करण्याची मर्कटलीला, एकादा ' महात्मा ' करतो हें पाहून तर त्याची कींव येते. पण तो 'महात्मा' आतां कदाचित् 'आकाशांतील बाबाच्या' चरणापाशीं मांडी ठोकून बसला असेल; त्याच्या अनुयायांनीं मात्र या सूक्ताचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विपरीत अर्थ करून हिंदुधर्मावर कोलत्या फेंकण्यापूर्वी संस्कृतचें जरासें अध्ययन करावें म्हणजे त्यांना कळेल कीं, मुखापासून ब्राह्मणाची उत्पत्ति झाली असा अर्थ अभिप्रेत असता तर पंचमीचें रुप येऊन 'ब्राह्मणोऽस्मात्' असे शब्द आले असते; परंतु 'अस्य' या षष्ठीनें हेंच सूचित आहे कीं, ते ते वर्ण त्या त्या ठिकाणीं कल्पितां येतील.

याच प्रकारानें चातुर्वर्ण्याचें रहस्य ज्या अक्कलमंदाचे ध्यानीं आलें नाहीं, त्यांनीं जातिभेदाविरुद्ध हाकाटी पिटून जातिमत्सराचें विष समाजांत फैला-विलें. हिंदुस्थानची राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक—कोणत्याहि प्रकारची प्रगति न होण्यास ही जातिभेदाची धोंड आड येते असें हे अज्ञानी लोक भासवूं लागले आणि एक वर्ण, एक धर्म, एकत्र भोजन, एकत्र प्राशन याच उपायांनीं हिंदुस्थानचा अभ्युदय होईल असें सब-गोलंकारी मत कांहीं लांडे कोल्हे प्रतिपादन करूं लागले. जसें कांहीं भारताच्या प्राचीन वैभवकाळीं चातुर्वर्ण्य नव्हतेंच ! या सर्व आरोळ्यांतील एक गोम ध्यानीं ठेवावी म्हणजे झालें. ती ही कीं, सत्याचे ठायीं असत्याचें शोधन करणारे हे कैवारी आपल्या अज्ञानामुळें हिंदु समाजांत कमी दर्जाचे मानले जातात व म्हणून वरच्या लोकांचे पाय खालीं ओढून सर्वांना आपल्याबरोबर रसातळास नेण्याची खटपट हे करतात. 'सत्यशोधक' पंथाचे आद्य संस्थापक जे जोतीबा फुले यांचें मन हिंदुधर्माच्या प्रेमानें व अभिमानानें किती ओथंबलेलें होतें हें त्यांच्या लिखाणा-वरून दिसून येतें. 'कनवाळू युरोपियन व अमेरिकन सत्पुरुषांचे पवित्र सूचनांवरून' हिंदुधर्म म्हणजे एक बडा तुरुंग आहे अशी ठाम समजूत या समजदार गृहस्थाची झाली. 'भटांच्या' ग्रंथावर विश्वास न ठेवणाऱ्या बुद्धि-वंताचें कोण हें विचारस्वातंत्र्य ! त्याची कर्तबगारीहि अशीच अमानुष आहे. तो महात्मा गरजतो— 'त्या कैदखान्याच्या कृत्रिमी कोटाच्या मुख्य ब्रह्मकपाट-दरवाजाला लाथ मारून बाहेर पडून, मीं आपल्या उत्पन्नकर्त्याचे आभार मानले!' अरेरे! केवळ अज्ञानापायीं कोण हा अधःपात ! कळपाबाहेर गेलेल्या वेड्या कोंकरा, 'त्या परोपकारी युरोपियन उपदेशकाच्या आंगणांत तंबू ठोकून' थोडासा तरी विसावा तुझ्या आत्म्याला मिळाला का ? त्या पांढऱ्या शुभ्र दाढीच्या मिशनऱ्यांचें अंतःकरण कोणत्या रंगाचें तुला आढळलें बरें ? बाबारे, त्या 'छानदार घराच्या' मोहानें तूं आपल्या समाधानाचा, परंपरेचा, धर्माचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

मानण्याचाच उच्छेद केलास. येशूच्या राज्यांत तरी काय सर्वत्र समता आहे ? प्रार्थनेच्या वेळीं सुद्धां बाटलेल्या ख्रिश्चनांना दूर बसविलें जातें, त्यांचे विधि निराळे, त्यांचे मंत्र निराळे; भोजनांत विषमता, विवाहांत विषमता, बाहेरून देखावा मात्र समाज समता-संघाचा ! पांढऱ्या पायाच्या बगळ्यांनीं बुद्धिभेद केल्यामुळें जोतीबासारखे किती तरी अडाणी दूधखुळे हिंदुधर्माला कोंडवाडा मानतात, सोन्याला पितळ, चिंतामणीला काच व कस्तूरीला माती मानतात; आणि आपलें नाक कापून आपल्या मातृधर्माचा वध करण्यास सज्ज होतात ! यांचे डोळे उघडतील तो दिवस हिंदुधर्माच्या इतिहासांत सोनेरी अक्षरांनीं लिहिला पाहिजे.

तो सुदिन उगवेल तेव्हां उगवो; आज जे प्रबुद्ध लोक हिंदुधर्माचा विचार करीत असतील त्यांनीं केवळ टीका करून न थांबतां किंवा हिंदुधर्मापासून दूर न जातां त्याच्यांतच राहून सुधारणा घडवून आणली पाहिजे; आणि तसा परिस्थित्युनरूप फरक कांहीं विचारी लोक करीत आहेतहि. जातिभेदाचे जाळ्यांत हिंदुधर्माचे हातपाय गुरफटलेले आहेत म्हणून ही असंख्य जातींची गुंतागुंत उकलणें जरूर आहे. पोटजातींच्या कोंड्या फोडून केवळ चार वर्णच पूर्वीप्रमाणें ठेवले पाहिजेत व काळाचा ओघ पाहिल्यास तशी सुव्यवस्था हळहळू घडून येत आहे हें दिसून येतें. एका शेतांत एकच पीक वारंवार काढल्यानें त्या जमीनींतील त्या पिकाला न लागणारीं इतर द्रव्यें जशीं मातीमोल ठरतात आणि कालांतरानें जसें तें शेत पडीत होतें, त्याप्रमाणें हजारों वर्षें तेंच तेंच काम केल्यानें चातुर्वर्ण्यांतील गुणविकासाचें तत्त्व ऱ्हास पावत आहे. शिवाय जन्मावरून वर्ण ठरविल्यानें कांहीं व्यक्तींच्या गुणांना गुदमरावें लागतें; यासाठीं यापुढें चारच वर्ण व ते गुणांवरून पूर्वीप्रमाणें ठरविण्यांत यावें. हें तत्त्व मान्य केल्यानें जातिद्वेषाचें विष बरेंचसें उतरेल. त्याची अंमलबजावणी किती काळांनंतर व कोणत्या पद्धतीनें होईल हें दैवी भवितव्यतेशिवाय कोण सांगूं शकणार ?

गुणकर्मविभागशः चातुर्वर्ण्याची जी रचना, तिचा जीर्णोद्धार हिंदुधर्माच्या सावलींत राहूनच उपर्युक्त मार्गानें क्रमाक्रमानें करून घेतला पाहिजे. घिसाडघाई करून आततायी मार्गानें जे जातील ते पस्तावतील. वस्तुस्थिति अशी आहे कीं, हिंदुस्थानचें स्वराज्य छिनावलें गेल्यामुळें भ्रांतचित्त झालेले दीन हीन लोक स्वजातीयांनाच कोपरखळ्या मारूं लागले, चोराला सोडून संन्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला सुळीं देऊं लागले, आणि ब्रह्मद्वेष व धर्मघात करण्यास सरसावले; या भ्रमिष्टांनीं विचार असा करावा कीं, ब्राह्मणांनीं पूर्वी आपलें कर्तव्य केलें नाहीं व आतांहि ते आचारभ्रष्ट झालेले आहेत हा आरोप खरा असला तरी क्षत्रियांनीं राष्ट्ररक्षणाचें कर्तव्य केलें काय ? आजमित्तीला करीत आहेत काय? वैश्यांचीहि गत तीच. पारतंत्र्याच्या जात्यांत सर्वांच्या गुणांचें पीठ होऊन सर्वजग शूद्र बनत चालले आहेत. तेव्हां प्रथम त्या पारतंत्र्याचीं शकलें करण्याचा प्रयत्न एकचित्तानें केला पाहिजे. तो न करतां, आज धर्मांतराची धमकी घाल, उद्यां सत्याग्रहाचा ससेमिरा सोड; इकडे मनुस्मृती-सारखा ग्रंथपिता नष्ट कर एवढ्यानेंहि न भागेल तर मुसलमान अगर ख्रिस्ती होऊन दुसऱ्याला अपशकुन करण्याकरतां स्वतःचें नाक कापून घे, असले अमानुष आणि आततायी मार्ग स्वीकारून कोणतीहि सुधारणा घडून न येतां, आहे तीच फूट वाढत जाईल. तरी सर्वांनीं सहचित्तानें सहकार्य करून परि-स्थितीला जरूर ती सुधारणा घडवून आणावी व तशी सुधारणाक्षमता हिंदुधर्माचे अंगीं आहे.

चातुर्वर्ण्याच्या पुनःस्थापनेप्रमाणेंच अस्पृश्यतानिवारणाचें कार्यहि आजकाल आवश्यक होऊन बसलेंं आहे. फार प्राचीन कालीं आर्य लोकांनीं जेव्हां येथें वस्ती केली तेव्हां आपली रक्ताची धारा व संस्कृतीचा झरा शुद्ध रहावा म्हणून येथील अनार्यांना दूर ठेवलें, हें या विसाव्या शतकांत अमानुष वाटत असलें तरी मनुष्याच्या स्वभावाला तें धरूनच आहे. अमेरिकन लोकांनीं रेड-इंडियन्सना दगडांनीं कसें ठेंचठेंचून मारलें हा पूर्वेतिहास ध्यानीं आणला किंवा अगदीं सुधारलेल्या या शतकांत सर्वांत ‘ सुधारलेल्या ’ युरोपीयांनीं आफ्रिकेंत इतरांना वागविण्याची कोणती तऱ्हा अंमलांत आणलेली आहे हें आठवलें म्हणजे पूर्वीच्या आर्यांना नांवें ठेवण्याला कोणाचीहि जीभ उचलणार नाहीं. अनार्यांना दूर ठेवणें आवश्यक वाटल्यावरून त्यांना अस्पृश्य मानणें, वेदांचा अधिकार न देणें, शिक्षा अधिक सांगणें हे प्रकार आपोआपच संभवतात. अमे-रिकेंतहि एकादा ‘ गोरा ’, गुलामाला कांहीं शिक्षण देतांना आढळला तर कारागृहांत पाठविला जाई हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. प्राचीन कालीं हें अस्पृश्यत्व कांहीं दृष्टींनीं अपरिहार्य असलें तरी आज अशी वेळ येऊन ठेपलेली आहे कीं, तिचें समूळ उच्चाटन हिंदुधर्मांतून होणें जरूर आहे. एक तर,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रतिलोमविवाहामुळें अनार्यांचें रक्त मिसळल्यावांचून व सुधारल्यावांचून राहिलें नाहीं; शिवाय आपल्याच हाडामांसाच्या मनुष्याला आपण शिवून न घेणें आणि गोभक्षक व हिंदुधर्मघातक अन्यधर्मीयांना स्पर्श करणें हा विरोध तर एक क्षणभराहि सहन करणें, माणुसकीची चाड बाळगणाराला तरी शक्य नाहीं. अस्पृश्यांमध्यें अस्वच्छता, अज्ञान इत्यादि व्यंगें असतील तर तीं काढलीं पाहिजेत आणि तीं काढण्याचा प्रयत्न श्री. माटे, वे. शा. सं. दिवेकरशास्त्री यांसारखे ब्राह्मण (जोतीबाचे सत्यशोधकी शिष्य नव्हे ! त्यांना ब्रह्मद्वेषाच्या 'तमाशा'-इतकें दुसरें कोणतें कृत्य पवित्र वाटणार ?) करीत आहेत. सर्वच हिंदुधर्मीयांनीं अस्पृश्य-बांधवांना स्पृश्य करून घेतलें पाहिजे. नाहींतर तो गट गिळण्यासाठीं मुसलमानांनीं तयारी चालविली आहे आणि त्यांना मदत करण्याला किरिस्ताव तयार आहेतच. राजकीय, सामाजिक, धार्मिक—सर्वच बाजूंनीं पाहतां अस्पृश्यतेचा कलंक कायम ठेवणें हानिकारक आहे हें तर खरेंच; परंतु अस्पृश्यतेमुळें थोडाबहुत लाभ होत असता तरीहि केवळ माणुसकीसाठीं तरी आपल्याप्रमाणेंच माणूस असणाऱ्याला हिंदुधर्मीयांकडून आपण शिवून घेणें जरूर आहे. सध्यां स्थिति अशी चमत्कारिक झाली आहे कीं, आजचा गोरक्षक अस्पृश्य उद्यां गोभक्षक ख्रिस्ती वा मुस्लीम होऊन हिंदूकडूनच स्पृश्यतेची खंडणी वसूल करून घेतो. ही चमत्कारिक स्थिति घालविण्यासाठीं, सावरकर उपदेशतात,—

'त्या हीनदीन हिंदु बंधूंच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरव कीं, त्या एका हात फिरवण्यानें तूं या हिंदू जातीचें भाग्यचें भाग्य परिणामकारकपणें फिरवूं शकशील.'

निदान न्यायासाठीं, माणुसकीसाठीं, हिंदुधर्मान्तर्गत अस्पृश्यांना दूर लोटणें कोणाहि विचारवंताला सहन होणार नाहीं. मग महात्माजींसारख्यांचें हृदय अस्पृश्यतेमुळें किती तिळतिळ तुटत असेल ! पुढील एकच वाक्य ती कल्पना आणून देईल. गांधीजी म्हणतातः—

"I should be content to be torn to pieces rather than disown the suppressed classes."

जातिभेद व अस्पृश्यता यांचें यथाकाल निवारण करणें जसें जरूर आहे, त्याप्रमाणेंच आणखी जीं कांहीं व्यंगें हिंदुधर्मांत असतील तींहि नाहींशीं कर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उंदीरावुशींनीं विळें केलीं म्हणून वाडिलोपार्जित घर जसें कोणी टाकीत नाहीं, उलट त्यांतच राहून तीं बिळें बुजविण्याचा प्रयत्न करतो; त्याप्रमाणें काळाच्या ओघाला मार्ग करून देण्यासाठीं हिंदु-धर्माच्या आचाराला मुरड घालणें जरूर आहे. आणि हिंदुधर्माची सर्वसंग्रा-हकता इतकी मोठी आहे कीं तो असले फरक सहज पचवून पुनः ' आणखी भरानें ' फोंफावेल. अशा सुधारणा केल्यावर हिंदुधर्माची वाढ, कलम केलेल्या वृक्षाप्रमाणें, जोरानें होईल व तो आपल्या शीतल छायेखालीं अवघ्या जगाला विसावा देईल. जातींजातींतील वैमनस्य नष्ट होऊन, एकाच रसावर पुष्ट होणाऱ्या बुंधा-खोड-अग्र-विस्तार या वृक्षाच्या चतुरंगाप्रमाणें हिंदुधर्माच्या एकाच अमृतरसावर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चारहि वर्ण आपला उत्कर्ष साधतील. सांप्रत जातींजातींत जी भाऊबंदकीची भावना फैलावली आहे ती नष्ट होऊन तिच्या जागीं ' बंधू आहोंत एकरों पांच ' ची ऐक्यवृत्ति प्रतिष्ठा-पित होईल, व

' तुम्ही आम्ही सकल हिंदू । बंधु-बंधु '

असें धर्मगीत गात सर्व हिंदु अभ्युदयनिःश्रेयसाचा मार्ग लवकरच चोखाळूं लागतील, हें भविष्य न सांगतांहि कळणारें आहे. भविष्य पुराणांतील चातु-र्वर्ण्यांतील बंधुभावाची कल्पना पुढील श्लोकांत स्पष्ट केलेली आहेः—

' चत्वार एकस्य पितुः सुताश्च
तेषां सुतानां खलु जातिरेका ।
एवं प्रजानांहि पितैक्यमेव
पित्रैकभावान् न च जातिभेदः ॥

अशा प्रकारें बंधुभावाधिष्ठित हिंदुधर्म हाच विश्वधर्म होण्याइतका सर्वोत्तम आहे. जगांतील सर्व धर्मांचें तौलनिक परीक्षण केल्यावर कोणीहि झालें तरी, स्वामी विवेकानंदाप्रमाणें, असेंच सत्य व्यक्त करणार कीं,

" I have found Hinduism to be the most satis-fying religion in the world. "

हिंदुधर्माचें हें सर्वश्रेष्ठत्व ज्या विचारी मनुष्याच्या बुद्धीला आकलन करतां, येईल, तो हिंदुधर्माच्या त्यागाची कल्पना तरी मनांत आणील काय ? व्यंगें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोष असले तरी मी ते सुधारीन असें म्हणून तो या धर्ममाउलीला अधिकच बिलगेल आणि, महात्मा गांधीप्रमाणें तो उद्‌घोष करील कीं,

' Even so, I feel for and about Hinduism with all its faults and limitations. '

हिंदुधर्माच्या श्रेष्ठतेसंबंधानें ज्याचें मन साशंक असेल त्यानें ' आपण स्वतांला सनातनी हिंदु कां म्हणवितों ? ' याचीं महात्माजींनीं दिलेलीं पुढील कारणें विचारांत घ्यावींत:–

(१) वेदउपनिषदपुराणें इत्यादि हिंदुधर्मावर व म्हणून

(२) अवतार आणि पुनर्जन्म

(३) वैदिक काळचा वर्णाश्रमधर्म आणि

(४) गोरक्षण

यांवर माझा विश्वास आहे आणि मूर्तिपूजेबद्दल अविश्वास नाहीं म्हणून मी स्वतांला सनातनी हिंदु म्हणवून घेतों " हें महात्माजींचें महनीय मत मननीय नाहीं असें कोण म्हणेल ? याशिवाय जगांतील प्रचलित अशा कोणत्याहि अन्य धर्मांत न आढळणारीं जीं वैशिष्टयें हिंदुधर्माच्या सर्वश्रेष्ठत्वास कारणीभूत आहेत तीं पुढें परिशिष्ट नं. १ मध्यें दिलीं आहेत.

प्रत्येक विचारी पुरुषाचे अंत:करणांत अशा जागत्या धर्माभिमानाची ज्योत तळपत राहिली पाहिजे आणि राहीलहि. जो जो कोणी सर्व धर्मांचा सूक्ष्म अभ्यास करील त्याचे मुखांतून हिंदु धर्माची सर्वोत्कृष्टता पटल्यामुळें, प्रो. जिनसीवाल्यांप्रमाणें. **' मी हिंदु आहे हिंदु राहीन, हिंदु मरेन आणि हिंदुत्वानेंच आपला अभ्युदय केव्हांना केव्हां तरी संपादन करून घेईन '** असे स्वधर्माभिमानानें रसरसलेले उद्गार बाहेर पडल्यावांचून राहणार नाहींत !

प्रकरण–सातवें

उद्यांचा हिंदु धर्म

एक ऐतिहासिक दंतकथा अशी आहे कीं, एका बादशहानें भिन्न भिन्न धर्मांचे प्रतिनिधि बोलाविले आणि त्यांपैकीं प्रत्येकाचें धर्मस्तोत्र ऐकून घेऊन सर्वांत अधिक पसंत पडेल तो धर्म स्वीकारावयाचें ठरविलें. कोणीं तत्त्वज्ञानाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भांडार आपल्या धर्मांत आहे असा अभिमानोद्गार काढला तर कोणीं 'नीतीचें माहेरघर असा माझाच काय तो धर्म आहे' अशी शेखी मिरविली. कोणीं कांहीं, कोणीं कांहीं, असे आपापले गुण पुढें मांडले आणि आपला धर्म राजमान्य होणार असे मनचे मांडे खाल्ले ! परंतु बादशहानें शेवटीं एकाच धर्माचा स्वीकार केला; आणि तो म्हणजे ख्रिश्चन धर्म ! याचें कारण त्यानें असें सांगितलें कीं, त्या धर्मानें आपल्याला प्रिय अशी दारू पिण्यास मोकळीक दिलेली आहे ! ग्राह्यांश इतकाच कीं, सुखाला चटावलेले लोक ऐहिक विलासांचा मोकाट उपभोग घेऊं देणाऱ्या धर्माकडे अज्ञानानें धांव घेत असतात. ज्या पंडित स्त्रियांनीं हिंदु धर्माच्या खांद्यावरून उडी टाकून ख्रिश्चन धर्माच्या गळ्याला मिठी मारली किंवा मुस्लीम धर्माच्या चरणीं आपला देह वाहिला त्यांच्या पुढील आचरणावरून हेंच सिद्ध होतें कीं, शारीरिक सौख्याप्रीत्यर्थ तारुण्याच्या उन्मादांत त्यांनीं हा थिल्लरपणा केला आणि आपल्या घराण्यावर मालिन्य आणलें.

येथें हें सांगणें जरूर आहे कीं, नीतीचीं फारशीं बंधनें न पाळतां मनमोकळेपणें स्वैराचाराचें सुख घेण्याची सोय इतर धर्मांनीं जशी केली आहे तशी हिंदुधर्मानें केलेली नाहीं. पण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, सर्वांत कमी बंधनें केवळ रानटी धर्मांत सांपडतात. असा रानटी धर्म म्हणजे आत्म्याची शुद्ध नग्नावस्थाच. भक्तीचा एकच मलमलीचा सदरा घालण्याची सोय ख्रिश्चन धर्मानें केलेली असली तर एकेश्वरी मताचें जाकिट मुस्लीम धर्मानें समतेच्या दोऱ्यानें शिवलेलें आहे. परंतु आत्म्याचे हे सर्व कपडे हिंदुधर्मांत तयार असूनहि तत्त्वज्ञान, सहिष्णुत्व, सयुक्तिकता इत्यादि धोतर–अंगरखा, वगैरे वेष–प्रकारहि हिंदुधर्माच्या दुकानांत विक्रीसाठीं मांडून ठेविलेले आहेत. परंतु कांहीं जर्मन 'सुधारक' जशी एक नग्न स्त्रीपुरुषांची वसाहत करून कृतकृत्य झालेले आहेत, त्याप्रमाणेंच इंद्रियांचें तोंडांतील लगाम तोडून बंधनाचे पलीकडे जाण्यासाठीं कांहीं कमबुद्धीचे लोक इतर धर्मांच्या मागेंच जातात. आणि त्यांचें इच्छित असें जें ऐहिक आमिष–द्रव्यप्राप्ति, नोकरी मिळणें किंवा ख्रिश्चन मुलीशीं प्रेमलीला करणें–तें हस्तगत झालें नाहीं व समतेनें झांकलेल्या स्वप्नांतील कष्टात्रासाचें कांटेखडे टोंचूं लागले म्हणजे ते परत मातृधर्माकडे येऊं पहातात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या स्वैराचारी लोकांनीं आधींच असा विचार करावयास पाहिजे कीं, धर्माचें ध्येय इंद्रियांचें दमन करून त्यांना सत्प्रवृत्तीला जुंपणें हें असल्यामुळें हिंदु-धर्मांत सन्मार्ग–प्रवर्तक बंधनें इतर धर्मांपेक्षां अधिक आहेत व तीं मनुष्याच्या उन्नतीला उपकारक आहेत. नाहींतर ख्रिश्चन–मुस्लीम धर्मावर कडी करून मनःपूत आचरणाचें मुक्तद्वार उघडणारे शाक्त लोक हिंदुस्थानांत होऊन गेले नाहींत कीं काय ? विषयोपभोगाच्या अनर्गलतेंत हा शाक्तपंथ वरील दोन्ही धर्मांचा गुरु शोभण्यासारखा आहे! त्यांतील अश्लील प्रकार येथें न देतां शाक्त-पंथाचें व तदनुषंगानें ख्रिश्चन मुस्लीम धर्मांचेंहि, आद्य तत्त्व थोडक्यांत देतां येईल. तें म्हणजे,

'पाशबद्धो भवेज्जीवः पाशमुक्तः सदाशिवः' !

सारांश जितके पाश कमी तितकें बरें ही यांची दृष्टि. पण यांनीं जाणलें पाहिजे कीं, पाश नसणें ही पाशवी स्थिति आहे, मनुष्याच्या अभ्युदयासाठीं नीतिनिर्बंध जरूर आहेतच. त्यांना कंटाळून परधर्मांच्या खाईत उडी घेणें म्हणजे आपली पाशवी वृत्तिच प्रदर्शित करणें होय !

जे लोक आजकाल हिंदुधर्मांतून निघून परधर्मांत जातात, ते दोन्ही धर्मांचा तौलनिक अभ्यास करून हिंदुधर्मापेक्षां परधर्म श्रेष्ठ आहे कीं नाहीं इतका विचार करण्याइतके सुबुद्ध नसतात व सुबुद्ध असले तरी इतका खोल विचार ते करीत नाहींत. कारण तसा जर ते विचार करूं लागतील तर तो विचारच त्यांना हिंदुधर्मांतून बाहेर जाण्यास मज्जाव करील इतकें निर्विवाद श्रेष्ठत्व त्या हिंदुधर्माचे अंगीं आहे. जे बाटतात ते बहुधा विकारवश असतात. त्यांचीं कारणें पुढील असतातः—

(१) गोऱ्या पोरीशीं लग्न करणें

(२) मोठ्या अधिकाराची व पगाराची नोकरी मिळणें.

पण या कांताकांचनाच्या बाबतींत बाटग्यांना अलीकडे फार कडू अनुभव येऊं लागले आहेत. समतेचा मुखवटा धारण करणाऱ्या ख्रिश्चन धर्मांत बाटलेल्या हिंदूनें युरोपियन स्त्रीशीं विवाह करण्याचें जमविलें तर ख्रिश्चनांची जमातच्या जमात तो विवाह मोडून टाकते ! तसेंच नोकऱ्या वगैरेहि मिळवून देणें मिशनऱ्यांना हल्लींच्या बेकारींत दुर्घटच झालें आहे. फार तर दोनचार महिने घोळवून लोळवून शेवटीं हे मिशनरी बाट्या लोकांना उकिरड्यावर फेंकून देतात. पर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मीयांचे बाटविण्याचे वेश्यादि सात्त्विक मार्ग मागें सांगितले आहेतच; बाटविण्याचें कांहीं कांहीं हंगाम असतात व त्यावेळीं

(१) मुलें पळवून नेणें.
(२) जुलमजबरदस्ती करणें.
(३) अज्ञानाचा फायदा घेऊन भुरळ घालणें.
(४) दवाखान्यांत औषधोपचाराचे वेळीं किंवा शाळेंत पोटांत शिरणें.
(५) व मुख्यतः दुष्काळाचे वेळीं पोटासाठीं धर्माचा विक्रय करावयास लावणें.

इत्यादि वाममार्गांनीं पुष्कळ हिंदु परधर्मांच्या जाळ्यांत ओढले जातात. खखुषीनें असो कीं परसत्तीनें असो हे परधर्मांच्या सांपळ्यांत एकदां कां अडकले म्हणजे मग त्यांच्या हालास पारावार नसतो. अंतःकरणांत रुतून बसलेले पूर्व संस्कृतीचे धागे तुटवां तुटत नाहींत; आणि परधर्माबद्दल आपलेपणा न वाटतां परधर्मीयांच्या तुटक वर्तनाचा तिटकारा येऊं लागतो; आणि ' स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ' हें गीतातत्त्व यावेळीं याहि अर्थानें गळीं उतरल्यासारखें होतें. एकंदरींत स्थिति अशी विचित्र होते कीं, नांव पाहिलें तर ख्रिश्चन किंवा मुसल्मानी; पण आचारविचार, देवदेवता, विधिसंस्कार—सर्व कांहीं हिंदूंचे. अशा नामतः परधर्मी पण अंतःकरणांतून हिंदूंना मातृधर्मांत येण्याची तळमळ उत्पन्न होते. फल्गु नदीवरील वाळूचा थर बाजूला करतांच खालीं शुद्ध जलाचा प्रवाह जसा वाहतो, त्याप्रमाणें या बाटग्या लोकांची कातडी खरडली कीं आंत हिंदुधर्माचा रंग रक्तांतून वहातांना आढळतो. अशा हिंदूंना मायधर्मांत येण्यासाठीं शुद्धीचा दरवाजा आतां जसा उघडा टाकलेला आहे, तसा तो पूर्वी नव्हता. ' बाटला तो तुटला ' अशा तुटक वृत्तीचें कुलूप त्याला आजवर घातलेलें असल्यामुळें तळमळणाऱ्या जीवांचें व तसेंच हिंदुधर्माचेंहि अपरिमित नुकसान झालेलें आहे.

फार प्राचीन काळीं हिंदु लोकांना बाटविण्याचा प्रयत्न करण्यास इतर प्रभावी धर्म अस्तित्वांतच नसल्यानें शुद्धीचा प्रश्नच तेव्हां उपस्थित झालेला नव्हता. तथापि अन्य संस्कृतींत जन्मलेल्या लोकांना हिंदु करून घेत असत हें उघड आहे. नागलोकांना चातुर्वर्ण्यांत समाविष्ट करून घेतल्याचे उल्लेख महाभारतांत आहेत आणि आर्येतरांना चातुर्वर्ण्यांत वेळोवेळीं अंतर्भूत केल्याचे पुरावे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अन्यत्राहि आहेत. कश्यप नांवाचा मुनि मिश्र म्हणजे मिसर (अर्थात् आजचा इजित) या देशांत गेला होता व तेथील दहा हजार म्लेंच्छांना त्यानें द्विज केलें होतें आणि नंतर तो त्यांसह आर्य देशांत राहूं लागला असा इतिहास आहे.

अशा प्रकारें प्रसरणशील स्वरूप हिंदुधर्मांचें होतें; परंतु स्मृतिकालीं या स्वरूपाचा संकोच होत गेला. एकत्र बसण्याबोलण्यानें व हिंडण्याजेवण्यानें मनुष्य पतित होतो असें पराशरस्मृति सांगते; तर देवलस्मृति म्हणते:–

' याजनं योनिसंबन्धं स्वाध्यायं सहभोजनम् ।
कृत्वा सद्यः पतत्येव पतितेन न संशयः ॥

अन्नव्यवहार किंवा लग्नव्यवहार पतिताशीं करतांक्षणींच मनुष्य पतित होतो. या पतितांचें परावर्तन करण्याला शास्त्राचाहि आधार आहे. स्मृत्यादि ग्रंथांचा परामर्ष घेऊन वे. शा. सं. लक्ष्मणशास्त्री जोशी आपल्या ' शुद्धिसर्वस्वम्' या पुस्तकांत असा निष्कर्ष काढत आहेत कीं,

' सर्वेषां मानवानां सनातनधर्मप्रवेशाधिकारे शास्त्रमनुकूलम् ।'

पतितांनाच काय पण सर्व मानवांना हिंदुधर्माच्या मंदिरांत प्रवेश करण्याला शास्त्राची परवानगी आहे आणि शुद्धिकरण संस्कार झाल्यानंतर ' सर्वाणि ज्ञातिकार्याणि यथापूर्वं समाचरेत्. ' पूर्वजातींत समावेश करून घ्यावयाला व विवाह वगैरे करण्याला शास्त्रानें मुभा दिलेली आहे. श्री. छत्रपति शिवाजी-महाराजांनीं केलेल्या शुद्धीकरणासारखे ऐतिहासिक पुरावेहि आहेत. 'परधर्मी मनुष्याला हिंदुधर्मांत घेण्याला काडीची हरकत नाहीं.' असें रानड्यांनीं मागेंच लिहून ठेविलें आहे. इ. स. १८०० च्या पूर्वींच एका साधूनें गुजराथेंतील एक गांव शुद्ध करून घेतला.

परंतु या शास्त्रवचनांकडे व ऐतिहासिक प्रसंगांकडे दुर्लक्ष करून अलीकडच्या काळांत विशेषत: टोपीवाल्यांचा पाय हिंदभूमीला लागल्यापासून शुद्धीच्या दरवाज्याला कुलूप लागलें. त्यामुळें हिंदुधर्माची स्थिति वाळूच्या घड्याळाप्रमाणें झाली. त्या घड्याळांतील वरच्या गोलार्धांतील वाळूचा एक एक कण जसा खालीं पडतो व तो गोलार्ध शेवटीं पूर्ण रिता होतो, त्याप्रमाणें हिंदुधर्मांतले लोक परधर्मांत थेंबाथेंबानें गळून जातां जातां हिदुधर्मीयांची संख्या फार कमी होत चालली होती आणि ही ओहोटी जर अशीच पुढें चालू राहती तर हिंदुधर्माचा गोलार्ध कांहीं वर्षांनीं पूर्ण रिकामा होण्याची भीति व्यक्त केलेली होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवीनांचें अभ्यावर्तनच नव्हे तर पतितांचें परावर्तनहि बंद असल्यामुळें हिंदुधर्मीयांची संख्या घटत चालली होती. परंतु मुंबईचे ' हिंदु मिशनरी ' वैद्य, उत्तर हिंदुस्थानांतील हुतात्मे स्वामी श्रद्धानंद, व कार्यकर्ता आर्यसमाज आणि गोव्यांतील गुहेमध्यें हिंदुत्वाचे सहस्रकर फेकणारे धर्मभास्कर मसूरकर महाराज, इत्यादि विभूतींच्या रूपानें भगवंतांनीं ' धर्मसंस्थापनार्थ ' अवतार घेतला आहे आणि उतरणीला लागलेला हिंदुधर्माचा सनातन रथ उन्नतीच्या मार्गाकडे वळवून विश्वधर्माकडे चालविला आहे ! हिंदुधर्मांतून फुटून निघण्याचा धाक जे लोक पूर्वी घालीत होते, त्या अस्पृश्यांचें असमाधान, अस्पृश्यतेबरोबरच मावळत चाललें आहे. म्हणजे यापुढें फसवणुकीनें, धमकावणीनें किंवा फुसलावणीनें हिंदुधर्मीचे अनुयायी परधर्माच्या जाळ्यांत अडकले जाणार नाहींत असा बराच संभव आहे आणि विचारी मनुष्यांना आकृष्ट करण्याचें सामर्थ्य परधर्मांत नाहीं हें मार्गेच दाखविलें आहे. म्हणजे यापुढें हिंदुधर्माच्या संख्याबलांतून वजाबाकी करण्याचे प्रसंग सहसा येणार नाहींत. हिंदु लोकांनीं मात्र शुद्धीकृतांना आपलेपणानें वागविलें पाहिजे. हिंदुधर्माच्या स्वीकारानें, ना धन ना सत्ता, कोणताच ऐहिक लाभ सध्यांच्या पारतंत्र्यांत होऊं शकत नाहीं, जें कांहीं मिळेल तें आत्मिक समाधान. तें हिंदूंनीं द्यावें. दसरा-संक्रांतीसारख्या सामुदायिक सणाचे दिवशीं त्यांच्यांत अधिक मिसळावें व नेहमीं शिवून तरी घ्यावें. तुरुंगांतून आलेल्या कैद्याला प्रायश्चित्त दिल्यानंतर जसें वागवितात तसेंहि वागविण्यास जे कांहीं समाज आज तयार नाहींत ते हिंदुधर्माचे शत्रु होत. कारण त्यांच्या अज्ञानी वर्तनानें शुद्धीकृत लोक पुन्हां परधर्मांत जाऊं लागतील. तरी शुद्धीकृतांना शुद्ध हिंदुप्रमाणें मानून हिंदुधर्माची घटती बंद केली पाहिजे.

रक्तशोषणावर रोग नष्ट झाल्यानंतर बलवर्धक औषधें देण्याप्रमाणें, हिंदुधर्मीयांची अज्ञानअस्पृश्यतादि कारणें दूर झाल्यानंतर बाटलेल्या लोकांना शुद्ध करणें व परधर्मांत जन्मलल्यांचें स्वागत करणें या दोन उपायांनीं हिंदुधर्माचें बळ वाढवितां येईल. अर्थात् हिंदुधर्माचा हा जो प्रसार होणार तो अन्यधर्मीयांप्रमाणें अत्याचार व कपटाचार या जोडगोळींची बंदूक रोखून होणार नाहीं. कारण सहिष्णुता हें तर हिंदुधर्माचें ब्रीद आहे. चिमूटभर पारशी आज कैक शतकें हिंदुधर्माच्या दर्यामध्यें राहूनहि एकाद्या बेटांत राहिल्याप्रमाणें सुरक्षितपणें सुखानें नांदत आहेत. युद्धाच्या धांदलींतहि हातीं सांपडलेली कुराणाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रत परत करणें किंवा आपली परमपूज्य देवालयें धुळीस मिळविणाऱ्या मुसलमानांच्या मशिदी शाबूत राखणें, अशी सहिष्णुता हिंदुधर्मी शिवरायाशिवाय कोण दाखवूं शकेल? सध्यांच्या हिंदूमुसलमानांच्या दंग्यांतहि ही सहिष्णुता हिंदूच्या अंगीं इतकी अवास्तव मुरलेली आढळते कीं, ती हिमालयीन सहिष्णुता कमी करण्यासाठीं पुढाऱ्यांना हिंदु अंतःकरणाला आंच लावून बर्फाचीं पुटें वितळावीं लागत आहेत! ख्रिस्ताचे परमभक्त जे प्रो. मोनियर तेहि लिहितात कीं,

Hinduism is all-tolerant, all-compliant, all-comprehensive, all-absorbing.

यापेक्षां कोणत्या अधिक शब्दांनीं हिंदुधर्माचें सर्वश्रेष्ठत्व सांगतां येईल?

तत्त्वज्ञानाची गरुड-भरारी अत्युच्च आकाशांत मारणारा आणि संग्राहकतेचें क्षितिज सर्वाधिक व्यापक करणारा म्हणून इतर सर्व धर्मांपेक्षां श्रेष्ठत्व पावणारा असा हा हिंदुधर्म अन्य धर्मांची माता आहे. हिंदुस्थान व त्यालगतचा प्रदेश म्हणजे

सर्व धर्मांची जन्मभूमिच !

ख्रिश्चन, मुस्लीम बौद्ध धर्मांचें शैशव याच मायघरीं गेलेलें आहे हें पूर्वी दाखविलेंच आहे. या धर्माच्या शीतल छायेखालीं जे येतील 'तेषां शान्तिः शाश्वती नेतरेषाम्'! 'खटनट यावें । शुद्ध होऊनी जावें । ' अशी व आश्वासक दुंदुभि हिंदुधर्म वाजवीत आहे. असा हा सर्वश्रेष्ठ हिंदुधर्म अभ्यासून कोणीहि, डॉ. केतकर 'History of caste in India' या पुस्तकांत तर्क करतात त्याप्रमाणें, म्हणेल कीं, सर्व मानव जातीसाठीं एक धर्म तयार करण्याचें कार्य हिंदू पूर्वीपासून करीत होते. धर्मप्रवणता हा हिंदूंचा आत्माच. हिंदूंची आध्यात्मिकता स्वामी विवेकानंदांनीं पाश्चात्यांशीं तुलना करून पुढीलप्रमाणें वर्णिली आहे.

"व्यक्तिस्वातंत्र्य हेंच पाश्चात्यांचें ध्येय, धनोत्पादक शिक्षण हीच त्यांची भाषा व राजकारण हेंच त्यांचें साधन. उलट, मुक्ति हेंच भारताचें ध्येय, वेद हीच त्यांची भाषा आणि त्याग हेंच त्यांचें साधन"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानची ही धर्मशीलता ध्यानीं घेऊनच अरविंद बाबूंनीं या सत्त्व-प्रधान भूमीला,

" Spiritual daughter of Nature "

असें संबोधिलें आहे. या धर्मकन्येच्या मुखानेंच सर्व जगाला धर्माचा संदेश ऐकावयास मिळणार आहे. हें सत्य विधर्मी विद्वानाहि प्रतिपादीत आहेत. Expansion of England या ग्रंथाचा लेखक सिली यानें इंग्लंड ब्राह्मणधर्माचे अनुयायी होईल, असें भय व्यक्त केलें आहे ! प्राचीन कालींहि ग्रीक तत्त्वज्ञानावर आर्यावर्तातील तत्त्वज्ञानाचा पगडा पडलेला होता हें सर बुइल्यम् जोन्स, चेंबरलेनआदिक ग्रंथकारांनीं प्रांजळपणें कबूल केलें आहे. सर्व धर्मांमध्यें हिंदूधर्मच अग्रपूजेचा मान घेण्यास योग्य आहे हा सिद्धांत एक पाश्चात्य लेखक पुढील शब्दांत मांडतो:—

It is a living religion, it is scientific, carefully elaborated and practically valuable to an extent, **not approached by any other religion**

यांतील शेवटचे शब्द हिंदुधर्माची विश्वधर्म होण्याची पात्रता सूचित करतात.

नीति, अहिंसा, समता, एकेश्वरत्व इत्यादि जीं उदात्त तत्त्वें बौद्धख्रिश्चन मुस्लीम इत्यादि धर्मभांडारांत कोठें कोठें पृथक् पृथक् विखुरलेलीं आहेत, त्यांची एकीकृत रत्नमालाच—मध्यभागीं विचार स्वातंत्र्याचा कौस्तुभ मणि घालून—भारतधर्माच्या कंठांत रुळत आहे. असें एकहि सत्तत्त्व नाहीं कीं जें परधर्मांत आहे पण हिंदुधर्मांत नाहीं. उदाहरणार्थ परमेश्वराचें पितृत्व व मानवांचें बंधुत्व हें तत्त्व ख्रिश्चनधर्माचें अनन्य साधारण वैशिष्ट्य आहे अशी प्रौढी मिरविणाऱ्यांनीं,

' पितासि लोकस्य चराचरस्य '

हें गीता—वचन किंवा,

' त्वमेव सर्वं मम देव देव '

हें सर्वप्रसिद्ध सुभाषित विचारांत ध्यावें. ख्रिश्चनांच्या सौजन्याच्या महा-मंत्राचा अर्थ,

' यदन्यैर्विहितं नेच्छेदात्मनः कर्मपूरुषः ।
न तत्परेषु कुर्वीत जानन्नप्रियमात्मनः ॥ '

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या व्यासोक्तींत सांठविलेला आढळेल. शिवाय,

'तुमचें हृदय म्हणजे मशीद आहे' या कुराण–वचनाचें साम्य

'ईश्वरः सर्वभूतांना हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।'

या भगवदुक्तींत दिसतें. 'तुम्ही देवाचें मंदिर आहां, तुम्हांमध्यें देवाचा आत्मा वसतो' या बायबलांतील वाक्यांत आणि

'देहो देवालयः प्रोक्तो जीवो देवः सनातनः'।

या संस्कृत वचनांत भाषाभेदाशिवाय अंतर कोणतें?

लोकमान्यांनीं म्हटल्याप्रमाणें, 'आमचें तत्त्वज्ञान इतर देशांतील व धर्मांतील प्राचीन व अर्वाचीन कोणत्याहि तत्त्वज्ञानाला हार न जातां, तीं सर्व पोटांत घेऊन परमेश्वराप्रमाणें 'दहा अंगुळें' शिल्लक राहील' हेंच खरें. या अनुपमेय तत्त्वज्ञानाच्या बळावरच 'रहस्यकार' ठांसून सांगतातः–

'सांप्रत युरोपियन राष्ट्रें आमच्यावर राज्य करोत, परंतु सर्वांना श्रेष्ठ प्रकारचे धर्मविचार व तत्त्वज्ञान शिकविण्याचा आशियाखंडाला–विशेषतः हिंदुस्थानाला उपजत अधिकार आहे.'

कांहीं काळ मुसलमानांनीं हिंदुस्थानाला जिंकलें असेल, इंग्रजांनींहि त्याला जिंकलें आहे. परंतु त्या दोघां ..हि मनाला हिंदु तत्त्वज्ञानानें जिंकलेलें आहे! काळाच्या वावटळीनें मुसलमानी सिंहासन धुळीला मिळालें आणि इंग्रजी सत्तेलाहि कांहीं मार्कंडेयाचें आयुष्य नाहीं; परंतु या जेत्यांनाहि जित करणारें जें हिंदू तत्त्वज्ञान, त्याचें त्यांच्या चित्तावरील साम्राज्य मात्र कधींहि नष्ट न होतां अधिकाधिक बद्धमूलच होत जाणार, अशीं सुचिन्हें दिसून येत आहेत.

जो जो कोणी हिंदुधर्मांतील अतुल्य तत्त्वज्ञान ध्यानीं आणील, त्याची वर्णाश्रमाधिष्ठित सुव्यवस्था लक्षांत घेईल, स्वधर्मीयांना प्रणेते व प्रमाणग्रंथांच्या अनेकत्वामुळें त्यानें अर्पण केलेलें विचारस्वातंत्र्य अजमावील, परधर्मीयांसाठीं त्यानें धारण केलेल्या सहिष्णुतेचा विचार करील, त्याची प्राचीनता त्याची सयुक्तिकता, त्याची संग्राहकता–या सर्वांचें जो जो कोणी चिंतन करील आणि या वैशिष्ट्याची तुलना इतर धर्मांशीं करून त्याची महति अनुमित करील; तो तो भाग्यशाली भारतपुत्र 'मी हिंदु कां राहावें?' या शंकेला चित्तांत थारा न देतां हिंदुधर्माच्या सर्वसमावेशक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झोंपाळ्यावर तत्त्वज्ञानाचे उंच झोके घेण्याचें सौख्य भोगील, जो धर्मांतरानें पतित झालेला असेल तो शुद्धीच्या द्वारांतून प्रवेश करून हिंदुधर्माल आलिंगन देईल आणि जो परधर्मोत्पन्न असेल तोहि, ' मी हिंदु कां व्हावें ही जिज्ञासा तृप्त झाल्यानें, धनसंचयाकडे जाणाऱ्या कृपणाप्रमाणें, हिंदु-धर्माकडे धांव घेईल आणि भारतपुत्र, शुद्धीकृत व नवागत–हे तिघेहि अधिकारानुरुप श्रीमत् शंकराचार्यांचा तत्त्वचिंतानुवाद श्रवण करितील किंवा भगवान् श्रीकृष्णाचा कर्मयोग आचरतील अथवा ज्ञानेश्वर–तुकाराम आदि-कांच्या भक्तीच्या अमृतसरोवरांत मज्जन करतील ! हिंदुधर्माचें हिमालया-सारखें उत्तुंग, महासागराप्रमाणें अगाध व गगनमंडलाप्रमाणें उदार असें भक्तिज्ञानकर्मादिकांचें अमूल्य व अतुल्य भांडार त्या ' आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी ' यांच्या हृदयावर अखंड शांतीचा अभिषेक करील, अभ्युदयाच्या गंधाक्षता लावील आणि निःश्रेयाचीं पुष्पें उधळील ! मानवी मनाच्या विविध प्रकारांचा अभ्यास करून त्यांची उन्नति करण्याचें सर्वविध साधन–साहित्य ज्या हिंदुधर्मानें सिद्ध करून ठेविलें आहे, तोच सर्व जगाचा पिता, तोच सर्व जगाचा त्राता, तोच सर्व जगाचा स्वधर्म, व तोच एकटा,

' सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥

असें आश्वासन विश्वधर्माच्या सिंहासनावरून देऊं शकेल ! ! विश्वाचा स्वधर्म असलेला हा हिंदुधर्म लोकमान्यांच्या अपेक्षेनुसार आपल्या छत्राखालीं

' निदान आशिया खंडांतील शंभर कोट लोक '

आणो अशी आपण महत्त्वाकांक्षा बाळगावी हें व्यवहार्य असलें तरी आतां अशी वेळ येत चालली आहे कीं, प्रभूपाशीं मागणें मागावयाचें तर तें, ज्ञाने-श्वरमहाराजांच्या

' दुरितांचें तिमिर जावो ।
विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ॥

या अमृत–मधुर शब्दांतच मागितलें पाहिजे.

तथास्तु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिशिष्ट १ लें.

हिंदुधर्माचीं वैशिष्टयें.

मानवजातीच्या ऐहिक व पारलौकिक कल्याणाचा मार्ग दाखविणें हें धर्माचें उद्दिष्ट होय. या दृष्टीनें अन्य धर्मांत उपलब्ध न होणारीं अशीं जीं अनन्यसाधारण वैशिष्टयें हिंदुधर्मांत समाविष्ट आहेत, त्यांचें संकलित दिग्दर्शन पुढें केलें आहे.

पारमार्थिक वैशिष्टयें:--

(१) जीवात्मा व परमात्मा यांचें ऐक्य हें तत्त्व हिंदुधर्मांतच स्पष्टपणें प्रतिपादिलें आहे--अन्य धर्मांत नाहीं.

या जीवशिवांच्या तात्त्विक ऐक्याचें आनुषंगिक अंग म्हणून प्राणिमात्रांचें समानत्व हिंदुधर्मांत जितक्या व्यापकतेनें मांडलें आहे तसें इतर धर्मांत नाहीं. (उदाहरणार्थ हिंदुधर्मांत ' यावानात्मा निजात्मनि तावानात्मा परात्मनि ' इत्यादि सूत्रें आत्मैक्य दर्शवितात; तर परधर्मांत कोठें जनावराला आत्मा नाहीं तर कोठें तदितरधर्मीयांना आत्मा नाहीं, अशीं संकुचित मतें ठोकून दिलीं आहेत.)

(२) ध्येयाच्या दृष्टीनें पहातां मोक्ष अथवा सायुज्य मुक्ति–इतकें उच्च ध्येय पुढें ठेवणारा एकटा हिंदुधर्मच पृथ्वीच्या पाठीवर आहे. अन्य धर्मांची दृष्टि इंद्रियांच्या सुखोपभोगापलीकडे पोचूं शकत नाहीं.

ऐहिक वैशिष्टयें.

(३) **नैतिक विचाराचे** बाबतींतहि, कृत कर्माचें फळ भोगावें लागतेंच आणि आपली उन्नति शुद्धाचरणानें क्रमशः करून घेण्याचें स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे असें आश्वासन देणारा कर्मविपाकाचा कायदा हिंदुधर्मानें घालून दिलेला आहे; त्यामुळें त्याची नीतीची बैठक इतर धर्मांपेक्षां दृढतर झाली आहे.

(४) **आचारशास्त्रासंबंधींहि** हिंदुधर्मांतील आनृण्य, भोग, त्याग इत्यादि तत्त्वें मानसशास्त्रानुसार योग्य मर्यादेंत सांगितलेलीं आहेत; आणि प्रपंच व परमार्थ यांचा योग्य मेळ घातलेला आहे. इतर कांहीं धर्मांत भोगावर तर कांहींत त्यागावर एकांगी व अव्यवहार्य भर दिला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२०७म / ३ I ७७ २०७म

(५) हिंदूधर्माची उभारणी तात्त्विक ऐक्य व व्यावहारिक भेद या नैसर्गिक पायावर झालेली असल्यानें त्यांतील आचारविचारांत समुचित मेळ दिसून येतो. पण अन्य धर्मांत हा फरक ओळखला न गेल्यानें एक प्रकारचा मिथ्याचार अस्तित्वांत आला आहे.

व्यक्तीला चतुराश्रम व समाजाला चातुर्वर्ण्य यांची नैसर्गिक शिस्त लावून हिंदूधर्मानें आचारसौकर्य साधलें आहे.

(६) घटनादृष्ट्या हिंदूधर्मच काय तो तत्त्वनिष्ठ असून इतर धर्म व्यक्तिनिष्ठ किंवा ग्रंथनिष्ठ आहेत.

(७) ऐतिहासिक दृष्ट्या हिंदुधर्मच काय तो अनादि—म्हणजे ज्याचा आरंभकाल मानवी ज्ञानाच्या सांप्रतच्या आवाक्याबाहेरचा आहे—असा आहे. इतर धर्म सादि किंवा ज्ञातादि आहेत.

(८) शास्त्रीय दृष्ट्या एकटा हिंदूधर्मच भौतिक—शास्त्रानुकूल आहे. इतर धर्मांतील सृष्ट्युत्पत्ती वगैरे विषयक माहितीच्या चिंधड्या आधुनिक शास्त्रज्ञांनीं कशा उडविल्या आहेत हें प्रसिद्धच आहे.

(९) बौद्धिक दृष्ट्या हिंदुधर्म अंधश्रद्धारहित असून त्यांत विचारस्वातंत्र्याला अगर मतमतांतराला मुभा आहे. याच्या उलट अन्य धर्मांत विशिष्ट मत ग्राह्य मानलेंच पाहिजे असा आग्रह आहे.

(१०) जगद्धर्माच्या दृष्टीनेंहि सहिष्णुत्व व संग्राहकत्व हे दोन गुण धारण करणारा एकटा हिंदुधर्मच श्रेष्ठ आहे. इतर धर्मांची शिकवण परविध्वंसक आहे.

सारांश, हिंदुधर्म हा मतपंथ नसून तो संस्कृतीचा एक आदर्श आहे. अन्य धर्म हे केवळ मतपंथ अथवा सांप्रदाय होत.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिशिष्ट २ रें

हिंदुधर्माचीं कांहीं सामान्य लक्षणें.

वर दिलेल्या विशिष्ट लक्षणांच्या जोडीस हिंदुधर्माचीं कांहीं सामान्य लक्षणें देणें शक्य आहे. तीं अशीं:--

१ ज्याप्रमाणें देहांतील सर्व घटकांना व्यापून राहणाऱ्या जीवात्म्याचें अस्तित्व प्रत्ययास येतें त्याचप्रमाणें पिंडब्रह्मांड न्यायानें सर्व जगाला व्यापून टकणाऱ्या विराट ईश्वराचें अस्तित्व मानणें.

२ वेदग्रंथांचें अनादित्व व त्यांचें असामान्यत्व मानणें.

३ अद्वैत तत्त्वज्ञानाचें तात्त्विक विचारांत अत्युच्चत्व मानणें.

४ गीताग्रंथाला हिंदुधर्मतत्त्वांचा संग्रह मानणें.

५ जीव व जगत् यांचे संबंध, पुनर्जन्म, कर्मविपाक इत्यादि अत्यंत गहन व कूटप्रश्नासंबंधानें कोणतेंहि मत आग्रहानें प्रतिपादन न करतां त्याबाबत बुद्धिप्रामाण्याला सवड ठेवणें.

६ इतर धर्मांकडेहि बंधुभावानें पाहून त्यांतील व्यक्तींना क्रमाक्रमानें मोक्ष शक्य आहे असें मानणें.

७ उपनयन, ब्राह्म विवाह, प्रेतदहन इत्यादि आचार व मूर्तिपूजा, प्रार्थना इत्यादि ईश्वरोपासनेचे प्रकार यांचा व्यक्तीच्या व समाजाच्या स्थैर्याच्या दृष्टीनें उपदेश करणें. पण त्याबद्दल अट घालण्याचा आग्रह न धरतां व्यक्तींना मतस्वातंत्र्य देणें.

व्यक्तींचें अपूर्णत्व व समष्टीचें पूर्णत्व लक्ष्यांत ठेवून बंधुभावानें व सहकार्यानें वागून जगांत शांतता प्रस्थापित करण्याचा मार्ग आक्रमिणें व अशा रीतीनें सामुदायिक मोक्षाचें ध्येय साध्य करणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चरित्रकोश

वेद, स्मृति, पुराणें, सूत्रें व वेदाङ्गें यांतील सर्व व्यक्तींचीं उपलब्ध सर्व माहिती वाचावयाचें साधन ह्मणजे **चरित्रकोश.**

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व इतर सर्व जाति, धर्म, पंथ यांना आपल्या पूर्वजांची माहिती मराठींत वाचावयास मिळण्याचें एकच साधन ह्मणजे **चरित्रकोश.**

ग्रंथाचीं पानें दोन हजार आहेत. सातशें पानांचा एक असें तीन भाग प्रसिद्ध होतील.

आगाऊ किंमत वीस रुपये. आतां पांच रुपये भरून नांव नोंदविल्यास प्रसिद्धी नंतर पाऊणपट किंमतींत ग्रंथ मिळेल.

पत्ता:—सिद्धेश्वरशास्त्री चित्राव मॅनेजिंग डायरेक्टर.
भारतवर्षीय चरित्रकोश मंडळ लि. २७ बुधवार, पुणें शहर.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमचे ग्रंथ

१	संध्या	ऽ=
२	ब्रह्मयज्ञ	ऽ=
३	वैश्वदेव	ऽ=
४	पूजा	ऽ≡
५	श्राद्धप्रयोग	ऽ||=
६	गणेशाथर्वशीर्ष	ऽ=
७	हिंदुधर्मतत्त्वसंग्रह	ऽ=
८	धर्मशिक्षण	ऽ=
९	शुद्धिसंस्कार	ऽ|=
१०	उपनयनसंस्कार	ऽ|·
११	चौलसंस्कार	ऽ=
१२	समावर्तनसंस्कार	ऽ=
१३	विवाहसंस्कार	·|||·
१४	यज्ञोपवीतसंस्कार	ऽ=
१५	ऋग्वेदाचें मराठी भाषान्तर	१२ रु.

पत्ताः—सिद्धेश्वरशास्त्री चित्राव
५८ शनवार पुणें.

हिंदुधर्म विचारमालेचें
दुसरें पुस्तक
"हिंदुधर्म दीपन"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुधर्मांचा जयघोष

(बालवीर गर्जना)

जय बोला जय । हिंदुधर्मांचा जय ॥
आर्य धर्मांचा जय ।
वैदिक धर्मांचा जय ।
सनातन धर्मांचा जय ।
जय बोला जय । हिंदुधर्मांचा जय ॥
हट्ट नाहीं मताचा ।
संताचा वा ग्रंथाचा ।
देवाच्या वा नांवाचा ।
श्रद्धेच्याहि रूपाचा ।
द्वेष नाहीं कोणाचा ।
प्रेमभाव सर्वांचा ।
जय बोला जय । हिंदुधर्मांचा जय ॥
हिंदु रहा । हिंदु व्हा ।
हिंदुसंघटन करा ।
हिंदुत्वासाठि मरा ।
जगभर हिंदुधर्म माजवा ।
जय बोला जय । हिंदुधर्मांचा जय ॥
आद्य धर्मांचा जय
एक धर्मांचा जय
तत्त्व धर्मांचा जय
सत्य धर्मांचा जय
राष्ट्र धर्मांचा जय
विश्व धर्मांचा जय
जय बोला जय । हिंदुधर्मांचा जय ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar